# महाराष्ट्रांतील संत
# व
# त्यांचे साक्षात्कार

लेखक

**राजाराम सखाराम भागवत** एम्.ए.

सिद्धपुरुष व त्यांचा संप्रदाय '; ' राजयोगाच्ची मूलतत्त्वें व अभ्यास '; ' मृत्यु व मृत्यूनंतर '; ' मरणोत्तर-स्थिति व परलोकविद्या '; ' बेझंट-चरित्र ' वगैरे ग्रंथांचे कर्ते

मुद्रक
**शंकर रामचंद्र दाते**
यशवंत मुद्रणालय,
२००/३ सदाशिव, पुणें २.

[ आवृत्ति १ लीं, जून १९५४. ]
किमत १॥ रु.

प्रकाशक
**द. गो. काळे,**
न्यु. कॉलनी, आपटे रोड,
पुणें ४.

# प्रस्तावना

मुकुंदराज-ज्ञानेश्वरांपासून तुकाराम-रामदासापर्यंत महाराष्ट्रांत जे अनेक संत होऊन गेले त्यांनीं केलेल्या ग्रंथरचनेंत 'अध्यात्म' हा विषय प्रमुख आहे. त्यांच्या ग्रंथांचा जर नीट अभ्यास करावयाचा असला तर 'अध्यात्म' या विषयाचीं मूलतत्त्वें व त्यांतील तपशील यांची माणसाला माहिती असणें जरूर आहे. गेल्या शंभर वर्षांत ज्या विद्वानांनीं या वाङ्मयाचें परिशीलन केलें किंवा ज्या शिक्षकांनीं हें वाङ्मय शाळाकॉलेजांत शिकविलें त्यांपैकीं बहुतेकांना 'अध्यात्म' या विषयाची फारशी माहिती नव्हती; फक्त भाषेची माहिती होती. त्यांना अध्यात्माची माहिती नव्हती इतकेंच नव्हे, तर अध्यात्मशास्त्राबद्दल त्यांच्या मनांत गैरसमज होते; किंबहुना अध्यात्म नांवाचें एक विश्वसनीय ज्ञानक्षेत्र आहे हेंही कित्येकांना मान्य नव्हतें. संतांचे ग्रंथ हे नुसते काव्यग्रंथ आहेत, तें नुसतें देवभक्तांनीं लिहिलेलें ललित वाङ्मय आहे, अशा दृष्टीनें बहुतेक भाषापंडितांनीं या ग्रंथांचा अभ्यास केलेला आहे. भाषाज्ञान उत्तम आहे, अशा माणसानें जर इंद्रिय-विज्ञानशास्त्र किंवा खगोलशास्त्र यांवरील वरच्या दर्जाचे महत्त्वाचे ग्रंथ वाचले तर ते त्याला नीट समजणार नाहींत. इंद्रियविज्ञानशास्त्र व खगोल-शास्त्र यांची सर्व सामान्य माहिती असली तरच त्याला त्या ग्रंथांचें मर्म समजेल. इंद्रियविज्ञानशास्त्र व खगोलशास्त्र हीं खरीं शास्त्रें आहेत, हेंच जर त्याला मुळांत मान्य नसलें, त्यांत फक्त भोळा भाव आहे, तें कल्पनांचे फवारे आहेत, असा जर त्याचा ग्रह असला तर त्या ग्रंथांबद्दल त्याच्या मनांत गैरसमजही उत्पन्न होतील व त्याचा अभ्यास एकांगी होऊन त्याचे विचार चुकीच्या वळणावर जातील. महाराष्ट्रीय संतांच्या वाङ्मयाचें जें अध्ययन सांप्रत बुद्धिमान् लोकांत चालू आहे तें वरील कारणास्तव सदोष आहे. उलटपक्षीं नुसत्या भोळ्या भावानें जे संतांच्या वाङ्मयाचा अभ्यास करतात त्यानें भोळसटपणा, संकुचितपणा वगैरे वृत्तींची वाढ होत असल्यामुळें तें ही सदोष आहे. या दोघांच्या अध्ययनांत जी बाजू जनतेसमोर येत नाहीं

ती आमच्या वाचकांच्या समोर ठेवावी या हेतूनें हें पुस्तक आम्ही लिहिलेलें आहे.

हें पुस्तक छोटें असल्यामुळें त्यांत पुष्कळ गोष्टी घालतां आलेल्या नाहींत महाराष्ट्रीय संतांपैकीं अनेकांनीं राजयोगाचा अभ्यास केलेला असून त्यांना कित्येक सिद्धि प्राप्त झालेल्या होत्या. त्या सिद्धींच्या द्वारानें त्यांना कांहीं अतींद्रिय गोष्टींचें ज्ञान मिळालेलें होतें. उदाहरणार्थ संत बहिणाबाई यांना स्वतःच्या पूर्वजन्मांची आठवण होती. असल्या ज्ञानाचा समावेश साक्षात्कारांत होणें जरूर आहे. पण पुस्तकाची मर्यादा वाढेल म्हणून असले साक्षात्कार या पुस्तकांतून वगळणें अवश्य झालें आहे. हें पुस्तक लहान असलें तरी त्यांत जे मुद्दे विवेचिले आहेत त्यांवरून संतांचे ग्रंथ नीट समजून घ्यावयाचे असले तर कोणत्या दिशेनें त्यांचें परिशीलन केलें पाहिजे, याची कल्पना आमच्या वाचकांस येईल असा आम्हांस भरंवसा वाटतो. संतांच्या ग्रंथांचा आम्हांस जो परिचय करून घेतां आला, त्यांतला (स्थलाभावास्तव) अल्पांशच या छोटया पुस्तकांत घालतां आला आहे. अभ्यासाच्या एका नवीन दिशेकडे अंगुलिनिर्देश करून संतांच्या चळवळीवर एक वेगळा प्रकाश पाडावा हें आमचें येथील उद्दिष्ट आहे. त्या दिशेनें पुढें जाऊन जो जिज्ञासू संतवाङ्मयाचें जास्त विस्तृत व खोल अध्ययन करील, त्याला संतांच्या उद्योगांचें अंतरंग महाराष्ट्रीय जनतेसमोर अधिक चांगल्या रीतीनें उघड करून दाखवितां येईल. इतकें जरी या पुस्तकाच्या वाचनानें आमच्या वाचकांस पटलें तरी ह्या पुस्तकाचें सार्थक झालें असें आम्हीं समजूं.

ठाणें
जून १९५४

**राजाराम सखाराम भागवत**

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १. | प्रकरण १ लें : | विषयप्रवेश | १ |
| २. | प्रकरण २ रें : | साक्षात्कारांची पार्श्वभूमि | १५ |
| ३. | प्रकरण ३ रें : | अंतरंगांतील एक संस्था | २९ |
| ४. | प्रकरण ४ थें : | उत्क्रांतीचे अज्ञात जीवनप्रवाह | ५१ |
| ५. | प्रकरण ५ वें : | संतांच्या ग्रंथांतील चोरखण | ७१ |
| ६. | प्रकरण ६ वें : | संतांचे गुरु व शिष्य | ८४ |
| ७. | प्रकरण ६ वें : | अध्यात्ममार्गावरील विधि व सोहळे | १०३ |
| ८. | परिशिष्ट : | आनंदवनभुवन | १२१ |

# वाचकांस सूचना

या पुस्तकांत जागजागीं जे संतवचनांचे आधार दिले आहेत ते खालील आवृत्तींतून घेतलेले आहेत. आवटे यांनीं १९२४ सालीं ' गाथापंचक अर्थात् सकल संतगाथा ' या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. संतांच्या गाथांतील क्रमांक या पुस्तकांतून दिलेले आहेत. कांहीं स्थळीं जोग यांच्या तुकाराम गाथेचा उल्लेख करून त्यांतून क्रमांक दिले आहेत. ही १९२६ सालची जोग यांची सार्थ तुकारामाची गाथा होय. दासबोधांत ले आधार देवकृत शके १८२७ च्या आवृत्तींतले आहेत. ज्ञानेश्वरींतले, आवटे यांच्या १९२७ सालच्या साखरे यांनीं भाषांतर केलेल्या आवृत्तींतले आहेत. एकनाथी भागवताची पांगारकरकृत १९१० सालची निर्णयसागरची आवृत्ति आम्ही घेतलेली आहे. महाराष्ट्र सारस्वताची शके १८७३ ची चवथी आवृत्ति घेतली आहे. इतर ग्रंथांच्या अनेक आवृत्त्या नसल्यामुळें त्यांतील आधारांबद्दल खुलासा करण्याचें कारण नाहीं.

★

## प्रकरण १ लें

# विषयप्रवेश

जगांतील सर्व धर्मांत कांहीं भाग बहिरंगाचा असतो व कांहीं अंतरंगाचा असतो. बहिरंगाचा सोपा व सर्वांकरितां असतो, अंतरंगाचा गहन व फक्त अधिकारी माणसांकरितां असतो. बहिरंगाचा भाग ग्रंथांत स्पष्टपणें मांडलेला असतो, पण अंतरंगाचा तसा स्पष्टपणानें मांडलेला नसतो. कधीं कधीं तो गोष्टींनीं वा उपमांनीं ध्वनित केलेला असेल; तर कधीं कधीं द्वयर्थी शब्दयोजनेनें अस्पष्टपणें सांगितलेला असेल, तो सांगण्यासारखा नसल्यानें तो गुप्त ठेविलेला आहे असेंही त्याबद्दल कधीं कधीं म्हटलेलें आढळेल. अंतरंगाचा भाग सर्वांस समजण्यासारखा नसतो व सर्वांस सांगितल्यास तो न समजतां त्यापासून गैरसमज, बुद्धिभेद, दुराग्रह भोळसटपणा हे दोष समाजांत पसरण्याचें व त्यामुळें धर्माच्या कांहीं अंगांस विद्रूपपणा येण्याचें भय असतें. तसेंच वाईट माणसांच्या हातून त्याचा दुरुपयोग होण्याचाही संभव असतो. यासाठीं तो सर्वांसमोर न मांडतां अंशतः किंवा पूर्णांशानें गुप्त ठेविलेला असतो. धर्मांतील महाज्ञानी माणसांना तो अंतरंगाचा भाग अवगत असतो व तो फक्त योग्य माणसांनाच उपलब्ध व्हावा अशी योजना असते. या महाज्ञानी माणसांनीं कांहीं संस्था काढलेल्या असतात. त्यांना संप्रदाय म्हणतां येईल. विशिष्ट योग्यतेचीं माणसें त्या संप्रदायांत शिरावीं व तेथें त्यांस त्या अधिकारी माणसांकडून तें अंतरंगाचें गुप्त ज्ञान मिळावें अशी व्यवस्था असते.

महाराष्ट्रीय संतांनीं जरी बहुजनांकरितां जानपद चळवळ केलेली असली तरी वरील शिरस्त्यास धरून त्यांनींही अध्यात्माचा सर्व भाग आपल्या चळवळीत उघडपणें सर्वांसमोर मांडलेला नाहीं. अधिकार तैसा करूं उपदेश। साहे ओझें त्यास तेंचि द्यावें। मुंगी-वरी भार गजाचें पालाण (खोगीर)। घालितां तें कोण कार्यसिद्धि।।[१] या तुकारामांच्या उक्तीवरून सर्वांना सर्व गोष्टी सरसकट शिकवणें योग्य नाहीं हें त्यांचें धोरण असल्याचें उघड आहे. जनतेपासून ज्ञान लपवून तिला अज्ञानांत ठेवावें असा संतांचा हेतु नसून जें ज्ञान ज्यास पेलणार नाही त्यास तें दिले तर दुष्परिणाम होतील, ते होऊं देतां कामा नयेत हा त्या धोरणाचा उद्देश होता. ज्ञानेश्वरांनी म्हटलें आहे 'जें सायासें स्तन्य सेवी। तें पक्वान्नें केंवि जेवी। म्हणोनि बाळका जैसीं नेदावीं। धनुर्धरा[२]।।' म्हणजे आईच्या स्तनांतलें दूध पचविण्याची ज्या लहान अर्भकाला मारामार, त्याला पक्वान्नें पचवितां येणार नाहीत, अर्थात् त्याला ती देणें योग्य नाहीं. धर्मां-तील खोल भाग समजून त्याचा फायदा घेणे असेल तर माणूस बुद्धीनें, नीतीनें व कर्तबगारीनें अमुक एका दर्जाचा असणें अवश्य असतें. जर तो निर्बुद्ध व निष्क्रिय असेल, अप्पलपोटघा, नीच व मलिन वासनांनीं लडबडलेला आणि व्यसनांच्या प्रलोभनांत अडकलेला असेल, तर त्याला हे खोल भाग समजणार नाहींत; इतकेंच नव्हे, तर तो त्या खोल भागांवर स्वतःच्या घाणेरडया वृत्तींचीं पुटें चढवून धर्माचें विडंबन करण्याचा संभव असतो. म्हणून रामदास पृच्छा करतात, 'विषयांसक्तां ज्ञान। जिरेल कैसें ?[३]।। ज्ञानेश्वरही सांगतात कीं, 'ऐसा अहंकाराधिरूढ। एकदेशी मूढ। तया हा परमार्थ। प्रकटावा ना[४]।। ते आणखी सांगतात "कां विद्या गुरूपदिष्टा।

१ तुकाराम गाथा आवटे क्रमांक ३५०४, जोग क्रमांक २४६०.

२ ज्ञानेश्वरी ३,१७२.

३ दासबोध ५, ३, ६२.

४ ज्ञानेश्वरी ३, १७९

बोभाइलिया चोहटां । तरि इष्टदा परि अनिष्टा । हेतु होती"[१] ॥ म्हणजे गुरूनें शिकविलेलें जें अध्यात्म ज्ञान असतें तें चवाठ्यावर उघड करून जर सांगितलें, तर मूलत: तें जरी इष्ट प्रकारचें असलें तरी तें अनिष्ट गोष्टींस कारणीभूत होतें. तुकारामही तोच अभिप्राय देतात. "न सांगावें वर्म । जनीं असो द्यावा भ्रम । उगीच लागतील पाठीं । होती रितीच हिंपुटी । शिकविल्या गोष्टी । शिकोनि न धरिती पोटी । तुका म्हणे शीण । होईल अनुभवावीण[२]" ॥ याचा अर्थ असा की, जगाला वर्माच्या सखोल गोष्टी सांगू नयेत. त्याविषयी संदेह ठेवावा. नाहीं तर हा खोल भाग तुम्हांला माहीत आहे हें जाणून तो मिळविण्यासाठीं ते तुमच्या पाठीस लागतील व व्यर्थ शिणतील. त्याना या गोष्टी शिकविण्याचा प्रयत्न केला तर ते त्यांना हृदयांत स्थान देणार नाहींत. या गोष्टीची तुम्ही प्रचीति घेऊन पहा. नाहीं तर तुम्हांस फुकट श्रम होतील. अंतरगाचे हे खोल व गुप्त भाग कोणालाच सांगावयाचे नाहीत असें नव्हे ते कोणाला सांगावे याबद्दल ज्ञानेश्वर म्हणत आहेत की, 'या लागी सुमनु आणि शुद्धमति । जो अनिंदकु अनन्यगति । पैं गा गौप्यही तयांप्रति । चावळिजे सुखें ॥[३] म्हणजे ज्याची मनबुद्धि चांगली व शुद्ध असेल, चांगल्या गोष्टीची निंदा करण्याची ज्याची वृत्ति नसेल व ज्याला या ज्ञानाची अत्यंत उत्कंठा वाटत असेल त्याला तें ज्ञान देण्यास हरकत नाही.

### अध्यात्मशास्त्राचें धोरण

हें धोरण जगांत अनादि कालापासून चालू आहे. महाराष्ट्रांतील संतांना हें धोरण पटलें व तें त्यांनीं स्वीकारलें. पण जरी त्यांत मोठी फिरवाफिरव करावी असें त्यांना वाटलें असतें तरी ती

---

१ ज्ञानेश्वरी १६, ११९

२ जोगकृत तुकाराम गाथा क्रमाक ८१८

३ ज्ञानेश्वरी ९,४०

करण्याला त्यांना मोकळीक होती असें दिसत नाहीं. या सर्व संतांना शिकविणारे गुरु होते. धर्माच्या अंतरंगांतील गुप्त ज्ञान ह्या संतांनीं आपापल्या गुरूंपासून मिळविलेलें होतें. हेंच धोरण त्यांनीं पुढें चालवावें असा त्यांच्या गुरूंचा त्यांना आदेश होता असें त्यांच्या ग्रंथांवरून दिसतें. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरांच्या गाथेंतील कित्येक स्थळांवरून उघड होतें, कीं त्यांना जास्त अधिकाराचीं माणसें भेटलीं असून त्यांच्या साहाय्यानें त्यांना कित्येक उच्च प्रतीचे अनुभव प्राप्त झालेले होते. अशा एका अनुभवासंबंधानें ते म्हणतात, "खुणा जरि बोलों तरी मौन्य पडलें.[१]" म्हणजे मी मौन धरावें असा मला आदेश असल्यामुळें या अनुभवाच्या खाणाखुणा सांगण्यास मी स्वतंत्र नाही. दुसऱ्या एका ठिकाणीं "मज बोलों नये ऐसें केलें । मन उन्मनीं बोधलें ।" असे उद्‌गार त्यांनी काढले आहेत. त्यावरून दिसून येतें कीं, ज्ञानेश्वरांना कोणीतरी अधिकारी पुरुषानें प्रयत्नतः उन्मनी नांवाच्या एका उच्च भूमिकेवर नेऊन ज्ञान दिलें होतें व या गोष्टी त्यांनीं दुसऱ्यांना सांगतां कामा नयेत असा त्यांचेवर निर्बंध घातला होता.

धर्मामध्यें जो अंतरंगाचा भाग आहे त्यांत योगसिद्धींचा समावेश होतो. विशेष प्रकारचे जे उच्च अनुभव माणसांना येतात त्यांचाही त्यांत समावेश होतो. सामान्य लोकांना योगसिद्धि हव्या असतात, उच्च अनुभवही हवे असतात, पण त्या गोष्टी मिळविण्याची पात्रता व त्या पेलण्यास लागणारी नीतिमत्ता हीं मात्र त्यांच्या अंगीं नसतात. सामान्य माणसांना संपत्ति, अधिकार, लोकप्रियता या गोष्टी पाहिजे असतात. त्या मिळविण्याकरितां ते धडपड करतात व त्यांत पुष्कळदां खोटेपणा, लबाडी, अन्याय याही गोष्टी ते करीत असातत. संपत्ति, अधिकार व लोकप्रियता हीं त्यांस कधीं कधीं मिळतात; पण त्यांच्या स्वभावांत स्वार्थीपणा असल्यामुळें ते या गोष्टींचा अनेक प्रसंगीं दुरुपयोगही करतात. त्यामुळें जर

१. ज्ञानेश्वर गाथा ( आवटे ) क्रमांक ३०५ व ६९२ पहा.

असल्या माणसांस योगसिद्धि व उच्च अनुभव मिळाले तर ते त्यांचाही दुरुपयोग करतील हें निश्चित आहे. संपत्ति, अधिकार, लोकप्रियता यांचा माणसानें दुरुपयोग केला तर तो इतरांस ओळखतां येतो. पण योगसिद्धि व खोल अनुभव यांचा दुरुपयोग केला तर तो जनतेला उमगणार नाहीं आणि समाजाचें नुकसान होईल. याला उपाय एकच. ज्यांचें मन शुद्ध व निःस्वार्थी आहे, जे घ्येयवादी आहेत, ज्यांचे हेतु थोर आहेत, व ज्यांच्या शीलांत काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर यांना स्थान नाहीं, त्यांनाच या जबाबदारीच्या गोष्टी शिकवाव्या, इतरांना त्या शिकवूं नयेत हाच तो उपाय होय. ज्यांना या उच्च गोष्टी करण्याचें सामर्थ्य असतें ते आपलें सामर्थ्य होतां होईल तों प्रकट करीत नाहींत. या गोष्टी आपण प्रकट केल्या तर अनधिकारी लोकांच्या झुंडीच्या झुंडी आपल्या मागें लागतील व या गोष्टी आपणांकडून घेण्याचा प्रयत्न करतील याचें त्यांस भय असतें. अशा लोकांनीं जरुरी पडल्यास चमत्कारिक रीतीनें जगांत वागावें म्हणजे जनता त्यांच्या पाठीमागें न लागतां त्यांना वेडे म्हणून सोडून देईल अशी मुकुंदराजांनीं तोड सुचविली आहे. ते म्हणतात, "कां धरी पिशाच लीला। तरी होय जगावेगळा। लोकां न दाखवी डोळां। शहाणपण॥ विश्वसाक्षी योगिराणा। जाणे सर्व अंतरींच्या खुणा। परी तो वाटे जना। वेडिया ऐसा[1] ॥ त्यांनीं आपल्या शिष्यास पुढील इशारा दिला आहे की, " हें शास्त्र गौप्य करावें। कवणा स्फुट न सांगावें। तुझें तुवां अनुभवावें। गुरुगम्य हें॥ पशुजना श्रवणीं घालिशी। तरी काय सिद्धी होय तयासी। सद्भाव देखोनि कृपा करिसी। तरी निर्वाहकू पाहिजे ॥ गुरुसंप्रदायाची वाट। न धरितां करिशी प्रकट। तरी गुज घेऊन चावट। होतील बहु॥ (चावट म्हणजे रहस्य न समजून शाब्दिक बडबड करणारा) या लागीं हृदयीं गुप्त राख। स्वयें परमामृत चाख। सर्व योगियांचा तिलक।

---

१ मुकुंदराजकृत परमामृत १२, ३१–३३.

होशील तूं[१] ।। ज्ञानेश्वरांनींही त्याचाच अनुवाद करून "फार किति सांगों । सज्ञान तुम्ही जन । अर्थ हा समजोन । मौन्य धरा[२] ।।" असें सांगितलें आहे.

माणसाला डोंगराच्या शिखरावर चढून जावयाचें असलें तर तें दोन रीतीनें जातां येईल. डोंगराच्या सभोंवती प्रदक्षिणा करीत करीत व पुष्कळ नागमोडी वळणें घेत घेत त्याला शिखरावर जातां येईल. असल्या रस्त्याचा चढाव बेतशीर असतो. पण पुष्कळ वळणें घ्यावीं लागत असल्यानें पल्ला जास्त लांबीचा होतो. अर्थात् रस्ता चालून संपायला वेळ जास्त लागतो. मात्र चढाव बेताचा असल्यामुळें दर पावलागणिक फारसे श्रम वाटत नाहींत. होतां होईल तों वळणें घ्यावयाची नाहीत, सरळ रेषेनें तडक वर चढावयाचें, दर पावलागणिक जास्त उंची गांठावयाची असें करूनही शिखरापाशीं जातां येईल. हा मार्ग लांबीनें छोटा असल्यामुळें शिखर लवकर गांठतां येतें. पण चढाव उभटा असतो व श्रम जास्त पडतात. ज्याचे स्नायू बळकट असतील, एकदम चढून जाण्याची मेहनत ज्याला झेपेल आणि लवकर प्रवास संपविण्याचा ज्याचा निश्चय असेल त्यालाच ह्या उभ्या चढावाचा मार्ग जमतो.

## दोन मार्ग

माणसाच्या उत्क्रान्तीचे असे दोन मार्ग आहेत, एकाला पिपीलिका मार्ग (मुंगीचा मार्ग) म्हणतात, दुसऱ्याला विहंगम मार्ग म्हणतात.[३]

---

१ मुकुंदराजांच्या परमामृतांतील साक्षात्कार नावाचें १४ वें प्रकरण पहा. २ ज्ञानेश्वर गाथा आवटे ७८५.

३ टीप—रामदास म्हणतात, "पिपीलिका मार्ग लांबीचा । विहंगमेंचि धावणें ।।" पागारकरकृत समर्थ ग्रंथभांडार उत्तरार्ध पृ. ४३७ (जन्म सार्थकी कसा लावावा या नांवाचें श्लोकबद्ध विविध प्रकरण.) दासबोध २०, २, १० मध्यें ते म्हणतात— "पिपीलिका मार्गें हळुहळु घडे । विहंगमें फळासि गांठी पडे।। "

माणसाला बुद्धि, कर्तृत्व, नीतिमत्ता या सर्व गोष्टींचा परमावधीचा विकास करावयाचा आहे. सामान्य जनता पिपीलिका मार्गानें जाऊन हळू हळू त्या गोष्टींत प्रगति करते. वाटेंत अडथळा, आला कीं मुंगी जशी त्या अडथळ्याला बगल देऊन व वळण घेऊन पुढें जाते, तद्वत् सामान्य लोक हळू हळू वळणें घेत घेत स्वतः-चा विकास करीत असतात. पण कांही थोडे लोक विहंगम मार्गानें जातात. पक्षी जसा सरळ रेषेनें अंतराळ तोडीत तडक पुढें जाऊन झाडाच्या शेंड्यावर एकदम बसतो तद्वत् कांही लोकांचा प्रयत्न असतो. त्यांना सावकाशीनें वळणे घेण्याची पिरपीर करीत पुढें जाणें आवडत नाही. त्यांचे स्नायू बळकट असतात व निश्चयही बळकट असतो. उभा चढाव जलद चढण्याची त्यांनी हिंमत बांधलेली असते. स्वतःचे दोष टाकणे, बुद्धिमत्ता, नीतिमत्ता, कर्तृत्व यांच्या पोटात असलेल्या नाना गोष्टीची संपादणी करणे, हें अत्यंत जलदीनें करून आपला प्रवास लवकर संपविण्याची त्यांना मनीषा असते. महाराष्ट्रांतील संतांनी आपली सार्वजनिक चळवळ जरी पिपीलिका मार्गानें जाणाऱ्या बहुजनांकरितां केलेली असली तरी ते स्वतः विहंगम मार्गानें जात होते. त्या संतांनी आपल्या सभोंवतालीं जे निवडक लोक जमविले होते त्यांच्यांतही त्यांनीं विहंगम मार्गानें उत्क्रान्ति करण्याची ईर्षा निर्माण केलेली होती. हे संत व त्यांच्या सभोंवतीं गोळा झालेले निवडक लोक यांनीं आपल्या स्फूर्तीचे झरे आपल्या चळवळींत सर्व महाराष्ट्रभर वाहविले. पण या झऱ्यांचा उगम त्यांच्या विहंगम मार्गांतून झालेला होता हें ध्यानांत धरलें पाहिजे. संतांची स्फूर्ति व त्यांचें कार्य हें जर आपणांस समजून घ्यावयाचें असेल तर ज्या विहंगम मार्गानें ते संत स्वतः जात होते त्या मार्गाकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

हा विहंगम मार्ग[१] म्हणजे एक सुव्यवस्थित उत्क्रान्तिमार्ग आहे. त्या मार्गावर माणसाला नेटानें प्रयत्न करून सर्व गोष्टी लवकर साधाव्या लागतात. स्वतःच्या स्वभावांतील सर्व दोष-दुर्गुण नष्ट करून चित्तशुद्धि संपादणें, कर्तृत्वशक्ति, बुद्धिमत्ता, सहनशीलता, शहाणपणा वगैरे सर्व गुण वाढविणें या गोष्टी जलदीनें कराव्या लागतात. जसा एकाद्या विश्वविद्यालयानें विशिष्ट पदवीकरितां शिक्षणक्रम आंखलेला असतो तसा या मार्गावरचा शिक्षणक्रम आंखलेला आहे. त्यावर अनेक टप्पे आहेत. कांहीं माणसांनी त्यावरचे पुढचे टप्पे गांठलेले असतात, तर कांहींनीं त्या मार्गावर नुकतेंच पाऊल टाकलेलें असतें. या मार्गावर असतांना कांहींना सिद्धि प्राप्त होतात. पुष्कळांना निरनिराळ्या दर्जाचे आध्यत्मिक अनुभव मिळतात. या आध्यात्मिक अनुभवांना लोक प्रायः 'साक्षात्कार' असें नांव देत असतात.

आध्यात्मिक अनुभव म्हणजे काय त्याचें येथें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. आध्यात्मिक अनुभव म्हणजे स्वतःच्या कल्पनांचा विहार नव्हे, किंवा भावनांच्या ऊर्मीही नव्हत. एकाद्या सुंदर फुलाकडे पाहून कवीच्या हळुवार हृदयांत रमणीय भावना निर्माण होतात. ढगांच्या बदलत्या आकृतीमध्यें कित्येकांची प्रतिभा निरनिराळीं दृश्यें पहाते. एकादा स्वप्नाळू माणूस निवांतपणीं अनेक दिवास्वप्नांत गढून गेलेला असतो. अशा गोष्टींना अनुभव म्हणतां येणार नाहीं. त्या स्वतःच्या कल्पना असतात. अनुभव व स्वतःची स्वकपोलकल्पित कल्पना यांच्यामध्यें महदंतर आहे. घंटा वाजली म्हणजे आपणांस तिचा आवाज ऐकूं येतो, व आपणांला आवाजाचा

१ या विहंगम मार्गाचा उल्लेख जरी ग्रंथांत असला तरी तो मार्ग अंशतः गुप्त आहे. कालमानानुसार त्याची कांही माहिती आज जगाला देण्यांत आलेली आहे. ती वाचकांना थिऑसफीय वाङमयांत मिळेल. The Masters and the Path किंवा 'सिद्धपुरुष आणि त्यांचा संप्रदाय' या पुस्तकांत थिऑसफीय माहिती संकलित केलेली आढळेल.

अनुभव आला असें आपण म्हणतों. घंटा कोठें तरी दुसरीकडे असते, तिच्यावर लोळा आपटतो, घंटेंत कंप निर्माण होतात, ते कंप हवेला कंपित करतात व हे हवेंतले कंप आपल्या कानांत शिरून आपणांला ध्वनीचा अनुभव देतात. हा ध्वनीचा अनुभव स्वकपोलकल्पित नसतो. तो घंटेच्या लोळ्यापासून निर्माण होऊन विशिष्ट प्रक्रियेनें आपल्या कानांत शिरलेला असतो. अध्यात्म-सृष्टीतही दृश्य सृष्टींतल्याप्रमाणें घंटेसारख्या कांहीं गोष्टी असतात. तेथें त्यांच्या कांहीं क्रिया होऊन ते परिणाम विशिष्ट रीतीनें माणसाच्या आध्यात्मिक इंद्रियाच्या द्वारानें त्याच्या अतरंगांत शिरतात व त्यास अनुभव देतात. हे अनुभव निरनिराळ्या प्रकारचे असतात. कांहीं उच्च दर्जाचे असतात तर कांहीं सामान्य प्रतीचे असतात. पण घंटेंतून निघालेला ध्वनि जसा खरा असतो, तो आभास नसतो, तद्वत् अध्यात्माच्या भूमिकेवरचा अनुभवही खरा असतो, आभास नसतो. धर्माच्या अंतरंगांत नाना प्रकारचे असले आध्यात्मिक अनुभव समाविष्ट असतात.[१] महाराष्ट्रीय संतांना असे अनेक अनुभव आलेले आहेत. त्यांपैकीं कांहीं त्यांनीं आपल्या वाङ्मयांत ध्वनित केलेले आहेत. या संतांनीं जी चळवळ

---

१ आपण जेव्हा घंटेचा आवाज ऐकतों तेव्हा आवाज उत्पन्न करणारी घटा व आवाज ऐकणारे आपण अशा दोन वस्तु अस्तित्वांत असतात. पुष्कळ आध्यात्मिक अनुभवातही अशा दोन वस्तु असतात. तो अनुभव देणारी वस्तु असते पण ती अदृश्य असते. अनुभव घेणारे आपण तो अनुभव घेतों, पण दृश्यदेहाच्या ज्ञानेंद्रियानी तो न घेता अदृश्यदेहाच्या (सूक्ष्मदेहाच्या) ज्ञानेंद्रियानी घेत असतों. फार उच्च दर्जाचे जे काही थोडे आध्यात्मिक अनु-भव असतात त्यामध्यें अशा दोन स्वतंत्र वस्तु नसतात. ते अनुभव घंटेच्या आवाजासारखे बाहेरून आपणामध्यें शिरत नाहीत. स्वतःच्या पोटदुखी-प्रमाणें आंतून उत्पन्न झालेले असतात असें उपमेनें सांगतां येईल. पण अनु-भव कोणत्याही दर्जाचा असला तरी तो खरा असतो, स्वतःच्याच मनाचा खेळ किंवा आभास नसतो हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

केली त्यांतल्या सामान्य माणसांची भक्ति व श्रद्धा भोळीभाबडी असेल; पण संतांची स्वत:ची भक्ति व श्रद्धा भोळीभाबडी नव्हती. त्यांनीं स्वत: अंतरंगांतले आध्यात्मिक अनुभव घेतलेले होते. त्या अनुभवांचा खरेपणा त्यांना स्वत:ला पटलेला होता. त्या अनुभवांवर त्यांची भक्ति व श्रद्धा हीं आधारलेली असल्यामुळेंच त्यांना जनमनांत जिवंत स्फूर्ति निर्माण करतां आली.

**अध्यात्मांतील अनुभव**

होतां होईल तों या विहंगम मार्गावरील अनुभव सर्वांसमोर ठेवण्यांत येत नाहीत. रामदास म्हणतात 'कांही साक्षात्कार झाला। तो सांगो नये दुसऱ्याला। जरी आळकेपणें ( लोभिष्टपणानें ) सांगितला। तरी पुन: होणार नाही '।। .....'साक्षात्कार अलौकिक। प्रगट सहसा करूं नये[१]।। व 'आत्मस्थिति बोलों नये[२]'।। अध्यात्म मार्गावर जे नवशिके असतील त्यांना आपले साक्षात्कार लोकांस सांगण्याचा मोह पडतो. सामान्य लोकांना जो साक्षात्कार होत नाहीं, तो साक्षात्कार मला झाला आहे ही अभिमानबुद्धि त्यांना त्या साक्षात्काराची जनतेंत परिस्फुटता करण्यास प्रोत्साहन देते, व विहंगम मार्गावर अभिमानबुद्धीचा जबरदस्त अडथळा होत असल्यामुळें साक्षात्कार थांबतात. असें रामदासांनी कारण सांगितलें आहे, संतांनी होतां होईल तों स्वत:ची आत्मचरित्रें दिलेलीं नाहींत याचें कारणही तेच आहे. त्यांच्या जीवनांत महत्त्वाचे आध्यात्मिक अनुभव होते व ते तर प्रसिद्धपणें सांगणें योग्य नव्हतें. ते सांगितले तर बहुजनांस ते समजणार नाहींत, व गैरसमजुती मात्र सर्वत्र फैलावतील. सर्वांस समजण्याजोगा जो धर्मातील सुलभ भाग आहे, त्याच्यापासूनही जनतेंत किती तरी विचित्र समजुती पसरल्या आहेत. तेव्हां जो धर्माचा भाग आकलन करण्यास खरोखरीच कठिण आहे तो लोकांसमोर उघडपणें मांडल्यास किती दुष्परिणाम होतील त्याची कल्पनाच केलेली बरी.

---

१. पहा जुना दासबोध प्रकरण १५ २. पहा दासबोध १४, १, ७१.

पण संतांच्या ग्रंथांत गुप्त भाग असतो हें प्रत्येक जिज्ञासूला स्पष्ट व्हावें अशा धोरणानें त्यांनीं आपली ग्रंथरचना केलेली आहे. त्यांत कांहीं गुप्त भाग आहे हें वाचकांच्या ध्यानांत यावें व तो भाग जाणण्याची ज्यांची तीव्र अिच्छा असेल त्यांनीं त्या दिशेनें प्रयत्न करावा यासाठी--जरी संतानीं ते गुप्त भाग उघड करून सांगितले नसले तरी--आपल्या काव्यांत कांहीं गुप्त भाग आहेत हें त्यांनीं बिलकुल लपविलेलें नाहीं. उदाहरणार्थ तुकारामांनीं म्हटलें आहे: "गाढवभरी पोथ्या उलथिशी पानें। परि गुरुगम्य खुणे नेणशी बापा ॥"[१] समर्थांनी आपल्या दासबोधांत 'अभ्यासें कांहीं। गुरुगम्यास पाविजेत नाहीं ॥'[२] असें सांगितलें आहे. तेव्हां गुरुगम्य असें कांहीं खोल ज्ञान आहे व तें ग्रंथाचें अध्ययन करून मिळणार नाहीं हें वाचकांच्या लक्षांत येतें. 'आकाशमार्गी गुप्त पंथ। जाणती योगिये समर्थ। अितरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे'[३]॥ यावरून एक गुप्त पथ अस्तित्वांत आहे ही माहिती त्यास मिळते. बहुधा अनुभवाची अंगे। सकळ कळती संतसगें।[४]. यावरून चांगल्या माणसाशी सहवास करणें जरूर आहे हें त्याच्या मनांत भरतें. चांगली माणसें बहिरंग दृष्टीला ओळखीत नाहीत हें 'अंतस्थितीचिया खुणा। अंतर्निष्ठ जाणती'।[५] किंवा 'साधुसंताचिये खुणे। साधुसत जाणती'॥[६]. 'जीवन्मुक्तांचीं लक्षणें। जीवन्मुक्त जाणे' ॥[७] या शब्दांवरून स्पष्ट होतें. ज्याची जिज्ञासा तीव्र आहे तो असले शब्द वाचून त्या दिशेनें प्रयत्न करण्यास तयार होईल.

**एक धोका**

जगांत जशीं खरीं नाणीं असतात तशी खोटींही असतात. पण

---

१ आवटेकृत तुकाराम गाथा क्रमाक ४३४१; २ दासबोध ४, ४ १९; ३ दासबोध १, ९, ५; ४ दासबोध ४, ४,११; ५ दास बोध १, ४,३१, ६ दासबोध ६, ९, १८; ७ दासबोध ६, ९, ३३.

व्यवहारी माणसाला नाणें वाजवून त्याचा खरेखोटेपणा निवडतां येतो. ही निवड करण्यासाठीं समाजांत कांहीं सोयीही केलेल्या असतात. सरकारनें मापांवर व वजनांवर छाप मारलेला असतो व त्यावरून खरीं मापें व वजनें आपणांस ओळखतां येतात. दुकानदारानें लोण्यांत अथवा तुपांत भेसळ केली तर कायदा त्याला जाब विचारतो. युनिव्हर्सिटी माणसाच्या नांवापुढें पदव्या लावते व अमुक माणसानें डॉक्टरीचा किंवा वकिलीचा अभ्यास केला आहे कीं नाहीं हें त्याच्या त्या त्या पदवीवरून जनतेला समजून येत असल्यामुळें कोणाही माणसाला आपल्या कामासाठीं योग्य अशा डॉक्टरची अथवा वकिलाची निवड करणें सुलभ जातें. धर्माच्या अंतरंगांतील भाग जर सर्व जनतेसमोर आला तर त्यांतील खरेंखोटें निवडण्याला जनतेला आज कांहींच साधन उपलब्ध नाहीं. धर्माच्या अंतरंगांतील खरी नाणीं जर चवाठ्यावर मांडण्यांत आलीं तर त्यांची चलती बघून खोटीं नाणींही चवाठ्यावर येतील व त्यांतील खरेखोटेपणा सामान्य माणसाला निवडतां येणार नाहीं. धर्माच्या अंतरंगांतील साक्षात्कार मला झालेले आहेत अशी द्वाही जर तुकारामांनीं पसरविली[1] तर सालोमालोही

१ आज जगात कित्येक जीवन्मुक्त पुरुष विद्यमान आहेत असें थिऑसफीचें म्हणणे आहे व त्या जीवन्मुक्ताची कांही माहिती थिऑसफीय वाङमयांत दिलेली आहे. पण या माहितीचा फायदा घेऊन कांही मंडळी मी अमुक अमुक जीवन्मुक्त पुरुष आहे अशी द्वाही फिरवून जनतेला फसवीत आहेत. थिऑसफीय वाङमयात एका जीवन्मुक्त पुरुषाला Master K. H. या नांवानें संबोधण्यात येतें. मेक्सिको व क्यूबा या देशांत हें नांव धारण करणारा एक तोतया निर्माण झाला आहे. त्यानें निरनिराळ्या संस्था चालविल्या आहेत व त्याचा United Nations संस्थेशीं पत्रव्यवहारही आहे. रोममध्यें त्याचे अनुयायी आहेत. कांही दिवसांपूर्वी हा गृहस्थ फ्रान्समध्यें राहात होता. अमुक अमुक जीवन्मुक्तांशी आमचे संबंध

(पुढील मजकूर पृ. १३ वर पहा.)

तीच द्वाही पसरविण्यास पुढें सरसावेल आणि आज जगापाशीं अशी कोणतीही कसोटी नाहीं कीं, जिच्या साहाय्यानें तुकाराम हें खरें शंभर नंबरी सोनें आहे व सालोमालो हें मुलामा दिलेलें सोनें आहे हा निर्णय लोकांना ठरवितां येईल. कायद्याचें शास्त्र, वैद्यकीचें शास्त्र यांची बहुजनांना थोडीशी जानपछान आहे. तीं शास्त्रें शिकविण्याच्या शिक्षणसंस्था समाजांत आहेत. त्या शिक्षणसंस्थांत शिरून कोण पदवीधर झालेला आहे हें लोकांस समजूं शकतें व वकिलीचें व डॉक्टरीचें काम करणारा माणूस त्यांस ओळखतां येतो. जगाची उत्क्रांति आज इतपत झालेली आहे. पण अध्यात्मशास्त्रांतील श्रेष्ठ गोष्टींच्या आसपासही आजचें जग येऊन पोहोंचलेलें नाहीं. मानवी उत्क्रांतीचें जें गिरिशिखर त्याची बहुजनांना आज बिलकुल जानपछानही नाही. सामान्य जनतेला मागें टाकून त्या गिरिशिखराच्या जवळ जे जाऊं लागले आहेत त्या संतांची खरी कल्पना सामान्य जनांना येत नाही. संतपद म्हणजे काय, त्या टप्प्याशीं पोहोंचलेल्या माणसाला कोणते आध्यात्मिक अनुभव येतात, याची योग्य अटकळही आजचें जग करूं शकत नाहीं. आजच्या जगांतील बहुजनसमाज उत्क्रांतिमार्गावर संतांच्या फारच पाठीमागें असल्यामुळें संतांचे अनुभव त्यांच्यापासून दडवून ठेवले तर त्यांचा फारसा तोटा नाहीं. पण ते त्यांच्यासमोर उघडपणें मांडल्यास त्यांचे तोतये निर्माण होऊन जगाचें फार नुकसान करतील. धर्मांतील अंतरंगाचा भाग गुप्त ठेवण्याचें हें एक महत्त्वाचें कारण आहे.

---

(मागील पानावरून)

असून त्याच्याकडून आम्हांस संदेश मिळतात असें सागणारीं खरीं खोटीं पुष्कळ माणसें अनेक देशांत हल्लीं दिसूं लागली आहेत. ( जास्त माहितीसाठीं Theosophist अंक एप्रिल १९४७ पृ. ४४–५१, ऑगस्ट पृ. २९८, नवंबर पृ. १०८–१०९ पहा.) या बाबतींत खरा कोण व खोटा कोण हें ठरविणें सामान्य जनतेला जवळजवळ अशक्य आहे.

तें कसेंही असलें तरी मानवी उत्क्रांतीचा प्रवाह मंद गतीनें कां होईना, पण अखंड चालू आहे आणि जगांतील माणसें थोड्या प्रमाणांत तरी शहाणीं, सद्वर्तनी व सुसंस्कृत होत आहेत, सुधारत आहेत, आणि पूर्वी जें ज्ञान गुप्त ठेवलेलें होतें त्यापैकीं किंचित् किंचित् भाग पेलण्याची पात्रता त्यांच्या अंगीं हळूहळू येत आहे. अर्थात् त्यामुळें त्या गुलदस्तांत ठेवलेल्या ज्ञानाचे कांहीं थोडे भाग सांप्रत उघड केले जात आहेत. महाराष्ट्रीय संतांनींही गांठोड्यांत बांधलेल्या या गुप्त ज्ञानाच्या दोऱ्या थोडथोड्या सैल केल्या होत्या आणि विसाव्या शतकांत जी थिऑसफी नांवाची चळवळ जगांत पसरत आहे तींत या दोऱ्या आणखीही सैल केल्या जात आहेत. गुप्त ज्ञानापैकीं फार मोठा भाग जनतेसमोर हल्लीं सरसकटपणें मांडण्यांत येत आहे असें बिलकुल नाहीं; पडद्याचें एक टोंक जरासें वर उचललें जात आहे इतकेंच म्हणतां येईल. त्यामुळें या पडद्याआंतलें जें नवें दृश्य किंचिन्मात्र दिसूं लागत आहे त्यानें महाराष्ट्रीय संतांच्या कार्यावर एक नवीन प्रकाश पडत आहे व संतांच्या चळवळीचें जें अंग आजवर उपेक्षिलें गेलें होतें तें समजूं लागलें आहे. त्या अंगाचें विवेचन आपण या पुस्तकांत क्रमशः करूं या.

---

## प्रकरण २ रें

# साक्षात्कारांची पार्श्वभूमि

महाराष्ट्रीय संत हे नुसते कवि नव्हते. कवि म्हणजे जो रसाळ वाङमय लिहितो, सुंदर हृदयस्पर्शी व भावनात्मक पद्यवाङमय लिहितो तो. महाराष्ट्रीय संतांमध्यें कवित्व आहे. तेव्हां त्यांना कवि म्हणावें लागेल. पण ते नुसते कवि नव्हते. ते संतही होते. संत म्हणजे शुद्धाचरणी, ध्येयवादी व ईश्वरनिष्ठ असा लोकसंग्रहास वाहिलेला पुरुष. बऱ्याच महाराष्ट्रीय संतांमध्यें कवीच्या अंशापेक्षां संताचा अंश अधिक होता. कवि आपल्या कल्पनाविहारांत दंग असतो. त्या कल्पना सत्यास धरून आहेत कीं सोडून आहेत याचा तो विचार करीत नाहीं. पण संताला सत्याचें महत्त्व असतें. त्याला स्वतःचें अज्ञान व स्वतःचे दुर्गुण टाकण्याची व सद्‌गुण संपादण्याची इच्छा असते. जगांतील दुर्गुण कमी व्हावे व सद्‌गुण वाढावे असा त्याचा प्रयत्न असतो. आपण अधिकाधिक प्रमाणांत ईश्वराजवळ जावें, त्याच्यासारखें समर्थ, ज्ञानी व प्रेमळ व्हावें हें त्याचें ध्येय असतें. इतरांसही ते आपणांसारखे करूं पहातात. तेव्हां संताचें काव्य इतर कवींच्या काव्यापेक्षां वेगळें असावें हें सहजच आहे.

आपल्या मतें वाङमयांतील उत्कृष्ट भाग कोणता तें ज्ञानेश्वरांनीं एका ठिकाणीं सांगितलें आहे. ते म्हणतात "वाचे बरवें कवित्व। कवित्वीं बरवें रसिकत्व। रसिकत्वीं परतत्त्व। स्पर्शु जैसा[१]॥

---

१ ज्ञानेश्वरी १८, ३४७

म्हणजे वाङमयांत उत्तम भाग काव्य; काव्यांत उत्तम भाग त्यांतला रस, व रसांतील उत्तम भाग परतत्त्वस्पर्श होय. माणसाच्या अंतरंगामध्यें, तसेंच सृष्टीच्या अंतरंगामध्यें एक परतत्त्व अथवा उच्च तत्त्व आहे. शेगडीत जसा विस्तव असतो, मोटरींत जसें एंजिन असतें, घड्याळांत जशी स्प्रिंग असते, तद्वत् माणसाच्या व सृष्टीच्या पाठीशीं हें परतत्त्व असतें. हें परतत्त्व माणसाला व सृष्टीला निर्माण करतें व चालना देतें. या परतत्त्वाला निर्वाण, ब्रह्म, आत्मा, ईश्वर अगर तत्सम नांवें देण्यांत येतात. या परतत्त्वांत ज्ञानाची परमोच्च स्थिति असते. उत्तम काव्य तें होय की ज्यांतील रस त्या परतत्त्वाच्या स्पर्शानें पुनीत झालेले असतात. जर काव्यांत असला खोल भाग नसेल तर ज्ञानेश्वर त्याला उत्तम म्हणणार नाहींत. रामदासांची विचारसरणी ही त्याच वळणाची आहे. त्यांनीं कवित्वाचे धीट, धीटपाठ व प्रासादिक असे तीन वर्ग केले आहेत.[१] कवि आपल्यास वाटेल तें ज्यांत लिहितो तें कवित्व 'धीट' होय. पूर्वीच्या ग्रंथांचें पाठान्तर करून कवि जें लिहितो तें कवित्व 'पाठ' होय. दोन्ही प्रकार ज्यांत असतात तें 'धीटपाठ' होय. यापेक्षां जें वरच्या दर्जाचें कवित्व असतें त्याला रामदास 'प्रासादिक' म्हणतात. या प्रासादिक काव्याचीं वर्णनें 'जेणें भक्तिमार्ग कळे । त्या नांव कवित्व । जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व । जेणें तुटे संसारबंधन । तया नांव कवित्व । अशी त्यांनीं केलीं आहेत.

यावरून हें दिसून येईल कीं, संतांचें काव्य व इतर कवींचें काव्य ह्यांत फरक असणारच. इतर कवींत जें नाहीं असें कांही तरी सत्यदर्शन, असा कांहीं उच्च अनुभव संतांच्या काव्यांत असावयाचा. स्वतःच्या दासबोधाबद्दल रामदास लिहितात कीं, भक्ताचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें । समर्थ

१ पहा दासबोध दशक १४ समास ३

कृपेचीं वचनें ।। तो हा दासबोध ।। . . . आतां नलगे संस्कृत । अथवा ग्रंथ प्राकृत । माझा स्वामी कृपेसहित । हृदयीं वसे[१] ।। म्हणजे माझ्याबद्दलचा अभिमान धरून श्रीरामचंद्रांनी मजवर कृपा केली, त्या कृपेचीं वचनें म्हणजे माझा दासबोध ग्रथ होय. जोंवर माझ्या हृदयांत माझा स्वामी अधिष्ठित आहे तोंवर मला संस्कृत वा प्राकृत ग्रंथ पहाण्याची गरज नाही. अर्थात् दासबोध रामदासांच्या वैयक्तिक कल्पनांवर आधारलेला नाही. स्वतःच्या ज्ञानेश्वरीबद्दल ज्ञानेश्वर सांगतात । 'एवं गुरुक्रमें लाधलें । समाधिधन तें आपुलें । तें ग्रंथें बोधोनि दिधलें । गोसावी[२] मज' । आपल्या गुरूपासून मिळालेल्या समाधिस्थितीतील धनाचा माझ्या गुरूंनी मला या ग्रंथानें बोध करून दिलेला आहे. म्हणजे माझ्या गुरुपरंपरेंत जें समाधिस्थितीतलें ज्ञान उपलब्ध होते तें या ग्रथांत मी वाचकांसमोर ठेविले आहे. याचा थोडा खुलासा करण्यासाठी ज्ञानेश्वर म्हणतात ' जो सर्वोपकारी समर्थु । सद्गुरु श्री निवृत्तिनाथु । रहाटत असे मजही आंतु । रिघोनियां '। माझ्या अतरगात माझ्या गुरूंनी प्रवेश केला असून ते तेथें वावरत आहेत.[३] " आतां देईजे अवधान । तुम्ही बोलाविला मी बोलेन । जैसें चेष्टे सूत्राधीन दारुयंत्र "[४]।। लांकडाची कळसूत्री बाहुली दोरीनुसार जशा हालचाली करते तद्वत् तुम्ही सद्गुरु सागाल तो अभिप्राय मी माझ्या बोलण्यानें प्रकट करीन, सर्व श्रोत्यांनी त्याकडे लक्ष द्यावें.

---

१ दासबोध २०, १०, ३० व ५, ३, ३४; २ ज्ञानेश्वरी १८, १७६३; ३ ज्ञानेश्वरी १८, १७२८; ४. ज्ञानेश्वरी १, ८१; एकनाथी भागवताच्या शेवटी एकनाथांनीही स्वतःच्या ग्रथासबंधानें हीच उपमा योजली आहे. एकनाथी भागवत ३१, ५०२ पहा. त्यांनी आणखी असेंही म्हटलें आहे कीं बाप लहान मुलाचा हात धरून जशी अक्षरे लिहवितो तसा हा माझा ग्रंथ माझे गुरु जनार्दन स्वामी यांनी माझ्या द्वारानें लिहिला आहे (धरोनि बालकाचा हात । बाप अक्षरें स्वयें लिहवित । तैसा एकादशाचा अर्थ । बोलविला परमार्थ जनार्दनें ।। ३१, ४९७)

दासोपंतही लिहितात कीं मी भाष्यांच्या आधारानें विवरण करीत नाहीं तर "स्वानुभव येथिचें प्रमाण" आहें.[१] संतांना परतत्त्व-स्पर्श होत असे, कांहीं तरी उच्च अनुभव त्यांना मिळत असत व त्या उच्च अनुभवाचे झरे ते आपल्या ग्रंथांतून वाहवीत असत हें वरील वचनांवरून स्पष्ट होईल.

कोठल्या तरी उच्च अशा कोठारांतून आपण आपलें ज्ञान आणिलें आहे, ती स्वतःची स्वतंत्र कमाई नाहीं असें संत वारंवार सांगतात. उदाहरणार्थ तुकाराम म्हणतात, 'करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरीची ।। माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वभर बोलवीतो[२]।। तसेंच ' काय म्यां पामरें बोलावी उत्तरें । परि त्या विश्वंभरें बोलवीलें[३]।।' आणखी 'वच-नाचा अनुभव हातीं । बोलविती देव मज । परि हें नकळे अभाविकां । जडलोकां जीवांस । अनश्रुत हें प्रासादिक । कृपाभीक स्वामीची । तुका म्हण बराबरी । जातों तरी मांगत ।।[४] म्हणजे मी जें बोलतों त्याचा अनुभव मला असा आहे की, मला देव बोलवितात, पण तें अभाविक व अज्ञानी लोकांस समजत नाही. तरीही इतरत्र ऐका-वयास न मिळणारे हे माझे जे प्रासादिक बोल आहेत ते माझ्या स्वामीनी मला कृपेची भीक घातल्यामुळें निर्माण झाले आहेत हें मी पुनः सांगत असतोंच.

**संतांची मनःस्थिति**

अतरगांत खोल खोल शिरून जर संत आपलें काव्य प्रकट करीत असले तर त्या वेळी शांत व निवान्त मनःस्थितीची त्यांना जरूर असणार. अशा उच्च व निवांत मनःस्थितींत असतांना जे

---

१ पांगारकरकृत मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ पृष्ठ १४७

२ जोग यांची तुकारामांची गाथा ६०५

३ जोग यांची तुकारामांची गाथा २१६२

४ जोग यांची गाथा २३

अनुभव माणसाला मिळतात ते त्याला स्वतःला त्याचवेळीं इतर कवींप्रमाणें कागदांवर लेखणीनें लिहिणें जमत नाही. या कारणास्तव पुष्कळ संतांना लेखक जरूर पडले होते. संत आपल्या हृदयांतील जाणिवेच्या उच्च उच्च पायऱ्या चढत, तेथील अनुभवाचे सहजोद्‌गार त्यांच्या मुखानें बाहेर पडत, व ते दुसऱ्या कोणास तरी टिपून घ्यावे लागत. तुकारामांचे सहजोद्‌गार संताजी जगनाडे टिपीत असत. रामदासांचे लेखक कल्याण होते. 'समर्थे बोलावें, येणें लिहावें' असा कल्याण स्वामीबद्दल उल्लेख आहे[१] इतर संतांचीं वचनें कोण लिहीत असे त्याची कांही माहिती जनाबाईनें दिली आहे. ती सांगते की, ज्ञानेश्वरांचा लेखक चिदानदबोवा होता. निवृत्तिनाथांचे बोल सोपानदेव लिहून घेत. मुक्ताबाईची वचनें स्वतः ज्ञानेश्वर टिपीत. सांवता माळी व चोखा मेळा यांचे लेखक अनुक्रमें काशिबा गुरुव व अनत भट हे होते.[२]

तैसें आध्यात्मशास्त्री इये। अंतरगचि अधिकारिये। परी लोक वाक्चातुर्ये। होईल सुखिया ।। असें ज्ञानेश्वर म्हणतात. म्हणजे सतांचे ग्रथ अध्यात्मशास्त्रविषयक आहेत. जीवनाच्या अंतरंगाला जो महत्त्व देईल त्यालाच ज्ञानेश्वरीसारखे हे ग्रंथ नीट समजतील. इतरांना फक्त त्यांतल्या भाषासौदर्याचें सुख मिळेल. ते वाचावे कसे याबद्दल संतांनी इशारा दिला आहे. शब्दांविषयींचा वाद करून किंवा बुद्धिवादाची चर्चा करून ते नीट समजणार नाहींत. केळें खातांना आपण जशी त्याची साल काढून टाकतों तशी शब्दरूपी साल काढून टाकून आपण त्यांतला अर्थ ग्रहण केला पाहिजे असें 'आहाच (दिखाऊ) बोलाची वालीफ (त्वचा) फेडिजे' या शब्दांनीं ज्ञानेश्वर सांगतात. याच बाबतीत ते आणखी म्हणतात— 'तियां परी श्रोतां । अनुभवावी हे कथा । अति हळूवारपण चित्ता

१ टीप. पहा महाराष्ट्र सारस्वत (आवृत्ति शके १८७३) पृ ९८५

२ पहा आवटे याच्या सकलसतगाथेतील जनाबाईची गाथा क्रमांक २७२. या अभंगांत अपपाठ असल्यामुळे काही शब्दाचा अर्थ नीट लागत नाही

आणुनीयां ॥[१] म्हणजे मन अत्यंत हळुवार करून अध्यात्म ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे. 'ऐसें हळुवारपण जरी येईल। तरीच हें उपेगा जाईल। एरव्हीं आघवी गोष्टी होईल। मुक्या बहिरयाची' ॥ जर मन शात व हळुवार न झालें तर मुक्या–बहिऱ्याच्या गांठीसारखा परिणाम होईल. मुका बोलू शकत नाहीं व बहिऱ्याला ऐकूं येत नाहीं तसें होईल. संतांचे ग्रथ कसे वाचावे याची कांहीं कल्पना वरील इशाऱ्यावरून येऊं शकेल.

जेव्हां सत विद्यमान होते तेव्हां त्यांच्या जवळच्या लोकांस त्यांचे ग्रंथ समजण्याचें एक विशेष साधन उपलब्ध होतें. ज्या गोष्टी त्यांनीं ग्रंथांत स्पष्ट सांगितल्या नाहीत, ज्या अशतः अथवा पूर्णतः गुप्त ठेविल्या आहेत, त्या संतांच्या मुखानें समजून घेणें त्यांना शक्य होतें. प्रत्येक मोठ्या संताभोवतीं शिष्यसमुदाय गोळा झालेला असे. जे अंशतः किंवा पूर्णतः गुप्त ठेवलेले अंतरंगांतील अनुभव, ते आपल्या शिष्यांना संत स्वतः उघड करून सांगत असत. हे शिष्य सच्छील असत. पैसा, सत्ता, लोकेषणा, विषयसुख, लोभीपणा ह्यांचें आकर्षण या शिष्यांच्या मनावर प्राकृत जनांपेक्षां कमी असे. त्यांना कांही गोष्टी सांगितल्या तर त्यांपासून दुष्परिणाम होण्याचा फारसा संभव नसे. गैरसमज होऊं नये यासाठीं शिष्याला त्याच त्याच गोष्टी पुनःपुनः स्पष्ट करून सांगण्याची सतांना संधि मिळे शिष्यांवर त्यांची देखरेख असे. अमुक अमुक शिस्त त्यांनी पाळली पाहिजे, आपल्या जीवनाला अमुक अमुक दिशा त्यांनी लावली पाहिजे असे नियम त्यांवर बंधनकारक असत. आपल्या ग्रंथांत स्पष्ट न केलेल्या अनुभवाच्या गोष्टी असल्या शिष्यांना सांगण्यांत धोका नसल्यामुळें संत त्या गोष्टी त्यांना स्वतः सांगत. शिष्य समुदाय गोळा करण्यांत त्यांचा हा एक हेतु असे. हल्ली आपण फक्त त्यांचे ग्रंथ वाचतों. त्या ग्रंथांतील खोल भाग समजण्याला त्यांच्या शिष्यांना जी मदत होती ती आजच्या वाचकाला

१ पहा ज्ञानेश्वरी १, ५७; व ६, २६

तसेंच शाळाकॉलेजांतील शिक्षकाला आणि विद्यार्थ्याला मिळत नाहीं. आजचे अभ्यासू फक्त माहिती मिळवूं पहात असतात. जुन्या शिष्यांसारखी त्यांची कोणत्याच प्रकारची आध्यात्मिक तयारी नसते. अध्यात्मशास्त्रांतील मूलभूत गोष्टी त्यांना माहीत नसतात आणि माहीत असल्या तरी त्या मान्य नसतात. स्वतःच्या जीवनाला कोणत्याच प्रकारची शिस्त लावण्याची त्यांची इच्छा नसते. चित्ताला जें हळुवारपण आणावयाचें तेंही ते आणूं शकत नाहींत. तेव्हां संतांच्या ग्रंथांचा खरेपणा त्यांना पटत नाहीं व त्यांतील रहस्य त्यांना समजत नाही याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

जी माणसें विहंगम मार्गानें स्वतःची उत्क्रान्ति करीत असतात तीं माणसें बहुधा स्वतःची जाणीव ध्यानधारणांचा अवलंब करून उंच उंच नेण्याच्या प्रयत्नांत असतात. ती माणसें भाविक असल्यास भक्तीच्या जोरावर त्यांची ध्यानधारणा फलद्रूप होते. हा जाणिवेचा विषय जनतेला अपरिचित असल्यामुळें त्याचा येथें अधिक खुलासा करणें अवश्य आहे. पूर्वीं पाश्चात्य मानसशास्त्रज्ञांना वाटे की, जागेपणी माणसाची जी जाणीव असते तितकीच तिची मर्यादा होय. पण अलीकडे शेंपन्नास वर्षे हिप्नॉटिझम् स्वप्नें, मनाचे रोग वगैरेंचें संशोधन करून माणसाच्या जाणिवेला दोन दालनें असतात असें ते म्हणूं लागले आहेत. जागेपणीं माणसाची जी जाणीव असते ती एका दालनांतील जाणीव होय. तिला जागृत जाणीव किंवा Conscious Mind असें म्हणतां येईल. याखेरीज माणसाची जाणीव दुसऱ्या एका दालनांत व्यवहार करीत असते असें शास्त्रज्ञ सांगतात. त्या दालनाला Sub-conscious mind, sub—liminal consciousness. वगैरे नांवें त्यांनीं दिलीं आहेत. माणूस झोपेंत बडबडतो, एकादे वेळीं झोपेंत उठून एकादी गोष्ट करतो, पण त्याची आठवण त्याला जागृतींत रहात नाहीं. कारण हे झोपेंतले व्यवहार

जाणिवेच्या दुसऱ्या दालनांत झालेले असतात. माणूस जागेपणचे नाना व्यवहार करीत असतांना त्याची जाणीव जागृतीच्या दालनांत असते, पण त्याच वेळी दुसऱ्या दालनांतले व्यवहारही पुष्कळदां चालू असतात. मात्र ते जागृतीच्या दालनांत शिरू शकत नाहीत.[१] माणसाला जागृतीत माहीत नसलेल्या अनेक गोष्टी या दुसऱ्या दालनांत वावरत असतात. माणसानें दाबून टाकलेल्या वासना व त्याच्या भंगलेल्या आशा याही याच दालनांत असतात. मानस-शास्त्रांतील नवीन सशोधनाची ही अशी शिकवण आहे.

**जाणिवेच्या पायऱ्या**

उपनिषदांच्या व योगशास्त्राच्या वाङ्मयांत माणसाच्या जाणिवेबद्दल अधिक माहिती आहे. ती लक्षांत घेतल्यास जाणिवेचा प्रश्न सुलभ होईल. माणसाच्या मनाच्या (अथवा जाणिवेच्या) अनेक 'अवस्था' असतात. माणसाच्या सभोंवती अनेक 'लोक' असतात आणि त्या लोकांत व्यवहार करण्याला त्याला अनेक 'देह' असतात. अवस्था, देह व लोक याचा पडताळा असतो. प्रस्तुत ग्रंथकार (समजा) टेबलावर बसून आपलें नांव या पुस्तकावर लिहीत आहे व त्या पुस्तकांचा वाचक समुद्रकांठी एका बागेंत तें वाचीत बसला आहे. दोघेही जागृति नांवाच्या अवस्थेत आहेत. त्या अवस्थेंत असतांना त्या दोघाच्या सभोवती विशिष्ट परिस्थिति आहे. ग्रंथकाराच्या कागदाखाली टेबल आहे. त्याच्या सभोंवती त्याच्या घराच्या भिंती आहेत. वाचकाच्या पायांखालीं जमीन आहे. डोक्यावर आकाश आहे. जवळच भोंवतालीं झाडें आहेत; व एका बाजूस समुद्राचा अफाट विस्तार पसरलेला आहे. टेबल,

१ ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे 'आणि जागतीये दशे । स्वप्न लपाले असे । नातरी अंवसे । चद्र गूढू । ज्ञानेश्वरी १३, ७७. अमावास्येला चद्र नष्ट झालेला नसतो; तो असतो, पण अप्रकट असतो. तद्वत् जागृतीचें दालन उघडें असतांना 'स्वप्न' नष्ट झालेलें नसतें, ती स्वप्नस्थिति जागृतीमागच्या दालनांत लपलेली व अप्रकट असते असें ज्ञानेश्वर म्हणतात.

घर, जमीन, झाडें, आकाश, समुद्र ही परिस्थिति ज्या ठिकाणीं आहे त्याला भूलोक, मर्त्यलोक, इहलोक, पृथ्वी, अशी नांवें आपण देतों. त्या ठिकाणीं माणसें ज्या देहानें आपले व्यवहार करतात त्याला शरीर, दृश्य देह, जड देह अशा प्रकारची नांवें आपण देतों. देहांतील इंद्रियांच्या साहाय्यानें आपण या लोकांतील हिंडण्या-फिरण्याचे, ऐकण्यापाहण्याचे सर्व व्यवहार करतो. थोडक्यांत सांगावयाचें तर जागृतिनामक 'अवस्थे'त जड 'देहाने' माणूस भू-'लोकी'चा व्यवहार करतो. माणसाच्या जाणिवेच्या अशा अनेक अवस्था आहेत. त्यांना जागृति, स्वप्न, सुषुप्ति अशी नांवें आहेत. त्याला अनेक देह आहेत. त्याना अन्नमय कोष, प्राणमय कोष, अथवा जडदेह, सूक्ष्मदेह, कारणदेह वगैरे नांवें आहेत. त्याच्या सभोंवती अनेक लोक आहेत. त्यांना भूलोक, भुवर्लोक, स्वर्-लोक वगैरे नावें आहेत. माणसाचे मन (त्याची जाणीव) या वेगवेगळ्या देहांनी, या वेगवेगळ्या लोकांत, या वेगवेगळ्या अव-स्थांचा अनुभव घेऊ शकते. खरोखरी जितके देह तितके लोक व तितक्या अवस्था सृष्टीत आहेत. पण निरनिराळ्या ग्रंथांत या विषयाचें निरनिराळ्या दृष्टीनी वर्णन केलेले असल्यामुळें अवस्था, लोक व देह यांचा सपूर्ण व ततोतत असा पडताळा ग्रथांत सांपडत नाही. उदाहरणार्थ, मांडूक्य उपनिषदांत जागृति, स्वप्न व सुषुप्ति अशा जाणिवेच्या तीन अवस्था सांगितलेल्या आहेत. कांहीं ग्रथांत तुर्या नांवाची चवथी अवस्था दिलेली आहे. महाराष्ट्र संतांनी उन्मनी नांवाची आणखी पांचवी अवस्था सांगितलेली आहे. त्यामुळें अमुक अवस्थेंत अमुक देह अमुक लोकांत कार्य-क्षम असतो असा सर्व ग्रथांस संमत असणारा पडताळा बिनचूकपणें सांगतां येणार नाही. एका वर्गीकरणांत जी एक अवस्था दिलेली असेल तिच्यांत दुसऱ्या वर्गीकरणांतील दोन अवस्था समाविष्ट होत असण्याचा संभव असल्यामुळें प्रत्येक अवस्थेचा नक्की अर्थ काय व तिच्या मर्यादा कोणत्या हें निश्चितपणानें ग्रंथावरून ठर-

वितां येत नाहीं. जोंवर प्रत्यक्ष योगाभ्यास करून विशिष्ट अवस्थेंत माणसाला जावयाचें नाहीं, तोंवर वरील पडताळा तंतोतंत न जुळला तरी त्याची मोठीशी अडचण होते असें नाही. इतकें स्पष्ट आहे कीं, घराला जसे अनेक मजले असतात तसे माणसाच्या जाणिवेलाही अनेक मजले असतात. प्रत्येक मजल्यावर माणूस वेगळ्या देहानें व्यवहार करतो, वेगळें कार्य करतो आणि वेगळें ज्ञान मिळवितो. प्रत्येक मजल्यावर माणसासभोंवतालची परिस्थितीही वेगळी झालेली असते.

सामान्य प्रतीचा माणूस जागृत स्थितीत असतांना दृश्यदेहानें भूलोकांत नाना व्यवहार करतो. फक्त पांच ज्ञानेंद्रियांचा व पांच कर्मेंद्रियांचा त्याचा दृश्य देह कार्यक्षम झालेला असतो व त्यामुळें भूलोकाच्या क्षेत्रांत त्याचे व्यवहार होत असतात व ते व्यवहार करीत असतांनाची त्याच्या मनाची जी अवस्था असते तिला आपण जागृति म्हणतों. माणसाला आणखी दुसरे देह आहेत. कोणी त्यांना प्राणमय कोष, मनोमय कोष वगैरे नांवें देतात. कोणी त्यांना सूक्ष्म देह, कारण देह अशी नांवें देतात. सामान्य माणसांचे हे देह आज कार्यक्षम झालेले नाहीत. दोन महिन्यांच्या लहान अर्भकाचा देह जसा क्रियाशून्य असतो तसे सामान्य माणसांचे हे अितर देह क्रियाशून्य असतात. लहान अर्भकाची टाळू भरलेली नसते. त्याला पक्वान्नें पचत नाहीत. त्याला हात पाय असले तरी हातानें जिन्नस उचलतां येत नाहीं, पायानें चालतां येत नाहीं; जीभ असली तरी बोलतां येत नाहीं. सामान्य माणसाचे जे दुसरे देह असतात ते असल्या बालदेहाप्रमाणें असमर्थ असतात. त्यामुळें सामान्य माणसाला जाणिवेच्या वरच्या मजल्यावर चढून तेथील ज्ञान मिळवितां येत नाहीं व तेथें व्यवहार करतां येत नाहीं. वरच्या भूमिकेवरचें ज्ञान उच्च प्रकारचें असतें. तेथें जो व्यवहार होतो तोही उच्च प्रकारचा असतो. विहंगममार्गाला जो माणूस लागला त्याला हें उच्च ज्ञान मिळविणें अवश्य असतें. त्यासाठीं

त्याला स्वतःचे अदृश्य देह कार्यक्षम करावे लागतात. सद्वर्तन, सत्संग, ध्यानधारणा वगैरे उपायांनीं हें साधतें. ज्याची प्रगति थोडी झाली असेल तो जागृत जाणिवेच्या वरचा पहिला मजला चढतो, अर्थात् भूलोकाच्या पलीकडचा जो लोक आहे तेथें व्यवहार करावयास शिकतो आणि तेथील अनुभव व ज्ञान मिळवितो. ज्याची प्रगति जास्त झाली असेल तो आणखी त्याच्याही वरचे मजले चढतो आणि जास्त उच्च दर्जाचे अनुभव मिळवूं शकतो.

**संतांची तयारी**

तुम्हां आम्हांला जे अनुभव मिळत नाहींत ते महाराष्ट्रीय सतांना मिळत होते, याचें कारण त्यांनी आपल्या आयुष्यासमोर जनसेवेचें व ईश्वरप्राप्तीचें ध्येय ठेवून जीवनाला शिस्त लाविली होती, बऱ्याच प्रमाणांत स्वतःची चित्तशुद्धि केलेली होती व गुरूच्या साहाय्यानें भक्तीच्या जोरावर ध्यानधारणा करून ते जाणिवेच्या उच्च उच्च पायऱ्या चढू पहात होते हें होय. जाणीव उच्च झाली, खोल आणि विस्तृत झाली की, सामान्य माणसाला अदृश्य आणि अगम्य वाटणारे अनुभव त्या जाणिवेच्या कक्षेंत येतात. अशा तऱ्हेच्या जाणिवेच्या उच्च उच्च अवस्थांत जाण्याची संतांची खटपट असल्यामुळें त्यांच्या टप्प्यांत उच्च अनुभव आलेले आहेत.

बारकाईनें संतांचे ग्रंथ वाचल्यास त्यांच्या ग्रथांत हा सारा भाग मांडलेला दिसून येईल. त्र्यंबकराय कवीच्या बालबोध नांवाच्या ग्रंथांत 'जैसें सप्तकंचुक पिड । तैसें सप्तावरण ब्रह्मांड' ।।[१] असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ असा की, माणसाच्या अंगावर जशीं कपड्यांचीं अनेक आवरणें असतात तशीं ब्रह्मांडांत 'लोक'रूपी सात

---

१ बालबोध खंड १, दशमकथन ९३.

आवरणें आहेत. तसेंच व्यक्तीलाही 'देह'रूपी सात आवरणें आहेत. रामदासांनींही सप्तकंचुक ब्रह्मांड। त्यांत सप्तकंचुक पिंड ॥[१] असें म्हटलें आहे. सृष्टींत जे अनेक लोक आहेत ते एकच जागा व्यापीत असून त्यांचीं द्रव्यें एकमेकांत मिसळलेली असतात असें 'पृथ्वीचें सर्वांग भेदुनी। राहिलें गगन ॥[२] या शब्दांनी रामदासांनी सांगितलें आहे. दिवा लावला तर दिव्याची ज्योत आणि आकाश हीं एकमेकांस अडथळा न करतां एकाच जागीं जशीं राहूं शकतात तसे सृष्टीतले निरनिराळे लोक एकमेकांस अडथळा न करतां एकाच ठिकाणी परस्परांस व्यापून रहातात असा अधिक खुलासाही समर्थांनी केलेला आहे. ते म्हणतात : आकाशी दीपास लाविलें। दीपें आकाश परतें केलें। हे तों घडेना पाहिलें। पाहिजे श्रोतीं ॥[३] तुकाराम म्हणतात–आमचा स्वदेश। भुवनत्रयामध्यें वास। मायबापांची लाडकी। कळो आलें हें लौकिकी ॥[४] म्हणजे आम्ही देवांचे लाडके आहों ही गोष्ट लोकांना माहीत आहे. आम्ही तीन लोकांत रहातों, तेव्हां हे तीन लोक म्हणजे आमचा स्वदेश होतो.

माणसाची जाणीव उच्च अवस्थेंत व उच्च लोकांत गेली म्हणजे तिच्यांत एक प्रकारचा विशालपणा येतो असा अनुभव आहे. संतांच्या ग्रंथात असला व्यापकपणा आल्याचे अनुभव ठिकठिकाणीं आढळतात. तुकाराम म्हणतात–'अणुरणीयां थोकडा। तुका आकाशाएवढा। गिळोनि सांडिलें कळिवर। भवभ्रमाचा आकार ॥[५] म्हणजे अणूरेणूसारख्या अत्यंत लहान तुकारामानें आकाशाएवढें मोठें होऊन आकाश गिळलें व मायारूपी देह सोडला; अर्थात् दृश्य देह सोडून व त्यांतील जाणीव बाहेर

---

१ दासबोध १५, ८, २९; २ दासबोध ९, ९, १५;

३ दासबोध ९, ९, १३; ४ आवटेकृत तुकाराम गाथा क्रमांक २३४७, जोड गाथा खंड १ क्रमाक १११३; ५ आवटेकृत तुकाराम गाथा क्रमांक २३७५; जोगकृत तुकाराम गाथा क्रमांक ३३४०.

नेऊन ती एका विशाल स्थितींत नेली. ते उपदेश करतात : 'संकोचोनि काय । झालासी लहान । घेई आपोशन । ब्रह्मांडाचें ॥'[१] अरे मानवा ! तू स्वतःचा संकोच करून लहान कां होतोस ? अखिल ब्रह्मांडाचें आपोशन घेऊन व्यापक हो. रामदास सांगतात : 'मनें अंतरिक्ष जावें । क्षण एक ब्रह्मचि व्हावें । पुनः तेथून कोसळावें वृत्तिवरी मागुतें ॥'[२] माणसाचा अभ्यास पूर्ण झाल्यावर त्याला जाणिवेच्या वरच्या मजल्यावर हवें तेव्हां जातां येऊन पाहिजे तितका वेळ त्या स्थितीत रहातां येते; पण अगीं इतकें नैपुण्य येण्याच्या अगोदर तो फक्त कांही काळ त्या उच्च स्थितींत रहातो व लगेच जाणीव खालच्या मजल्यावर ओढली जाते. जाणीव उचावण्याचा प्रयत्न पुनः पुनः करीत राहिल्यानें वरच्या मजल्यावर पाहिजे तितका वेळ रहाण्याची कुवत हळू हळू माणसाला येते. तेव्हा ध्यानाचा प्रयत्न करून थोडा वेळ तरी वर जा, मग पुनः जाणीव खाली कोसळली तरी चालेल असें येथें रामदास म्हणत आहेत–'मती करतां विशाळ। कवळों लागे अतराळ ।।'[३] असेंही त्यांनी म्हटलें आहे. म्हणजे प्रयत्नत. मति विशाल केली तर जाणीव अंतराळभर पसरून व्यापक होते. ज्ञानेश्वरांचे अनेक उद्‌गार याच धर्तीचे आहेत. 'महुरलें महुरलें। मन माझें मोहरलें। भक्ति फळासि कैसें । आले गे माय'।।[४] असें ते म्हणतात. म्हणजे माझ्या भक्तीचें फळ म्हणून आंब्याचें झाड जसें मोहरतें तसें माझें मन मोहरलें आहे. ज्ञानदेवा ब्रह्म लाधलें अवचट। उन्मनीचा घांट चढतांचों। म्हणजे उन्मनी नांवाची एक जाणिवेची उच्च स्थिति आहे; त्या स्थितीचा घांट चढतांक्षणींच एकदम ज्ञानदेवांना ब्रह्माची प्राप्ति झाली. तुर्येमध्यें माझा अखंड रहिवास ।[५] म्हणजे तुर्या नांवाच्या अवस्थेंत माझें मन नेहमीं असतें.

१ आवटे तुकाराम गाथा ३८३२, जोग तुकाराम गाथा ३३७०;
२ दासबोध ७, ६, ५,
३ दासबोध ९, ९, ३०; ४ आवटे ज्ञानेश्वर गाथा क्रमांक ३१३.
५ ज्ञानेश्वर गाथा (आवटे) ८०० व ८७४.

या सर्व गप्पा आहेत असें आमच्या वाचकांना वाटण्याचा संभव आहे. सृष्टींतले निरनिराळे लोक, माणसाचे निरनिराळे देह आणि जाणिवेच्या निरनिराळ्या उच्च अवस्था या कविकल्पना नाहींत. या गोष्टी अदृश्य असल्यामुळें सामान्य माणसांना त्या दिसत नाहींत व म्हणून बहुजनसमाजाला त्या खऱ्या वाटत नाहींत. शनीचे कडें, गुरूचे उपग्रह, शुक्राच्या कला बहुजनसमाजाला न दिसल्या तरी खगोलशास्त्रवेत्त्याला त्या दुर्बिणीनें दिसतात. तद्वत् अदृश्य सृष्टि पहाण्याचीं साधनें ज्यांनीं आत्मसात् केलीं आहेत त्यांना या अदृश्य गोष्टी प्रत्यक्ष दिसतात. देह, अवस्था व लोक यांचेविषयीं थिऑसफीच्या चळवळींत अलीकडे पुष्कळ संशोधन झालें असून वरील गोष्टींचे अनुभव पुनः एकवार घेतां आलेले आहेत हें आमच्या वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

स्वतःच्या जीवनांत कोणत्या प्रकारचा प्रयत्न महाराष्ट्रीय संत करीत होते आणि सामान्य लोकांस अलभ्य असणारे आध्यात्मिक अनुभव त्यांना कां आले याची थोडी तरी कल्पना या प्रकरणांतील विवेचनावरून आमच्या वाचकांना आली असेल. तेव्हां आतां यापुढें संतांच्या निरनिराळ्या अनुभवांचा आपण परिचय करून घेऊं या.

---

## प्रकरण ३ रें

# अंतरंगांतील एक संस्था

संतांच्या ग्रंथांतील कांहीं भाग गुप्त आहे, तो संतांनीं जरी कमी अधिक स्पष्टपणें ध्वनित केला असला तरी तो त्यांनीं विस्तरशः व पूर्णपणानें आपल्या ग्रंथांत सर्वांसमोर मांडलेला नाहीं हें आपण येथवर पाहिलें. हा भाग मुख्यतः साक्षात्कारांबद्दलचा आहे. यापुढें आपण या पुस्तकांत संतकवींच्या साक्षात्कारांचें विवेचन करणार आहों. संतांना आपल्या भक्तिमार्गीय चळवळीसंबंधाचा जो जिव्हाळा वाटत होता, त्या चळवळींत जो जिवंतपणा त्यांनीं निर्माण केला होता, त्या कार्यांत त्यांनीं जे जगाचे आघात सोसले व जो स्वार्थत्याग केला, त्याचें खरें कारण त्यांना हे साक्षात्कार झाले होते हें होय. त्यांची चळवळ मूलतः तर्कप्रधान बुद्धिवादावर अथवा तत्त्वविचारांच्या उपपत्त्यांवर उभारलेली नव्हती. आपल्या चळवळीचा जनतेंत प्रसार करतांना सोय म्हणून संतांनीं कधीं कधीं बुद्धिवादाचा व तत्त्ववादांतील कल्पनांचा उपयोग केलेला असेल, पण आपण जगाला जो संदेश देत आहों तो सर्वस्वीं खरा आहे ही जी त्यांना स्वतःच्या चित्तांत संपूर्ण निश्चिति वाटत होती तिचें उगमस्थान त्यांनीं अनुभवलेल्या साक्षात्कारांत होतें, हें विसरतां कामा नये. " सिद्धान्त साधाया कारणें । पूर्वपक्ष लागे उडवणें । परंतु साधकां निरूपणें । साक्षात्कार ।। " म्हणजे साक्षात्कार हें

साधकाला निरूपण करण्याचें उगमस्थान असें होय रामदासांनीं स्पष्ट लिहिलेंच आहे.[१] आपले साक्षात्कार होतां होईल तों प्रकट करूं नयेत हें संतकवींचें धोरण असल्याचें आपण पूर्वीं पाहिलें आहे. अर्थात् या साक्षात्कारांचा विचार करतांना त्यांचा संपूर्ण पुरावा आपणांला त्यांच्या ग्रंथांत सांपडेल, किंवा त्यांची तपशीलवार व विस्तृत वर्णनें आपणांला त्यांच्या ग्रंथांतून काढून दाखवितां येतील अशी अपेक्षा कोणीही धरतां कामा नये. साक्षात्कारांची तुटपुंजी माहितीच त्यांच्या ग्रंथांत फारतर मिळू शकेल आणि तेवढ्या माहितीवरच आपणांला भागवून घ्यावें लागेल.

आपल्या पृथ्वीवर जी सर्व जीवांची उत्क्रान्ति चालू आहे तिचीं सूत्रें कांहीं ऋषितुल्य ज्ञानी माणसांच्या हातीं आहेत. या ज्ञानी पुरुषांची एक सुसघटित सस्था आहे. त्या संस्थेंत निरनिराळ्या दर्जांचे अधिकारी असून त्यांनीं आपापसांमध्यें निरनिराळ्या प्रकारचीं कामें वांटून घेतलेली आहेत. माणसांच्या, प्राण्यांच्या व इतर जीवांच्या उत्क्रान्तीचें पृथ्वी हें क्षेत्र आहे. ही उत्क्रान्ति विशिष्ट रीतीनें होत असते. ती कशी व्हावी ह्याची एक तपशीलवार योजना करण्यांत आलेली आहे. जगांत निरनिराळे धर्म स्थापून जनतेला सुसंस्कृत करणें, निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या संस्कृतींचें संवर्धन करणें, राष्ट्रांचे उदयास्त करणें, पृथ्वीवर जी जमीनपाण्याची विभागणी असते त्यांत जरूर ते फरक करून कांहीं भूमिभाग वर आणणें व कांहींस जलसमाधि देणें, अधिकारी माणसांची मुमुक्षु मार्गावर प्रगति करणें, निरनिराळे मानववंश निर्माण करणें, त्यांच्या शाखांची देशोदेशीं स्थापना करणें, मनुष्याला शहाणें करण्याकरितां त्याला नाना प्रकारच्या प्रेरणा देणें आणि त्याच्या प्रगतीसाठीं विविध उद्योगांची आंखणी करणें वगैरे कितीतरी प्रकारचे खटाटोप त्या योजनेनुसार ते ज्ञानी पुरुष करीत असतात ज्ञानीपुरुषांची ही जी संस्था आहे तिला 'सिद्धसंघ' असें नांव देणें

---

१ दासबोध १०, ९, २९

सार्थ होईल. या सिद्धसंघाच्या अस्तित्वाबद्दलचा कांहीं पुरावा व त्याच्यासंबंधाची थोडीशी माहिती अलीकडे थिऑसफीय चळवळीच्या द्वारानें जगासमोर आलेली आहे.

**या संस्थेची रूपरेषा**

हिंदुधर्मांत या सस्थेची अस्पष्ट अशी रूपरेषा आढळते. मनु नांवाचा एक अधिकार आहे. तो अधिकार चालविणारा एक ऋषि असतो. एक मन्वंतरभर तो अधिकार चालवितो. राजकारण हें त्याचें क्षेत्र असतें. मन्वंतर संपलें कीं त्या गादीवर तो अधिकार चालविणारा दुसरा ऋषि येतो. त्या गादीवरच्या सध्यांच्या ऋषीचें नांव वैवस्वत आहे. व्यास नांवाचा दुसरा एक अधिकार असतो. तो अधिकार दुसरा एक ऋषि चालवितो. ज्ञानदान व धर्मसस्थापना हें त्याचें कार्य असतें. त्या गादीवरील पूर्वींचा पुरुष ती गादी सोडून गेला म्हणजे दुसरा ऋषि त्या गादीवर येऊन त्या कार्याचें लोण पुढे नेलें जातें. हल्ली व्यासांच्या अधिकारावर असलेल्या ज्ञानी पुरुषास कृष्णद्वैपायन म्हणतात. पृथ्वीवर वाईट माणसांनीं उत्क्रान्तीला अडथळा केला म्हणजे विष्णु अवतार घेऊन येतो, आपल्याबरोबर तो दुसरे पराक्रमी पुरुष जन्मास घालतो आणि त्यांच्या साहाय्यानें वाईट लोकाचें निर्दालन करतो. दर युगांत असल्या गोष्टी होत असतात. आपल्या पृथ्वीवर कांहीं ज्ञानी पुरुष सतत वास्तव्य करून असतात. त्यांना चिरजीव म्हणतात. अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च बिभीषणः । कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ।। या श्लोकांत त्यांचीं नांवें गुंफलेलीं आहेत. हल्लींच्या युगांत मरीचि, अंगिरस, अत्रि, पुलस्त्य, पुलह, ऋतु व वसिष्ठ असे सात ऋषि आहेत असें आपले धर्मग्रंथ सांगतात. पृथ्वीवर चालू असणाऱ्या उत्क्रांतीच्या पाठीशीं कांहीं सूत्रचालक असतात व ते निरनिराळीं कार्ये करीत रहातात ही गोष्ट वरील माहितीच्या द्वारानें हिंदु धर्मानें ध्वनित केलेली आहे.

या संस्थेचीं जीं अनेक कामें असतात त्यांपैकीं एक काम मुमुक्षूंना साहाय्य करण्याचें असतें. पृथ्वीवर अशी कांहीं माणसें असतात कीं ज्यांना मुमुक्षुमार्गानें (विहंगममार्गानें) स्वतःची अध्यात्मप्रगति करण्याची तीव्र उत्कंठा लागलेली असते. जीवन्मुक्त ऋषींची जी वर लिहिलेली सिद्धसंघ नामक संस्था आहे, त्यांतील कित्येक अधिकारी पुरुष ह्या उत्कंठा लागलेल्या माणसांना हातीं धरतात, आपला त्यांचा गुरुशिष्य संबंध जोडतात, आणि त्यांची मुमुक्षु मार्गावरून प्रगति करवितात. जो स्वतः जीवन्मुक्त झालेला असेल त्यालाच शिष्याची संपूर्ण जबाबदारी घेण्याचा अधिकार मिळालेला असतो. पण जसा एकाद्या शाळेंतला मुख्य अध्यापक आपल्या हाताखालच्या शिक्षकांकडे आपलीं कांहीं कामें सोपवितो, व हाताखालचे शिक्षकही आपलीं कांहीं कामें कित्येक हुशार व निवडक विद्यार्थ्यांकडे सोपवितात, त्याप्रमाणें हे जीवन्मुक्त पुरुषही आपल्या शिष्याच्या प्रगतीचीं कांहीं कांहीं कामें जातीनें करतात व कांहीं कामें आपल्या अनुभवी शिष्यांकडून करून घेतात. या जीवन्मुक्त गुरूला महाराष्ट्रीय संतकवि 'गुरु' किंवा 'सद्गुरु' असें म्हणतात व स्वतःला शिष्य म्हणवितात. कधीं गुरु किंवा सद्गुरू न म्हणतां 'संत' असेंही म्हणतात. जीवन्मुक्त गुरूनें जर आपलें कांहीं काम आपल्या अनुभवी शिष्यांकडे सोपविलेलें असेल तर त्या शिष्यांनाही गुरु, सद्गुरू अथवा संत हींच नांवें संतकवीच्या ग्रंथांत लिहिलेलीं आढळतात. महाराष्ट्रीय संतांना गुरु होते. ते त्यांना ईश्वरासमान मानीत. त्यांचीं नांवें त्यांनीं आपल्या ग्रंथांत दिलेलीं आहेत. हे गुरु म्हणजे कधीं जीवन्मुक्त ऋषितुल्य पुरुष असतील, कधीं त्यांनीं ज्या शिष्यांवर आपलीं कामें सोपविलेलीं आहेत असे त्यांचे शिष्य असतील. प्रत्येक संताची गुरुपरंपरा ग्रंथांत दिलेली आढळते.[१] संत पुजावे

१ अनेक संतांनी आपली गुरुपरंपरा दिलेली आहे. आपला गुरु कोण, त्या गुरूचा गुरु कोण, त्या गुरूच्या गुरूचा गुरु कोण अशी मागें

(टीप पुढील पानावर चालू)

(टीप मागील पानावरून चालू)

मागें जाणारी वंशावळ म्हणजे गुरुपरंपरा होय. या परपरेचा नीट अर्थ समजून घेतला पाहिजे. पुष्कळदा असल्या परंपरा शकर किंवा विष्णु याच्यासारख्या अखिल सृष्टि निर्माण करणाऱ्या परमेश्वराच्या एखाद्या स्वरूपापासून सुरवात झालेल्या असतात. पृथ्वीवरील सिद्धसंघ हजारो वर्षांपूर्वी स्थापन झालेला आहे. त्यातील कांही अधिकारी विष्णूचे विशेष कार्य करीत असतात, तर काही शिवाचें विशेष कार्य करीत रहातात. त्या अधिकाऱ्यास विष्णु किंवा शिव अशी नांवें ह्या परपरेत दिलेली असतात. त्यावरून तो अधिकारी अखिल सृष्टि चालविणारा विष्णु आहे असें समजावयाचें नाही. विष्णूच्या स्वरूपाशी समरस झालेला, विष्णूचें व्यक्तिमत्त्व प्रकर्षानें प्रकट करून त्याच्या विशेष कार्याची जबाबदारी अंगावर घेणारा एक ऋषितुल्य ज्ञानी पुरुष असा अर्थ अभिप्रेत आहे. या परपरेंत कधी काही व्यक्ति फार मोठ्या अधिकाराच्या असतात व कधी कांही व्यक्ति अगदी बेताच्या अधिकाराच्या असतात. शिष्याची सपूर्ण जबाबदारी घेण्याचा अधिकार या परपरेतील फक्त मोठ्या माणसाना (म्हणजे सिद्धसंघांतील एका विशिष्ट दर्जाच्या अधिकाऱ्यांना असतो). त्याचा जो शिष्य असेल, त्याला प्रशिष्य करण्याचा अधिकार असतो, त्या प्रशिष्यालाही आणखी दुसरे शिष्य घेण्याचा अधिकार असतो, पण हे खालचे शिष्य यथाकाल त्या मोठ्या माणसाचे पुढे शिष्य व्हावयाचे असतात. चोखामेळ्याची परंपरा आदिनाथ–मत्स्येंद्रनाथ–गोरखनाथ–गैनीनाथ–निवृत्ति–ज्ञानेश्वर–विसोबा खेचर–नामदेव–चोखामेळा अशी आहे. (पहा पागारकरकृत मराठी वाङमयाचा इतिहास खंड १ पृ. ४८१) यातली पहिली काही नावें सिद्धसंघात आज किंवा पूर्वी असलेल्या पुरुषाची असावीत. खरोखरी तेच जीवन्मुक्त पुरुष होत. नव्या शिष्याची संपूर्ण जबाबदारी घेण्याचा अधिकार त्याचाच. कल्पना करूं या की वरील मालिकेतला त्या अधिकाराचा शेवटला पुरुष गैनीनाथ आहे. या गैनीनाथाचे शिष्य जे निवृत्तिनाथ त्याचे ज्ञानेश्वर शिष्य झाले, ज्ञानेश्वरांचे विसोबा खेचर झाले, विसोबाचे नामदेव व नामदेवाचे चोखामेळा झाले. म्हणजे निवृत्तिनाथापासूनच्या मडळीनी जे शिष्य केले असतील ते गैनीनाथाच्या वतीनें व त्यांच्या आदेशानें केलेले असणार, त्या सर्वांची जबाबदारी गैनीनाथावर असणार व त्याचा कालवशात् गैनीनाथांचा संबंध येऊन ते त्या वेळी गैनीनाथाचे शिष्य व्हावयाचे असणार. अर्थात् त्यांना खरोखरी गुरुशिष्य न मानतां गुरुबंधु समजलें पाहिजे.

त्या गुरुपरंपरेंत कांहीं माणसें जीवन्मुक्त पदवीला पोहोंचलेलीं असतात व कांहीं त्यांनीं निवडलेले व त्यांचीं कामें करणारे शिष्य असतात. हा विषय गुप्त असल्यामुळें वरील भेद ग्रंथांत स्पष्ट केलेला नाहीं. इतकेंच नव्हे, तर सामान्य जनतेला स्पष्ट समजूं नये म्हणून संत हा शब्दही ग्रंथांत अनेक अर्थांनीं मुद्दाम योजलेला आहे. ज्ञानेश्वरांनीं 'तरी संतां ह्या भजावें। सर्वस्वेशी[१] ।।' असें संतां-संबंधानें म्हटलें आहे. रामदासांनीं 'मोक्षश्रिया आलंकृत। ऐसे हे संत श्रीमत'। असे त्यांच्याबद्दल उद्गार काढले आहेत आणि संत हे सायुज्य मुक्ति देतात असें सांगून "जें त्रैलोक्यी नाही दान। तें करिती संत सज्जन। तया संतांचें महिमान। काय म्हणोनि वर्णावें"[२] असा त्यांचा गौरव केला आहे. तुकारामांनी 'देव सारावे परते। संत पुजावें आरते[३]। तसेंच 'धन्य आजि दिन। झालें संताचें दर्शन। झाली पापातापा तुटी। दैन्य गेलें उठाउठी'[४]।। आणखी 'कोण पुण्यें यांचा (संतांचा) होईन सेवक। जिही द्वंद्वादीक दुरावले। ऐसी वर्मे मज दावीं नारायणा। अंतरींच्या खुणा प्रगटोनि। बहु अवघड असे संत भेटी। तरी जगजेठी करुणा केली"[५] असें संतांना अनुलक्षून म्हटलें आहे. या ठिकाणी संत हा शब्द जीवन्मुक्त गुरु अथवा त्यानें नेमलेले अधिकारी शिष्य या अर्थानें योजलेला आहे. पण याच तीन संतकवींनीं संत हा शब्द आपल्या प्रवचनास आलेल्या श्रोत्यांस अथवा पंढरीच्या सामान्य वारकऱ्यांसही कधी कधी लावलेला आढळतो. उदाहरणार्थ 'तिही कृपा करूनि संतीं अवधान द्यावें[६]। या ओवींत ज्ञानेश्वर, आतां वंदूं श्रोते जन। भक्त ज्ञानी संत सज्जन[७]। या ओवींत रामदास, व 'संत पंढरीस जाती। निरोप धाडी तयां हातीं[८]। या अभंगांत तुकाराम यांनी जो संत शब्द योजला आहे तो श्रोता अथवा वारकरी या अर्थानें योजला आहे.

१ ज्ञानेश्वरी ४, १६५. २ दासबोध १, ५, २१ ते २४.

३ आवटे तुकाराम गाथा ४०६; ४ कित्ता ५८७; ५ कित्ता ५०६ ६ ज्ञानेश्वरी १, ६२; ७ दासबोध १, ६, १; ८ आवटे तुकाराम गाथा ३८१;

रामदासांनीं तर एके ठिकाणीं 'तैसा मी संतांचा अंकित। तुम्हां संतांपाशीं बोलत'[१] या एकाच ओवींत संत हा शब्द दोन ठिकाणीं दोन अर्थांनीं योजलेला आहे.

## संतांचे मार्गदर्शक

महाराष्ट्रांतील संतकवि वर लिहिलेल्या सिद्धसंघातील ज्ञानी पुरुषांचे शिष्य होते. आजही जगांत ऋषितुल्य ज्ञानी पुरुष अस्तित्वांत आहेत, व ते आजही माणसांचा शिष्य म्हणून अंगीकार करून मुमुक्षुमार्गावर त्यांची प्रगति करतात ही गोष्ट हल्लींच्या सुशिक्षित लोकांस खरी वाटत नाहीं; पण संतांना ती खरी वाटत असे. कारण त्या संतांना एतद्विषयक साक्षात्कार होत असत. समर्थशिष्य दिनकर ह्यांनीं आपल्या स्वानुभव-दिनकरांत म्हटले आहे "वरकड अवतार मृत्यु पावले। अग्निसंगें कित्तेक भस्म झाले। देहाकारें अवयवेसी भंगले। तैसें नाही श्रीरामचंद्रांसी ॥ श्रीरामचंद्र याचि देहें वैकुंठवासी। मां त्यास विलंब काय भूतळा यावयासी। त्यांचिया अनुग्रहें रामदासांसी। अनुभव सुख प्राप्त ॥'[२] तेव्हां श्रीरामचंद्र आजही अस्तित्वांत आहेत असे दिनकर सांगतात. मागां होते जनकादिक। राज्य करितांही अनेक। तैसेचि आतां पुण्यश्लोक। कित्येक असती ॥[३] हे रामदासांचें म्हणणें त्याच धर्तीचें आहे. माझी व श्रीरामचंद्राची भेट झालेली आहे असा समर्थांनीं अनेक ठिकाणी निर्वाळा दिलेला आहे. रामीं रामदासीं भेट झाली। असें त्यांनीं एके स्थळीं स्वच्छ म्हटलेलें आहे. अनुभवी जाणे तेथींचीये खुणे। येर विटंबनें वाढवील। वाढवील सुख संत सज्जनासी। रामीं रामदासीं भेट झाली ॥ असेंही दुसरीकडे सांगितलेलें आहे. ही भेट वारंवार होत असे असे 'सर्वकाल भेटी

१ दासबोध १, ६, २०.

२ स्वानुभवदिनकर कलाप १६ किरण ४–३८–३१.

३ दासबोध १२, ८ ३१

कदा नाहीं तूटि । रामदासी लूटी स्वरूपाची [१] ।।' या शब्दांवरून दिसतें. 'मज रघुनाथजी वेगळें कोणी जिवलग नाही' असें रामदासांनीं एका पत्रांत ( व इतरत्रही ) लिहिलें आहे.[२] जनतेचा उद्धार करण्याचें काम श्रीरामचंद्रांनीं रामदासांना नेमून दिलें होतें असें "राघवाचा वर पावलों सत्वर । जनाचा उद्धार करावया ।।" या समर्थोक्तीवरून म्हणतां येतें. श्रीरामचंद्रांनीं आपलें कांहीं काम हनुमंतांवर सोपविलें होतें व आपली व हनुमंतांची गांठ पडते असेंही 'स्वधामासि जातां महारामराजा । हनुमंत तो ठेविला याचि काजा । सदासर्वदा रामदासासि पावे । खळी गांजितां ध्यान सांडूनि धांवे' ।। या समर्थांच्या शब्दांवरून उघड होतें. इतकेंच नव्हे, तर श्री रामचंद्रांनीं माझ्या अध्यात्म प्रगतीची जबाबदारी मारुतीवर टाकली होती, व मग मी पुढें 'रामदास' म्हणून जगासमोर आलों असें रामदास म्हणतात. "उपदेश देवोनि दिधला मारुती । स्वयें रघुपति निरविता । निरविता तेणें झालों रामदास । संसारीं उदास म्हणउनी" ।। या कारणास्तव "सेवक मारुती ऐसा[३] । त्याचा मी म्हणती जनी" । म्हणजे रामदास मारुतीचे सेवक बनले व लोक त्यांना मारुतीचा अवतार असें संबोधू लागले. हनुमान यांची चिरंजीवांत गणना आहे हें वर आलेंच आहे. तुकारामांचीही संतांची गांठभेट झाली होती. त्यांनीं स्वत:बद्दल लिहिलें आहे "घालूनियां भार राहिलों निश्चिती । निरविलें संतीं विठोबासी ।।

१ पहा पांगारकरकृत समर्थ ग्रंथभांडार उत्तरार्थ पृ. ४८४ क्रमांक ९; पृ. ५२९ क्रमांक १७८; पृ ५७१ क्रमांक ३८५; पृ ४७० क्रमांक ४८; पृ. ५७० क्रमांक ३८१

२ पहा पांगारकरकृत मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ पृ. ६३५ वरील समर्थांचें रघुनाथ भट यांस पत्र. समर्थ ग्रंथभांडार उत्तरार्ध पृ. ५५६ क्रमांक २९९ यांत 'जिवलग नाही श्रीरामा वांचोनियां' असें समर्थ म्हणतात. देव यांच्या श्रीसमर्थहृदय ( द्वितीय खंड) पुस्तकांतही पृ. ५७३ वर वरील पत्र आहे.

३ पांगारकरकृतसमर्थ ग्रंथभांडार उत्तरार्ध पृ १०८ मानपंचक मान ४, व आवटेकृत तुकाराम गाथा क्रमांक ३७८७.

लाऊनियां हात कुरवाळली माथा । सांगितलें चिंता न करावी ॥ तुज वाटे आतां तें करीं अनंता । तुका म्हणे संतां लाज माझी ॥" तसेंच ते आणखी म्हणतात: 'तुजवीण दुजें न धरीं आणीका । भय लज्जा शंका टाकियेली ॥ ठायींचा संबध तुज मज होता । विशेष अनंता केला संतीं ॥ . . . तुका म्हणे संतीं घातला हवाला । न सोडी विठ्ठला पाय तुझे' ॥ या म्हणण्यावरून दिसून येतें कीं संतांनीं तुकाराममहाराजांच्या प्रगतीचें काम विठोबावर टाकलें होतें.[१] असल्या ऋषितुल्य ज्ञानी पुरुषांसंबंधानें एकनाथ लिहितात, "ते जगामाजी सदा असती । जीवमात्रां ते दिसती । परि विकल्पेचि ठकिजति । नाही म्हणती नास्तिक्यें"॥[२] म्हणजे असले ज्ञानी पुरुष नेहमींच जगांत असतात, जीवमात्रांना दिसू शकतील अशा दृश्य स्वरूपांत असतात, पण माणसाच्या मनांतला संशय माणसाला ठकवीत असल्यामुळें लोक नास्तिकपणा स्वीकारून त्यांच्या अस्तित्वाचा इन्कार करीत बसतात. एकनाथांचे गुरु जनार्दनस्वामी व श्रीदत्तात्रय यांची गांठ पडली होती असें एकनाथांनीं आपल्या भागवतांत स्पष्ट लिहिलें आहे.[३] हनुमान्, व्यास, विभीषण वगैरेसारखें साधकाला चिरंजीव पद प्राप्त करून घेतां येतें असें त्यांचें म्हणणें आहे. चिरंजीव-पद पावायासी । अधिकार कैसा साधकासी । किंचित् बोलेन निश्चयासी । कळावयासि साधका ॥ या अभंगांत ती भवितव्यता त्यांनीं विवरण करून सांगितलीही आहे.[४]

या सर्व विवेचनावरून दृश्य सृष्टीच्या मागें मानवी उत्क्रान्तीचे सूत्रधार उभे असून ते आजही आपलें कार्य करीत आहेत ही गोष्ट महाराष्ट्रीय संतांस मान्य होती हें उघड होईल. थिऑसफीचें

---

१ तुकाराम गाथा (आवटे) क्रमांक ३७११ व ३७१२; २ एकनाथी भागवत १, ४१; ३ एकनाथी भागवत ९, ४३०–४४०; ४ एकनाथी गाथा ३९६५ ( आवटे ). इतकेच नव्हे तर ज्याला श्रीरामचंद्राचा ऋणानुबंध जोडावयाचा असेल त्याला तो आजही जोडण्याचा मार्ग मी दाखवीन असें रामदासांनीं म्हटलें आहे. आतांही जयास वाटे भेटावें । रामें मज सांभाळीत जावें । ऐसे दृढ घेतलें जीवें । तरी ऐका मी सांगेन ॥ जुना दासबोध १४,३७.

हेंच म्हणणें आहे. संतांच्या म्हणण्याला त्यांच्या तत्कालीन साक्षात्कारांचा आधार होता. थिऑसफीच्या म्हणण्यालाही आजच्या साक्षात्कारांचा आधार आहे. या दोन प्रकारच्या साक्षात्कारांचा परस्परांस दुजोरा मिळत असल्यामुळें दोन्ही साक्षात्कार खरे असले पाहिजत असें अनुमान आपणांला काढतां येईल. साक्षात्कारांत फरक आहे तो नांवाचा आहे. पण नांवें भिन्न असली म्हणून सत्य भिन्न आहे असें म्हणतां येणार नाहीं. सृष्टिकर्त्या शक्तीला हिंदु ईश्वर म्हणतो, मुसलमान अल्ला म्हणतो व पारशी अहुरमझ्दा म्हणतो. तरीही ह्या निरनिराळ्या नांवांनीं संबोधिलेला ईश्वर एकच आहे हें सांगणें नको. सृष्टीच्या पाठीमागें जो ज्ञानी सूत्रचालकांचा सिद्धसंघ आहे त्यांत अनेक अधिकारी माणसे आहेत. हा विषय गुप्त असल्यामुळें हिंदुधर्माच्या जुन्या ग्रंथांत त्याची संगतवार माहिती मुद्दाम दिलेली नाहीं. या अधिकाऱ्यांचे अलीकडचें धोरण कांहीं गोष्टी उघड करण्याचें आहे. त्य धोरणानुसार आजच्या थिऑसफीय चळवळीच्या द्वारानें जगा समोर थोडीशी अधिक व व्यवस्थित माहिती आलेली आहे. हिं परंपरेनें या संस्थेंतील पदाधिकाऱ्यांना आदिनाथ, महाविष्णु वसिष्ठ, श्रीरामचंद्र, व्यास, श्रीशंकर, दत्तात्रय वगैरे नांवें दिलेली आहेत. खेरीज हिंदुधर्मानें मरीचि, अंगिरस् वगैरे ऋषींचीं नांवें सांगितलीं असून तेही चालू युगांतील पदाधिकारी आहेत असें म्हटलें आहे. पण हिंदुधर्मांतील जुन्या ग्रंथांत या माहितीसंबंधानें एकवाक्यता दिसून येत नाहीं.[१] थिऑसफीनें जीं नांवें दिलेलीं

१ लोकमान्य टिळक याच्या गीतारहस्याच्या शेवटीं गीता अध्याय १० श्लोक ६ यावर टिळकांनीं जे भाष्य केलें आहे तें पाहिल्यास या अधिकाऱ्यांच्या नांवांमध्यें संस्कृत ग्रंथांत एकसूत्रीपणा नाही हें दिसून येईल. हा विषय गुप्त असल्यामुळें ग्रंथांतल्या ह्या विरोधाचा परिहार करण्यास जें ज्ञान जरूर आहे तें ग्रंथात सांपडत नाहीं. जुनी नांवें लक्षांत घेतांना गैरसमज न होणा

(पुढील पानावर पहा.)

(मागील पानावरून चालू)

नाहीं याची सावधगिरी बाळगली पाहिजे. व्यास ही गादी आहे, तें व्यक्तीचें नांव नाहीं हें पुष्कळांच्या ध्यानांत नसतें. हनुमान हा चिरंजीव आहे असें म्हटलें की रामायणांत वर्णिलेला वानरदेहधारी हनुमान् आजही तसाच वानरदेहधारी आहे असें जनतेस वाटण्याचा संभव आहे. खरा अर्थ असा आहे की रामायणांत अथवा धार्मिक दंतकथांत पूर्वी जो जीव हनुमान म्हणून प्रसिद्ध होता तो जीव आज चिरंजीव नांवाच्या पदवीवर आरूढ झालेला आहे. अर्थात् तो वानरदेहधारी सतत रहाणार असें मानणें चुकीचें होईल. श्रीरामचंद्र म्हणजे पूर्वी जो राम म्हणून प्रसिद्ध होता तो पुरुष. आजही सीता त्याची बायको असणार असा अर्थ करतां येणार नाही. 'राम रक्षी ऋषिकुळ ' असें त्याच्यासबधानें समर्थ म्हणतात (पहा मानपंचक १–समर्थ ग्रंथ भांडार उत्तरार्ध पृ. १०२) अगस्त्य म्हणजे ज्या ऋषीला हिंदु धर्मानें पूर्वी अगस्त्य नाव दिलें होतें तो. कालवशात् देह वृद्ध झाला म्हणजे हे ज्ञानी पुरुषही एक देह टाकून दुसरा देह घेनात. पण देह दुसरा असला तरी व्यक्ति पूर्वींचीच असते. जगातील धर्मात पूर्वी प्रचलित असलेलीं नावें आज उपयोगांत आणली तर वरील प्रकारचे गैरसमज जनतेंत पसरतात. मुमुक्षू जर या गैरसमजांच्या पलीकडे गेलेला नसेल तर ह्या ज्ञानी पुरुषाना अडचण होते. त्या मुमुक्षूला ओळख पटावी म्हणून श्रीरामचद्राना सीतापति कोदंडधारी रामाचें किवा हनुमानाला वानराचें रूप घेऊन दर्शन द्यावें लागतें. तसें दर्शन दिलें तर आजही हनुमान वानरदेहधारी आहे अशी मुमुक्षूची गैरसमजूत होते. ती टाळण्यासाठी कधी परिचित व्यक्तीचें रूप धारण करून ते लोकांना दर्शन देत असतात. ' संत मिसें भेटि देसी । ' असे श्रीरामचंद्रासंबंधानें जनाबाईनें म्हटलें आहे. (आवटे जनाबाई गाथा क्रमाक ४३) म्हणजे राम संतांचें स्वरूप धारण करून मुमुक्षूला दर्शन देतात. समर्थ शिष्य दिनकर यास एकदां समर्थांचा स्वप्नात साक्षात्कार झाला होता. पुढें कांहीं दिवसांनीं दिनकरांची व समर्थांची प्रत्यक्ष गांठ झाली. त्या गाठीत समर्थांनीं दिनकरांस सांगितलें कीं श्री रामानें ' स्वप्नावस्थेमाजी येऊन। अमुच्या रूपें अनुग्रहण। करूनि देहचतुष्टयनिरसन। महावाक्य उपदेश। ' केला होता; तो मी नव्हतों, माझें रूप घेऊन राम आलेले होते (स्वानुभव दिनकर कलाप १६ किरण ४ ओवी ९९).

आहेत त्यांतलीं सनत्कुमार, वैवस्वत वगैरेसारखीं कांहीं नांवें हिंदु धर्मांतून घेतलीं आहेत; पण बुद्ध, बोधिसत्व, निर्माणकाय, मैत्रेय वगैरे नांवें बुद्ध धर्मांतून घेतलीं आहेत. थिऑसफींतलीं कांहीं नांवें अगदीं नवीन आहेत. कित्येक नांवें नवीन असलीं तरी त्या अधिकाऱ्यांची संस्कृत वाङमयांतील नांवेंही उपलब्ध आहेत. उदाहरणार्थ थिऑसफींत ज्या पुरुषांस मास्टर के. एच., मास्टर एम. व मास्टर जूपिटर या नांवांनीं ओळखण्यांत येतें ते अनुक्रमें संस्कृत ग्रंथांतील देवापि, मरु व अगस्त्य होत हें तज्ज्ञांस विदित आहेही. K.H. Koot Hoomi ह्या नांवाचीं आद्याक्षरें आहेत. हें नांव अलीकडील थिऑसफीच्या वाङमयांत अधिक बरोबर रीतीनें Kuthumi असें लिहितात व कुथूमी हें हिंदु धर्मांतील एका ऋषीचें नांव आहे (चित्राव कृत प्राचीन चरित्रकोषांत कुथूमी हा व्यासांच्या परंपरेंतील एक शिष्य असल्याचें सांगितलें आहे.) थिऑसफीय नांवांत कांहीं नांवें व्यक्तींचीं आहेत. तर कांहीं ती व्यक्ती ज्या अधिकारावर असेल त्या गादीचीं आहेत. तेव्हां नांवांत एकवाक्यता होणार नाहीं हें उघड आहे. तसेंच जुन्या नांवांनीं निर्देशिलेल्या अधिकाऱ्यांचीं आजचीं नांवें काय आहेत तें पुरेशा प्रत्यक्षानुभवाच्या अभावी सांगतां येणार नाहीं. पण आपण दिलेलीं नांवें कोणतींही असलीं तरी सिद्धसंघांतील अधिकारी माणसें एकच असणार.

सिद्धसंघांतील कित्येक पुरुषांचें शिष्यत्व महाराष्ट्रीय संतांना लाभलेलें होतें.[१] सिद्धसंघांतील पुरुषांचें सबंध जगाकडे लक्ष असतें. उत्क्रांतिपथावरून मुमुक्षुमार्गाच्या–विहंगममार्गाच्या–द्वाराजवळ कोणकोण माणसें आलेलीं आहेत, तसेंच त्या मार्गावर कोणाची

१ संतांची व स्वत.ची भेट झाल्याचे उल्लेख अनेक महाराष्ट्रीय कवींनीं केले आहेत. उदाहरणार्थ ' आजि सोनियाचा दिवस । दृष्टि देखिलें संतांस ।' असें सेना न्हावी व ' चोखा म्हणे आनंद वाटलासे जीवा । संताचे पाय केशवा देखियेले । ' असें चोखा मेळा म्हणतो (पाहा आवटे सेना गाथा १५ व चोखा गाथा ६६)

कितपत तयारी झाली आहे तें त्यांना समजतें, व असलीं माणसें निवडून ते त्यांच्यावर अनुग्रह करतात, व त्यांच्यावर कामाची जबाबदारी टाकून त्यांस मार्गदर्शन करतात. महाराष्ट्रीय संतांपैकीं कांहींची प्रगति जास्त झालेली असणार व कांहींची कमी झालेली असणार. विहंगममार्गाच्या कांहीं जवळ आलेले असणार, कांहींचा त्या मार्गावर नुकताच प्रवेश झालेला असणार आणि पूर्वजन्मीं बरीच तयारी झाली असल्यामुळें कित्येकांचा तो मार्ग संपतही आलेला असणार. अर्थात् या सर्वांना एकाच तऱ्हेचें मार्गदर्शन चालणार नाहीं. शिष्यत्वाचे अनेक टप्पे असतात[1] आणि प्रत्येक टप्प्यावरील सद्गुरूचा अनुग्रह वेगळा असतो. सिद्धसंघांतील पुरुष (सद्गुरु) कोठें तरी रहात असतात. अंतर्ज्ञानानें ते सर्व जगाकडे पाहून कोणाची किती प्रगति झाली आहे, कोणाला शिष्य करावें, कोणत्या पायरीचें शिष्यत्व द्यावें, कसें मार्गदर्शन करावें तें ठरवितात. हे होतकरू लोक जगांत नाना देशांत निरनिराळ्या ठिकाणीं रहात असणार. सद्गुरूंना प्रवास करून त्या सर्वांकडे जाणें शक्य नसतें. शिष्यांना मार्गदर्शन करणें एवढेंच त्यांचें काम नसतें. सिद्धसंघानें त्यांच्याकडे अनेक उद्योग सोंपविलेले असतात. ते सर्व संभाळून शिष्यांना मार्गदर्शन करण्याचें कार्य त्यांना साधावयाचें असतें. तेव्हां लांबीचे प्रवास वारंवार न करतां ते असल्या लोकांच्या सूक्ष्म देहाला आपल्याकडे बोलावून आणण्याची व्यवस्था करतात. सुसंस्कृत व सुबुद्ध असा माणूस झोंपी गेला म्हणजे बिछान्यावर पहुडलेल्या त्याच्या दृश्यदेहांतून नैसर्गिक रीतीनें त्याचा सूक्ष्मदेह बाहेर निघून भोंवताली वावरत असतो. त्याचा जीवात्मा त्या वेळीं सूक्ष्मदेहांत असतो. नैसर्गिक निद्रेच्या वेळीं अशा रीतीनें जीवात्मा दृश्यदेहाबाहेर आला असतांना सद्गुरु त्याला विशिष्ट

१ या टप्प्यांची माहिती देण्यास या छोटया पुस्तकांत स्थळ नाही. ती The Masters *&* the Path व ' सिद्ध पुरुष व त्यांचा संप्रदाय ' या पुस्तकांत जिज्ञासूंना सांपडेल.

स्थळीं बोलावून आणतात. जरूर त्या वेळीं माणसाला स्वाभाविक रीतीनें जर झोप न आली तर कृत्रिम रीतीनें त्याला झोंप यावी अशी कांहीं तरी तरतूद त्यांनीं केलेली असते.[१] सद्गुरूंचें जर रहाण्याचें ठिकाण तेथें असलें तर सद्गुरूंचा दृश्य देहही तेथेंच असतो व ते सद्गुरु त्या वेळीं आवश्यक तो विधि करतात, त्याला उपदेश देतात आणि त्याच्यावर अनुग्रह करतात.[२] तें ठिकाण दुसरीकडे

१ आकाशात सूर्याचें साम्राज्य सुरू असताना तारे दिसत नाहीत. ते पहावयाचे झाले तर सूर्य मावळल्यावर काळोखांत पहावे लागतात. तद्वत् माणसाच्या मनांत जागृतीच्या साम्राज्यातील गडबडी सुरू असताना उच्च प्रकारचे अनुभव त्याला जाणवत नाहींत. तसले हळुवार व कोमल अनुभव घ्यावयाचे असले तर जागृतीचा धुडगूस बंद करावा लागतो; म्हणजेच देह निश्चेष्ट किंवा निद्रित स्थितीत न्यावा लागतो कधी नैसर्गिक झोंप लागून देह निश्चेष्ट होतो; व मग त्यातून सूक्ष्मदेहाला बाहेर जाऊन उच्च अनुभव घेता येतात. कधी नैसर्गिक निद्रा माणसाला लागत नाही. त्या वेळी कृत्रिम निद्रा उत्पन्न करावी लागते. ज्ञात्याने शिष्याच्या दृश्यदेहातून सूक्ष्मदेह बाहेर ओढला तर त्यानेंही दृश्यदेहाला झोप येते. सद्गुरुभेटीसारखे अनुभव उच्च प्रतीचे असतात. दृश्यदेह जागृत असतांना प्राय ते अनुभव घेतां येत नाहीत. पुष्कळदा ते अनुभव घेण्यासाठी सूक्ष्मदेहाला कोठें तरी अंतरावर दूर जाणे अवश्य असतें. यासाठी असल्या अनुभवाच्या वेळी दृश्यदेह निश्चेष्ट होत असतो. देह कृत्रिम रीतीनें निश्चेष्ट झाला की, लोक देहाला समाधि लागली असे म्हणतात. हें म्हणणे गैरसमज करणारें आहे. समाधि ही ज्ञानाची स्थिति आहे. ती निश्चेष्ट देहाला न लावता सद्गुरूकडून मिळालेल्या अनुग्रहाला लावणें सार्थ होईल. माणसाची विशेष प्रगति झाल्यावर जागृत स्थितीतही उच्च अनुभव घेण्याचें सामर्थ्य त्याला येते पण अशीं उदाहरणें थोडीं असतात.

२ सी. जिनराजदास हे The First Principles of Theosophy नांवाच्या आपल्या पुस्तकांत (आवृत्ति १९३८ पृ. ३२९) म्हणतातः "The

(टीप पुढील पानावर चालू)

असलें तर सद्‌गुरु व शिष्य हे दोघेही सूक्ष्मदेहांत असतात आणि त्याच गोष्टी त्या ठिकाणीं केल्या जातात. नंतर शिष्याचा सूक्ष्म देह जडदेहांत परत येतो आणि तो जागा होतो. सूक्ष्म देहाला कोणता अनुभव मिळाला तें शिष्याला जागेपणीं आठवेल (किंवा कोणीतरी सांगेल) अशी सद्‌गुरूंनीं योजना केलेली असते. शिष्य जागा झाल्यावर त्याला तो अनुभव आठवतो व 'स्वप्नांत' मला अमुक अमुक दृष्टान्त झाला किंवा अनुभव आला असें तो म्हणतो. स्वप्न नांवाची एक मनाची अवस्था आहे.[१] त्या अवस्थेंत माणूस सूक्ष्मदेहानें कांहीं अनुभव घेत असतो. या अवस्थेंत आलेले अनुभव (नीट आठवले तर) खरे असतात. ही स्वप्नस्थिति व अपचनमनस्तापादि कारणांनी पडणारीं वेडींवाकडीं स्वप्नें ह्यांत महदंतर आहे. जागें झाल्यावर आपणास जें जें आठवतें त्यास आपण 'स्वप्न' हें नांव देतों.

(टीप मागील पानावरून चालू)

first stage is that of the Probationary Pupil when a Master of the Wisdom puts the aspirant 'on Probation' This is done either on the physical or astral plane, but more usually on the latter. At the Master's command, the aspirant is conducted to Him by a senior pupil and the Master formally puts the candidate on Probation."

१ वेदान्तांत मनाच्या अनेक अवस्था सागितलेल्या आहेत. कांही ग्रंथांत अवस्थांची संख्या जास्त दिलेली आहे व कांहीत कमी दिलेली आहे. अर्थात् अवस्थांची जी नांवें ग्रंथांत दिलीं आहेत त्याचा प्रत्येक ग्रंथांतला अर्थ एकच असेल असें नाही. विषय सुगम व्हावा म्हणून आम्ही या पुस्तकात बहुतेक ठिकाणी अवस्थांचीं हीं निरनिराळी नांवें टाळली आहेत आणि 'जागृतीपेक्षां मनाची उच्च अवस्था' या अर्थानें 'स्वप्न' हा शब्द या पुस्तकांत योजला आहे, आणि वेदांतांतील सार्‍या उच्च अवस्था 'स्वप्न' शब्दांत समाविष्ट केल्या आहेत. महाराष्ट्रीय संतांचाही स्वप्न शब्दाचा अर्थ आमच्या सारखाच अनेक स्थळीं असावा असें वाटतें.

पण एकांत उच्च व श्रेष्ठ असा अनुभव असतो. त्याला ' दृष्टांत म्हणतात. दुसऱ्यांत फक्त भ्रम असतो. सर्व जगभर प्रवास करण्याची कटकट टाळून वरील रीतीनें सिद्धसंघांतील पुरुष शिष्यस्वीकार करीत असतात.[१] कधीं कधीं त्या पुरुषांचे अधिकृत वडील शिष्यही नव्या शिष्याचा अशा रीतीनें अंगीकार करूं शकतात.

## आकस्मिक भेट

शिष्यस्वीकार करण्याची ही सर्वसामान्य पद्धति होय.[२] पण एकाद्या वेळीं अनुग्रह देणारा पुरुष व अनुग्रह घेणारा माणूस हे दोघे जवळजवळ रहात असतात व एके स्थळीं येऊन भेटूं शकतात. त्या

१ शिष्यस्वीकाराचे अलीकडच्या काळाचे महत्त्वाचें उदाहरण मि. जे. कृष्णमूर्ति यांचें आहे. त्या वेळी त्याना जो उपदेश करण्यांत आला तो त्यांनीं At the Feet of the Master या पुस्तकांत प्रसिद्ध केलेला आहे. या गोष्टीची माहिती मि. लेडबीटर यांनी एके ठिकाणी दिली आहे. तिचा मथितार्थ असाः– "या तेरा वर्षांच्या मुलाला दर रात्रीं सूक्ष्मदेहानें सद्गुरूच्या (Master) निवासस्थानीं नेण्याचें काम मजकडे असे. सद्गुरु सुमारें पंधरा मिनिटें त्याच्यापाशी बोलत व शेवटीं आपल्या उपदेशाचा सारांश एकदोन वाक्यांत साठवून ती वाक्यें ते त्याला पुनः ऐकवीत. यामुळें तीं त्याला पाठ होत. सकाळी उठल्यावर त्याला त्या वाक्याचें स्मरण असे. रोज सकाळी ती वाक्ये टिपून ठेवण्याचा त्याचा क्रम होता. या सारांश-वाक्यांची एकत्र गुफण करून ती "At the Feet of the Master" या पुस्तकांत दिली आहे.

२ बाह्य वेषधारी साधूच्या संबंधानें "तंव ते नेणोनि उपदेशाची रीती ।" म्हणजे ही उपदेशाची पद्धति त्यांना माहीत नसते असें ज्ञानेश्वरांनीं म्हटलें असून त्यांच्या भगव्या वस्त्रांनी जनतेची फसवणूक होते असें सांगतात. ज्ञानेश्वर गाथा आवटे क्रमांक ५०४.

प्रसंगीं अनुग्रहाची सर्व प्रक्रिया जागृत स्थितींत दृश्य भूमिकेवर होणें शक्य असतें.

वरील विवेचनावरून कांहीं गोष्टी स्पष्ट होतील. एक गोष्ट अशी कीं सद्गुरूच्या भेटीचा व अनुग्रहाचा प्रसंग शिष्याला अनपेक्षित असतो. आपल्या मुलाला जर आपणांला एकादा खासगी शिक्षक ठेवावयाचा असला तर आपण निरनिराळ्या शिक्षकांची चवकशी करतों, आपल्या मुलाचा कोणता विषय कच्चा आहे, कोणत्या अभ्यासांत त्याला विशेष प्रावीण्य मिळवावयाचें आहे, कोणता शिक्षक त्या गोष्टी उत्तम रीतीनें करूं शकेल याचा पुष्कळसा तपास करून अनेक शिक्षकांमधून आपण योग्य असा शिक्षक पसंत करतों. सद्गुरूची निवड अशा रीतीनें शिष्याकडून होत नाहीं. आपण अनेक पंडितांना व साधुपुरुषांना भेटावें, त्यांना प्रश्न विचारून पहावे, व त्यांपैकीं जो आपणास बुद्धिमान् व चारित्र्यवान् असा वाटेल त्याला आपण आपला 'सद्गुरु' म्हणून स्वीकारावें अशी खऱ्या 'सद्गुरूची' निवड केली जात नाहीं.[1] खरा सद्गुरु अंतर्दृष्टीनें सर्व जगाकडे पहात असतो. होतकरू माणसांना ओळखून त्यांची मुमुक्षुमार्गावर प्रगति करणें हें त्याचें एक अंगीकृत

---

१ अशा रीतीनें संतांचा तपास केला तर संत सांपडणें शक्य नाहीं असें तुकारामांनीं स्पष्ट सांगितलें आहे. तुकाराम म्हणतात "अनंत लक्षणें वानितां अपार। संताचें तें घर सांपडेना ॥ जयें घरीं संत राहती आपण। तें तुम्हां ठिकाण आतुडेना। ठिकाण धरूनी पहावें ते संत। उगाच आकांत करूं नये। संत होऊनियां संतासि पहावें। तरीच तरावें तुका म्हणे॥ (आवटे तुकाराम गाथा क्रमांक ४३०) म्हणजे संतांची स्तुतिपर लक्षणें कितीही सांगितलीं तरी त्या वर्णनावरून संतांना हुडकतां येणार नाही. ज्या ठिकाणीं ते असतात तें ठिकाण तुम्हांला सांपडणार नाही. स्वतःच्या ठिकाणीं स्वस्थ राहूनच संतांना पहाण्याची खटपट करावी, उगीच गडबड करण्यांत अर्थ नाहीं. स्वतःच्या अंगांत संतपणा आणण्याचा उद्योग कराल तर संत दृष्टीस पडतील व तुम्ही तरून जाल.

कर्तव्य असतें. भावी होतकरू शिष्याकडे त्याचें अगोदरच लक्ष असतें. त्याचे आध्यात्मिक प्रयत्न त्याच्या ध्यानांत असतात, आणि त्याच्या तयारीचें माप भरलें की तो सद्गुरु आपण होऊन त्याला स्वत:जवळ ओढतो व शिष्यत्व देतो. शिष्याला त्याची अगोदर कल्पना नसते, आणि म्हणून त्याची व सद्गुरूची भेट झाली कीं ती त्याला आकस्मिकपणें झाली असें वाटतें.

संतकवीच्या ग्रंथांत अशा प्रकारचीं विधानें सांपडतात. तुकाराम म्हणतात "अर्थ कामा चाड नाहीं चित्ता । मानापमान मोह माया मिथ्या ।। वर्ते समाधानी जाणोनी नेणता । साधु भेट देती तया अवचिता । म्हणजे पैसा, कामना, मानापमान, मोह वगैरेंपासून ज्याचें मन अलिप्त आहे अशा समाधानी व निगर्वी माणसाला साधु अकस्मात् भेट देत असतात. त्यांनीं आणखी म्हटलें आहे की माझ्या गांठी पुण्यसंचय नसूनही माझी व संतांची अवचित भेट होऊन माझा त्यांनीं अंगीकार केला व मी सनाथ झालों. संती केला अंगिकार। त्यांसि अभिमान थोर । कांही ठेविलें चरणीं । घेति तेंचि पुरवूनी ।। तुका पायवणी । घेऊनिया निराळा ।। नसतां कांहीं संचित । भेटि झाली अवचित । देव मिळोनियां भक्त। तुका केलासे सनाथ।।[1] ज्ञानेश्वरही आपल्या गुरूची गांठ अचानक रीतीनें झाल्याचें सांगतात: अंध मंद दृष्टि झाली । गिळूं पाहे हा काळ । अवचित दैवयोगें निवृत्ति भेटला कृपाळू। म्हणजे मी अज्ञानांधकारांत असतांना निवृत्तिनाथाची व माझी अचानक गांठ पडली. तोच अभिप्राय त्यांनीं पुन: 'तिमिर आलें पुढें । मायामोहो उदारु ।। तेणें मी जात होतों । मग सहज भेटला सद्गुरू।।[2] या शब्दांनीं सांगितला आहे. ज्ञानेश्वरींत त्यांनीं जास्त खुलासा केला आहे. ते म्हणतात 'ऐशी कर्मं साम्यदशा। होय तेथ वीरेशा । मग श्रीगुरु आपैसा । भेटेचि गा ।।[3] जुनीं वाईट कर्मफळें

१ तुकाराम गाथा (आवटे) क्रमांक ४१८ व ३९३४.

२ आवटे कृत ज्ञानेश्वर गाथा क्रमांक ७४६ व ७४८.

३ ज्ञानेश्वर १८, ९६६.

भोगून संपत आहेत व नवीं वाईट कम हातून होत नाहींत, अशी कर्माची जी साम्यदशा, त्या टप्प्याशीं माणूस येऊन पोहोंचला म्हणजे श्रीगुरु त्याला आपोआप भेट देतात.

अवचित दैवयोगें निवृत्ति भेटला कृपाळू ॥ हे शब्द वाचून आमच्या वाचकांना आश्चर्य वाटेल. निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे वडील भाऊ होते व ते दोघे एकत्र रहात होते. तेव्हां निवृत्तिनाथ अवचित भेटले म्हणजे काय असा प्रश्न त्यांच्या मनांत येईल. त्याचें उत्तर असें कीं, गुरुशिष्यांच्या ऋणानुबंधाच्या गोष्टी गुप्त ठेविलेल्या असतात. निवृत्तिनाथ हे गहिनीनाथांचे शिष्य आहेत व निवृत्तिनाथांनाही शिष्यस्वीकार करण्याचा अधिकार गहिनीनाथांनी दिलेला आहे ही गोष्ट अगोदर ज्ञानेश्वरांना माहीत नसणार. तेव्हां निवृत्तिनाथांनीं गुरु म्हणून जेव्हां ज्ञानेश्वरांना शिष्यत्व दिलें तेव्हां ती गोष्ट ज्ञानेश्वरांना अकल्पित घटनेसारखी वाटावी हें साहजिकच आहे.

रामदासांचीही गांठ अशीच अवचित झालेली आहे. रामदासांना एक वडील बंधु होते. त्यांना त्यांच्या वडिलांनी उपदेश दिलेला होता. वडील वारल्यावर रामदास आठ वर्षांचे असतांना त्यांनीं मला उपदेश द्या असा वडील बंधूंशी हट्ट धरला. रामदास लहानपणीं हूड असल्यानें बंधूनीं त्यांना सांगितले की, तुझा हूडपणा जाऊन तूं अंमळ मोठा झालास म्हणजे मग तुला उपदेश देऊं. रामदासांच्या मानी स्वभावास तें आवडलें नाहीं. ते रुसून गांवाबाहेर असलेल्या मारुतीच्या देवालयांत गेले. तेथें त्यांस झोंप लागली. त्या झोपेंत त्यांना श्रीरामांनीं दर्शन दिलें. या अनुभवासंबंधानें समर्थ म्हणतात, " पुढें ज्येष्ठ बंधु न सांगेचि कांहीं । सुखें देवालयीं निद्रा केली । निद्रा केली तेथें श्रीरामें उठवूनि । तोचि मंत्र कानीं सांगितला ॥"[१] ही गांठही अवचित झालेली आहे हें आमचे

१ पहा पांगारकरकृत मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ पृ ६९, ७० व समर्थ ग्रंथभांडार उत्तरार्ध पृ. ४२७ क्रमांक २.

वाचक जाणतीलच. अनाथा दिनाची समर्थासि चिंता । त्वरें बोळला राम आनंद दाता । अकस्मात स्वप्नीं समाधान केलें । समर्थें दिनालागिं आनंदवीले ॥ या श्लोकांत रामदासांनीं अकस्मात हाच शब्द योजला आहे.[१] एकाच भेटीचीं हीं दोन वर्णनें असण्याचा संभव आहे.

प्राय: अशा गुरुभेटी जागृत स्थितींत होत नाहींत, त्या स्वप्नांत होतात. रामदासांची भेट स्वप्नांत झाली हें वर दिलेंच आहे. तुकारामांनीं 'मानियेला स्वप्नीं गुरूचा उपदेश' असें सांगितलें आहे. त्यावरून त्यांना गुरूचा अनुग्रह स्वप्नांत झाला होता हें उघड आहे. इतर अनेक संतांनाही तो स्वप्नांत झालेला आहे. हा अनुग्रह होते वेळीं देह सुखानें झोंपविण्याची सोय होत असली तर कोणतीच अडचण येणार नाहीं. शिष्य स्वाभाविकपणें रात्रीं झोंपेल व त्या वेळीं त्याच्या सूक्ष्मदेहाला विशिष्ट स्थळीं नेण्यांत येऊन सद्‌गुरु त्याच्यावर अनुग्रह करतील, रात्र संपल्यावर तो जागा होईल. त्याला त्या अनुग्रहाची गोष्ट आठवेल. पण त्यानें लोकांसमोर तो अनुभव परिस्फुट केला नाही तर त्यांना कांहीच कळणार नाहीं. तो नेहमीसारखा रात्रीं झोपीं गेला व नेहमींसारखा सकाळी उठला इतकेच त्यांना समजेल. पण अनुग्रहाची वेळ रात्रींची नसली व त्याला दिवसा ठराविक वेळीं झोप येत नसली, अथवा वेळ रात्रींची असूनही त्याला झोप येईनाशी झाली तर कृत्रिम रीतीनें त्याच्या देहावर झोंप लादावी लागेल, व त्या स्थितीत त्याला कांहीं काळ मुद्दाम ठेवावा लागेल. कधीं कधी एकाद्या विशिष्ट अनुग्रहाचें कार्य थोड्या वेळांत संपण्यासारखें नसलें,[२] त्याला एका रात्रीपेक्षां जास्त काळ

१ देवकृत समर्थहृदय द्वितीय खंड पृ. ५६२.

२ मि. जे कृष्णमूर्ति याना १९११ सालच्या जानेवारी महिन्यांत एका विशेष अनुग्रहाचा लाभ मिळाला होता. त्या वेळी ते अड्यार येथें रहात होते. डॉ. बेझंट या त्या वेळी थिऑसफिकल सोसायटीच्या अध्यक्ष होत्या व

( शेष पुढील पानावर चालू )

लागण्याजोगा असला, तर तो दिवसा अकारण निजला आहे, तो जागा होत नाहीं असें सभोंतालच्या लोकांस वाटेल. त्याला कांहीं व्यथा झाली आहे अथवा त्याला भुतानें झपाटलें आहे अशीही त्यांची कदाचित् कल्पना होईल. संताच्या ग्रंथांत देह निपचित पडल्याच्या गोष्टी दिलेल्या आढळतात. मुकुंदराजांचे आजेगुरु हरिनाथ होते. त्यांच्यावर जेव्हां श्रीशंकरांचा अनुग्रह झाला त्या वेळीं ते निपचित पडले व त्यांची सर्व चेतना स्थिर झाली असें वर्णन मुकुंदराजांनीं केलें आहे.[१] 'उपदेश काळीं तदाकार। होतां पडे हें शरीर। अथवा नेणें हें आपपर। ऐसें झालें पाहिजे' ॥[२] असें रामदासांनी दासबोधांत म्हटलें आहे. त्यांनीं आपल्या एका अभंगांत आपले वडील सूर्याजीपंत यांस रामचंद्रांचा अनुग्रह झाल्याची माहिती दिली आहे. ते सांगतात कीं एकदां मध्यरात्रींच्या सुमारास सूर्याजीरावास बोलावून एका देवळांत नेण्यात आलें होतें. तेथें श्री रामचंद्र त्यांच्या दृष्टीस पडले. लगेच ... "झांपड नेत्रांसि पडे तेव्हां। पडे तेव्हां जसा दडवत भूमि।

---

(टीप मागील पानावरून चालू)

काशी येथे गेलेल्या होत्या. या अनुग्रहासाठी बराच काळपर्यंत मि. कृष्णमूर्ति याच्या देहाला बद केलेल्या जागेंत निश्चेष्ट पडून राहणें जरूर होतें. अड्यारच्या डॉ. बेझट यांच्या निवासस्थानाजवळील खोल्या बंद करण्याची परवानगी मि. लेडबीटर यांनी डॉ. बेझट यांचेकडून तारेनें त्या वेळी मिळविली व त्यांत सर्व व्यवस्था केली. इतर माहितीसह ह्या तारा थिऑसफिस्ट मासिकाच्या सप्टेंबर १९३२ च्या अंकांत ७४२ पृष्ठावर प्रसिद्ध झालेल्या आहेत. थिऑसॉफिकल सोसायटीच्या १९११ सालच्या वार्षिक अहवालांत अध्यक्ष डॉ. बेझंट यांनी (पृ. ७ वर) पुढील माहिती दिली आहे: ह्या बालवयी शिष्याचा रिता देह सोसायटीच्या आद्यपीठांत गेल्या जानेवारी महिन्यांत मोठ्या काळजीनें संभाळून ठेवण्यांत येऊन त्या वेळीं त्याच्या जीवात्म्याला दीक्षा घेण्यासाठी दूर तिबेटमध्यें नेण्यांत आलेलें होतें.

१ पहा भावेकृत महाराष्ट्र सारस्वत आवृत्ति चौथी पृ. ३९.

२ पहा दासबोध ७, ६, ७.

मग अंतर्धामीं बोलाविलें।।" मग कांहीं गोष्टी त्यांना सांगण्यांत येऊन श्री रामचंद्र गुप्त झाले[१] एकवीस समासी अथवा जुना दासबोध नांवाचा समर्थांचा एक ग्रंथ आहे. त्यांत एके ठिकाणी गुरूच्या अनुग्रहाचें वर्णन आहे. त्याचा सारांश समर्थांच्या शब्दांत पुढीलप्रमाणें आहे: 'देहाचें स्मरण नाहीं। निचेष्टित झालें विदेही। स्वरूपाभास तोही। मोडोनि गेला ।। . . . ऐसे तटस्थ (म्हणजे निश्चेष्ट) घटिका चारी। उपरीं आले देहावरी। परी स्वसुखाची अंतरी। कळा बाणोनि गेली ।। . . . ते खूण अनुभवी जाणती। येरां अतर्क्य ।।[२] एकनाथांनीं आपल्या भागवतांत दत्तात्रेयांनीं जनार्दन स्वामींवर अनुग्रह केल्याची गोष्ट वर्णिली आहे. त्यांत एकनाथ म्हणतात: "तो बोधु आकळतां मना। मन मुकलें मनपणा। अवस्था नावरेचि जनार्दना। मूर्छापन्न पडियेला।" असल्या अनुग्रहविषयक परमपवित्र गोष्टींचें विस्तृत व उघड वर्णन करणें सतकवींना ठीक वाटत नसे. म्हणून हें वर्णन संपल्यावर नाथ म्हणतात,[३] "मज तंव चुकी पडिली मोठी। चुकूनि सांगितली गुरुगोठी। तेही संस्कृत नव्हे, मराठी। वृथा चावटी न म्हणावी ।। जो असेल गुरुभक्त। तो हें जाणेल मनोगत। जो गुरुस्मरणे सदोदित ।। त्यासी हें हृद्‌गत कळेल"[४] ।।

१ पहा पागारकरकृत श्रीसमर्थ ग्रंथभांडार उत्तरार्ध पृ. ४२७

२ पहा एकवीस समासी अथवा जुना दासबोध १४, ७८–८१.

३ टीप–एकनाथी भागवत ९, ३६–४१.

४ टीप–वामन पंडितास जो गुरु-अनुग्रह झाला तो त्यानी निगमसारांत दिला आहे. त्यातील काही भाग भावेकृत महाराष्ट्र सारस्वतात (पृ. ४५९ आवृत्ति ४) उद्‌धृत केलेला सापडेल. त्या वेळी वामन पंडित मनाच्या कोणत्या अवस्थेत होते ते स्पष्ट नाही. त्याना गुरु अनपेक्षितपणे सहजासहजी भेटले, त्यावेळी त्यांची जाणीव एकदम उच्च झाली, गुरूनी त्याना भार्गवी वारुणी विद्या शिकविली असें वामनपंडित म्हणतात. प्रत्यक्ष दिसण्याच्या अगोदर ते त्याच्या हृदयात आले (आधी स्फुरला हृदयकमळी) व ते गेल्यावर वामनाना हृदयात पुन: अनुभवास आलें (नेत्र झाकोनि अवलोकिले। हृदयामाजी) वगैरे वर्णनावरून वामन पंडित त्या वेळी नेहमीच्या मन:स्थितीत नसावे, दिवास्वप्नासारख्या मनाच्या उच्च अवस्थेंत कांहीं वेळ गेलेले असावे असें वाटतें.

## प्रकरण ४ थें

# उत्क्रांतीचे अज्ञात जीवन-प्रवाह

माणसाची प्रगति सावकाश होत असते. प्रथम तो 'रानटी' स्थितींत असतो. त्यावेळीं तो अज्ञ, क्रूर, स्वार्थी बेवकूफ व व्यसनी असतो. कित्येक जन्म घेतल्यावर त्याचे दुर्गुण कांहीं प्रमाणांत कमी होतात व आपण त्याला 'खेडवळ' किंवा 'गांवढळ' माणूस म्हणूं लागतों. आणखी कांहीं जन्म घेऊन व त्यांतील धक्केचपेटे व सुखें अनुभवून तो थोडासा सुधारतो आणि मग आपण त्याला 'सामान्य दर्जाचा माणूस' म्हणून ओळखतों. त्या वेळीं त्याच्या अंगांत थोडीशी कर्तबगारी व हुशारी आलेली असते आणि स्वभावांतील हिरवटपणा जरासा कमी झालेला असतो. या दर्जाचे कित्येक जन्म घेतल्यावर त्यांतील अनुभवानें तो शहाणा व गुणवान् बनूं लागतो. आपण असल्या माणसाला 'सुसंस्कृत' 'विचारी', सत्शील', 'कर्तृत्ववान्' अशीं विशेषणें देतों. अशा रीतीनें सुधारत सुधारत, दुर्गुण कमी करीत व सद्‌गुण वाढवीत वाढवीत आणि बुद्धिमत्ता, कर्तृत्व यांचा विकास करीत करीत त्याला एकसारखें पुढें जावयाचें असतें,—तो श्रीकृष्ण-बुद्धांसारखा सर्वगुणसंपन्न आदर्श मनुष्य होईपर्यंत त्याला पुढें जावयाचें असतें. ह्या त्याच्या प्रगतिमार्गावर अनेक टप्पे असतात. जंगली माणूस, गांवढळ

माणूस, प्राकृत माणूस, सुसंस्कृत माणूस हे अगोदरचे टप्पे वर निर्देशिले आहेतच.

सिद्धसंघांतील गुरूचा शिष्य होणें हा या मार्गावरील एक टप्पा आहे. सुसंस्कृत माणूस ज्या ठिकाणीं आलेला असतो त्याच्या पुढचा तो टप्पा आहे. हा टप्पा त्यानें गांठला कीं तो मोक्षमार्गाला लागतो, प्रगति करण्याचा उद्योग तो नेटानें व बुद्धिपुरस्सर सुरू ठेवतो आणि कित्येक जन्मांनंतर सर्वगुणसंपन्न आदर्श मनुष्याचा मानवी प्रगतिमार्गावरील शेवटचा टप्पा तो गांठू शकतो. हा शिष्यत्वाचा टप्पा एका विशिष्ट ठिकाणीं आहे. जो वाटसरू वाटचाल करीत करीत त्या ठिकाणाच्या जवळपास आलेला असेल त्यालाच तो टप्पा गांठणें शक्य असतें. कॉलेजमध्यें जावयाचें असलें तर मॅट्रिक परीक्षा पास होईपर्यंत अगोदर मजल मारावी लागते. जो. मॅट्रिक परीक्षा पास झालेला नाहीं त्याला कोणत्याही कॉलेजचा प्रिन्सिपल आपल्या कॉलेजमध्यें प्रविष्ट करून घेत नाहीं. तद्वत् सुसंस्कृत माणसाचा टप्पा ज्यानें गांठलेला नाही अशा व्यक्तीला सिद्धसंघांतील जीवन्मुक्त पुरुष स्वतःचें शिष्यत्व देणार नाहीं. एकाद्या हौशी पुरुषानें कुत्रा पाळला तर त्या कुत्र्याचा व त्या पुरुषाचा ऋणानुबंध जडून त्या दोघांचें एकसारखें परस्पर संघटन होऊं लागतें. धनी कुत्र्यावर प्रेम करतो व कुत्र्याला अनेक गोष्टी शिकवितो. घर राखणें, मुलांशीं खेळणें, धन्याबरोबर फिरावयास जाणें, चोरावर भुंकणें, फेंकलेला चेंडू आणणें, उड्या मारून आनंद व्यक्त करणें, निरनिराळीं माणसें ओळखणें वगैरे अनेक गोष्टी तो कुत्रा त्या धन्याच्या सान्निध्यांत शिकतो, व न पाळलेल्या इतर कुत्र्यांच्या मानानें त्याची प्रगति फार जलद होते. तद्वत् जीवन्मुक्त सद्गुरूनें एकाद्याचा शिष्य म्हणून अंगीकार केला तर त्या संबंधामुळें त्याची प्रगति फार वेगानें होत असते. अर्थात् हा टप्पा मानवी आयुष्यांत फार महत्त्वाचा असणार हें उघड आहे.

## उत्क्रान्तीचा एक टप्पा

या टप्प्याबद्दल ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे "म्हणोनि जाणतेनें गुरु भजिजे। तेणें कृतकार्य होईजे। जैसें मूळसिंचनें सहजें। शाखा-पल्लव संतोषती'॥[1] म्हणजे ज्ञानी माणसानें गुरु करावा व कृतार्थ व्हावें. झाडाच्या मुळांवर पाणी घातलें म्हणजे तें पाणी सर्व पाना-फुलांना मिळतें. तद्वत् गुरु करणें ही मूलभूत गोष्ट आहे. ती केली म्हणजे माणसाची सर्वांगीण प्रगति होते. आजच्या सुशिक्षित लोकांची समजूत ह्याच्या उलट आहे. अज्ञानी माणसानें गुरु करावा, आम्हां सुशिक्षित व बुद्धिमान् माणसांना गुरु करण्याची गरज नाहीं असें त्यांना वाटतें. पण ही गैरसमजूत आहे. वस्तु-स्थिति अशी आहे कीं, आजच्या सुशिक्षित लोकांपैकीं बहुतेक मंडळी अद्यापि शिष्यत्वाच्या टप्प्याच्या जवळपासही आलेली नाहींत. शिष्यत्व मिळविण्याला जी योग्यता लागते, ती अद्यापि त्यांच्या अंगीं बाणलेली नाहीं. आज कोणताही जीवन्मुक्त सद्गुरु त्यांना शिष्यत्व देण्यास तयार होणार नाहीं. मनाचा निर्मळपणा, हेतूंची शुद्धता, जीवनाची शिस्त, ध्येयाची ओढ, सेवेची हौस वगैरे बाबतींत आजच्या सुशिक्षित माणसाला जीवन्मुक्तांच्या हिशेबा-नुसार पुरेसे मार्क पडणार नाहींत.

शिष्यत्वाच्या टप्प्यापाशीं माणूस कसा येतो त्याचें ज्ञानेश्वरांनीं जे वर्णन केलें आहे तें पहाण्यासारखें आहे. "जैसें धरवणी वेंचे सरे। तैसें भोगें प्राचीन (पूर्व कर्म) पुरे। नवें तंव नुपकरे। कांहीचि करूं॥ ऐशी कर्मे साम्यदशा। होय तेथ वीरेशा। मग श्रीगुरु आपैसा। भेटेचि गा"॥[2] झरा नाहीं अशा तलावांत पावसाचें सांचलेलें पाणी असतें. ह्या पाण्याचा खर्च करावा तसतसें तलावांतील पाणी कमी कमी होऊन शेवटीं तें आटून जातें. माणसाचें जें भोगण्याचें पूर्वसंचित असतें तें अशा तलावांतील सांचलेल्या पाण्यासारखें झालें पाहिजे. तें

---

१ ज्ञानेश्वरी १,२५; २ ज्ञानेश्वरी १८; ९६५–९६६.

पूर्वसंचित भोगून संपावयास लागलें आहे, व नवीन दुष्कर्माचा झरा त्या तलावांत नसल्यामुळें कांहींही झालें तरी त्या तलावांतील कर्मरूपी पाणी जास्त होत नाहीं अशी स्थिति आली पाहिजे. म्हणजे माणसाच्या कर्माची एक प्रकारची अशी साम्यावस्था आली पाहिजे, अर्थात् त्याचें वर्तन असें झालें पाहिजे की, त्याच्या बंधनकारक कर्मांत नवी भर पडत नाहीं व जुनें बंधनकारक कर्म भोगून कमी कमी होत चाललें आहे. या टप्प्यापाशी माणूस आला म्हणजे आपोआप माणसाचा सद्‌गुरूशीं ऋणानुबंध जडतो असें ज्ञानेश्वर सांगतात.

दुसऱ्या एका ठिकाणीं त्यांनीं या टप्प्याचें जें वर्णन केलें आहे तें पाहूं या. ज्ञानेश्वर म्हणतात[1] 'जे तो विषयांची दाट झाडी। माजि कामक्रोधांची सांकडीं। चुकवूनि आला पाडीं (पहाडावर)। सद्वासनेच्या ।। मग साधुसंगें, सुभटा। उजू सत्कर्मांचिया वाटा। अप्रवृत्तीचा अव्हांटा (आडमार्ग)। डावलूनि ।। आणि जन्मशतांचा वाहतवणा (वाटसरू)। तेवींचि आस्थेचिया न लेत वहाणा। तेथ फलहेतूचा उगाणा (हिशेब)। कवणु चाळी ।। ऐसा शरीर-संयोगाचिये राती–। माजि धांवता सडियाआयति (निःसंगपणें)। तंव कर्मक्षयाची पाहाती (प्रकाशमान)। पहांट झाली। तैसीच गुरुकृपा उखा उजळली। ज्ञानाची वोतपली (कोंवळें ऊन) पडली" ।। याचा अर्थ असा : मनुष्य अगोदर विषयसुखांच्या दाट झाडींतून व कामक्रोधांच्या अडचणींतून बाहेर पडून सद्वासनेच्या पहाडावर येतो; आणि चांगल्या लोकांच्या संगतींत राहून सत्-कर्माच्या सरळ वाटेनें पुढें जातो व वाईट वर्तनाचा आडमार्ग टाळतो. शेंकडो जन्म वाटचाल करणारा हा प्रवासी त्यानंतर आसक्तीच्या वहाणा पायांत घालण्याचें सोडून देतो आणि फला-शेचा हिशेब करीत नाहीं. शरीर धारण करण्याच्या या काळो-खाच्या स्थितींतून निःसंगपणें तो पुढें धांवत असतो. मग कर्म

---

१. ज्ञानेश्वरी ७, १२७ ते १३१.

संपण्याच्या उजेडाची पहांट फुटूं लागते. त्याच वेळेस गुरुकृपेची उषा प्रकाशण्याची सुरवात होते आणि माणसाला ज्ञानाच्या कोंवळ्या किरणांचा लाभ होतो. हाच मुद्दा अन्य शब्दांनीं ज्ञानेश्वरांनीं आणखी एका स्थळीं पुढील शब्दांत मांडला आहे. " तैसा कामदिकीं तिघीं । सांडिला सुख पावोनि जगीं । संगु लाहे मोक्ष-मार्गी । सज्जनाचा ।। मग सत्संगें प्रबळें ।। सत्शास्त्राचेनि बळें । जन्ममृत्यूची निमाळें (माळजमिनीची) । निस्तरें रानें ।। ते वेळीं आत्मानंदें आघवें । जें सदा वसतें बरवें । तें तैसेंचि पाटण पावे । गुरुकृपेचें ।।[1] म्हणजे काम, क्रोध व लोभ या तीन दुर्गुणांनीं ज्याला सोडलें आहे तो जगांत सुखी होतो, व मोक्षमार्गानें पुढें जात असणाऱ्या प्रवाशांच्या संगतीचा त्याला लाभ होतो. त्या सत्संगतीचें व धर्मग्रंथाचें साहाय्य घेऊन तो जीवनाच्या रानांतील कित्येक जन्ममृत्यूच्या माळजमिनी ओलांडून पलीकडे जातो. त्याच वेळी आत्मानंदानें भरलेलें आणि सदा आंत वस्ती असलेलें असें जें ' गुरुकृपा ' नामक शहर त्यापाशीं तो येऊन ठेपतो. या सर्व वर्णनावरून दिसून येईल कीं, माणसाला उत्क्रान्ति मार्गावरून बरीच वाटचाल करावी लागते, त्याचे दुर्गुण नष्ट व्हावे लागतात, चांगल्या लोकांशी त्याचा संबंध येऊन त्यांच्या संगतींत कांहीं सामान्य दर्जाचे जन्म घालवावे लागतात, तेव्हांच जीवन्मुक्त गुरूचा ऋणानुबंध जोडण्याच्या स्थानकापाशी तो येऊन पोहोंचतो.

इतर संतांनीं हा विषय इतका स्पष्ट मांडलेला आमच्या पहाण्यांत नाहीं. पण 'अनंत जन्मीचें पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे ।।[2] असें रामदास म्हणतात. तुकाराममहाराजही सांगतात 'मी पुष्कळ काळ घालविला आहे, पूर्वीं अनुचित वर्तन केलें आहे' व 'बहुजन्माशेवटीं । स्वामी तुझी भेटी [3]।। ' असें मला झालेलें आहे. शिष्यत्वाच्या ह्या टप्प्याचें हें मोघम वर्णन आहे.

---

१ ज्ञानेश्वरी १६, ४४० ते ४४२. २ दासबोध १, ९, २४.

३ तुकाराम गाथा आवटे क्रमांक ४१३७.

## तुकाराममहाराज

तुकारामांच्या सद्‌गुरूंनीं तुकारामांचा शिष्य म्हणून अंगीकार केल्याची हकीकत तुकारामांनीं पुढीलप्रमाणें दिली आहे:—

संतगुरुरायें कृपा मज केली[१]। परी नाहीं घडली सेवा कांहीं ।। सांपडविलें वाटे जातां गंगे स्नाना। मस्तकी तो जाणा ठेविला कर। भोजना मागती तूप पावशेर। पडिला विसर स्वप्नामाजीं ।। कांहीं कळे उपजला अंतराय। म्हणोनिया काय त्वरा झाली ।। राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खूण माळिकेची ।। बाबाजी आपलें सांगितलें नाम । मंत्र दिला रामकृष्णहरी ।। माघशुद्ध दशमी पाहूनि गुरुवार। केला अंगिकार तुका म्हणे ।। असल्या अनुभवांत महत्त्वाच्या पुष्कळ गोष्टी मुद्दाम सांगितलेल्या नसतात; व ज्या सांगितलेल्या असतील त्या प्रायः महत्त्वहीन असतात; आणि त्यांचा अर्थही मुद्दाम अस्पष्ट ठेविलेला असतो. पण माझ्या हातून पुरेशी सेवा न घडतांही सद्‌गुरूंनीं मजवर कृपा करून माझा शिष्य म्हणून अंगीकार केला, माझ्या प्रगतिमार्गांत कांहीं विघ्न आलें होतें म्हणून माझा शिष्यस्वीकार करण्याची माझ्या गुरूंनी घाई केली, शिष्यस्वीकाराच्या विधीच्या प्रसंगीं त्यांनीं माझ्या डोक्या-वर हात ठेविला, स्वतःची गुरुपरंपरेची मालिका सांगितली, बाबाजी असें स्वतःचें नांव सांगितलें, मला एक मंत्र दिला व हा सारा विधि स्वप्न नांवाच्या स्थितींत झाला इतका अर्थ निश्चित आहे. शिष्यस्वीकार अनेक दर्जांचे असतात. प्रत्येकाचे वेगळे विधि असतात. त्यांतल्या बऱ्याचशा गोष्टी इतरांस सांगण्यास बंदी असते. तुकारामांच्या मनोवृत्तींशीं जीं माणसें समरस असतील, तुकाराम ज्या वाटेनें प्रगति करीत होते त्या वाटेनें आपणही जावें अशी ज्यांना हौस असेल अशा लोकांना उत्तेजन मिळावें एवढ्याचसाठीं हा साक्षात्कार तुकारामांनीं जनतेसमोर

---

१ तुकाराम गाथा आवटे क्रमांक ३७०९ जोग ३४२७.

मांडिलेला आहे, हें आमच्या वाचकांनीं विसरूं नये. शिष्याचा अंगीकार करतांना सद्‌गुरु शिष्याच्या डोक्यावर हात ठेवतात. त्या वेळीं एक विशेष प्रकारची शक्ति ते आपल्या हातांतून त्याच्या देहांत घालतात आणि त्यामुळें त्याचा सूक्ष्मदेह आकारानें वाढतो, व त्यांतील सद्‌वृत्ति जोरकस होतात.[१] कित्येक वेळां ते मंत्र देतात. प्रत्येक मंत्रासंबंधाचे कांहीं नियम असतात. ज्या शिष्याचा अंगीकार केलेला असेल त्याच्या अंतरंगांत त्या विधीच्या वेळीं कांहीं प्रक्रिया घडत असतात. मंत्रांचा त्या प्रक्रियांशीं संबंध असतो, व त्यानें मंत्र म्हटल्यास त्याची त्याला प्रगतिमार्गावर मदत होत असते. वाटेल त्यानें पुस्तकांतून तो मंत्र म्हटल्यास तसा परिणाम होण्याचा संभव नाहीं. या सर्व गोष्टींचा खुलासा ह्या विधीच्या वेळीं शिष्याला सांगण्यांत येतो.[२]

---

१ ही गोष्ट एकनाथानीं ध्वनित केलेली दिसते. ठेवितांचि मस्तकीं हात । देवचि करित तयासी ।। असें त्यांनी संताना उद्देशून लिहिलें आहे. पहा– एकनाथ, गाथा आवटे क्रमाक १५७२.

२ या अनुभवांत उल्लेखिलेले बाबाजी हे कोण होते तें नक्की सांगणें सोपें नाही. परमहंस योगानंद याचें Auto-biography of a Yogi नांवाचें पुस्तक अलीकडे प्रसिद्ध झालेले आहे. हे योगानंद कित्येक वर्षें अमेरिकेत होते व तेथें १९५२ च्या मार्च महिन्यात वारले. त्याचे गुरु युक्तेश्वर, युक्तेश्वरांचे गुरु लाहिरीमहाशय व लाहिरीमहाशयांचे गुरु 'बाबाजी' होते असें वरील पुस्तकात लिहिलेलें असून त्यांत बाबाजींच्या माहितीचीं दोन प्रकरणें ३३ व ३६ आहेत.

बाबाजी हे एक महाज्ञानी योगी असून फार वर्षें हयात आहेत. पण ते वयानें अगदी तरुण दिसतात असें योगानंदांनी लिहिलें आहे. युक्तेश्वर, लाहिरी महाशय व बाबाजी याच्या अनेक गांठीभेटी झालेल्या होत्या. कित्येकदां बाबाजी अनपेक्षित ठिकाणीं दिसावे व कांही वेळानें गुप्त व्हावे असाही अनुभव आलेला आहे. योगानंदांस ते एकदां भेटले होते. त्याची हकीकत पृ. २८८

(टीप पुढील पानावर चालू)

स्वत: शिष्य करून त्यांवर अनुग्रह करण्याचा अधिकार पुढें तुकारामांनाही प्राप्त झाला. बहिणाबाई ही त्यांची शिष्या होती. प्रथम ती कोल्हापुरास असतांना तुकाराम महाराजांची कीर्ति तिच्या कानांवर गेली. तुकाराम हे त्या वेळीं देहूस असून तिनें त्यांना पाहिलेलें

---

(टीप मागील पानावरून)

वर आहे. त्यानी योगानंदास पाठविलेल्या एका सदेशाची माहिती पृ. ३३१ वर आहे. त्यांचा देह कित्येक शतके टिकलेला असून ते बहुधा सामान्य जनतेत येत नाहीत व बद्रिनारायणाजवळील हिमालयाच्या भागात अद्या-पीही रहातात असें योगानद लिहितात. (पृ. २५० व २५२.)

भाविक माणसें माननीय लोकाना जेवण्यास बोलावतात व त्याना खाण्यापिण्याचा आग्रह करतात हें सर्वश्रुत आहे योगानंदांनी लिहिलें आहे की बाबाजी क्वचितच अन्नग्रहण करतात. (The Master seldom eats) पण असल्या लोकाना खाण्याचा आग्रह होत असणार हें निश्चित. तेव्हा शिष्टाचार म्हणून ते कधी फळें घेतात अथवा दुधात शिजविलेला भात व तूप हीं खातात. (As a social courtesy to visiting disciples he, occasionally accepts fruits or rice cooked in milk and clarified butter पृ. २५३) तुकारामानी केलेल्या अनुग्रहांत 'भोजन मागती तूप पावशेर' असे शब्द आहेत. हे शब्द अत्यंत विचित्र वाटण्याजोगे आहेत. पण योगानदानी दिलेल्या माहितीवरून त्याचा अर्थ समजतो. तुकारामांनी त्याना आग्रह केला असावा, मी जेव्हा जागृत अवस्थेंत असतों तेव्हां फार तर मी भातावर तूप घेऊन तो खातो, दुसरे काहीं शिष्याकडून घेण्याचा माझा शिरस्ता नाही व सध्या आपण नेहमीच्या जागृत स्थितीत नाही असें त्यांनीं तुकरामांना सागितलेलें असणार. आपण स्वप्नस्थितींत आहो हे तुकाराम अनुग्रहाच्या वेळेस थोडावेळ तरी विसरलेले होते असें वाटतें. हा सर्व विचार केल्यास 'भोजना मागती तूप पावशेर। पडला विसर स्वप्नामाजीं।' या म्हणण्याचा अर्थ लागतो. यावरून पहाता बाबाजी हे सिद्धसंघांतील एक अधिकारी पुरुष अथवा त्याचे अधिकृत शिष्य असावे असा संभव दिसतो.

नव्हतें.त्यावेळीं तुकारामांनीं बहिणाबाईच्या स्वप्नांत येऊन तिच्यावर अनुग्रह केला. बहिणाबाई लिहिते 'ठेऊनीयां कर मस्तकीं बोलला। मंत्र सांगितला कर्णरंध्रीं। ... कार्तिकांत वद्य पंचमी रविवार। स्वप्नींचा विचार गुरुकृपा ॥ आनंदलें मन चिद्रूप कोंदलें। उडोनि बैसलें चमत्कारें ॥ मंत्र आठवती तुकोबा स्वरूपें। स्वप्नामाजी कृपा पूर्ण केली ॥'[१] पुढें बहिणाबाई देहूस गेली व तिनें तेथील देवळांत तुकाराम कीर्तन करीत होते त्यांस पाहिलें. स्वप्नी जो देखिला तेंचि ध्यान तेथ। देखिलें नेमस्त पूर्ण दृष्टि ॥... तुकोबाचें ध्यान पूर्वीं कोल्हापुरीं। जें स्वप्नामाझारी देखियेलें। तेंचि ध्यान डोळां प्रत्यक्ष देखोनी। आनंद लोचनीं हेलावत ॥ असें ती म्हणते. अर्थात् स्वप्नांत दर्शन देणारे तुकाराम हेच अशी तिला ओळख पटली. तेव्हां या स्वप्नाला आभास म्हणतां येणार नाहीं.त्याला सत्यमूलक अनुभवाच्या सदरांत घातलें पाहिजे.

कचेश्वर ब्रह्मे यांसही तुकारामांनी स्वप्नांत अनुग्रह दिलेला आहे. त्या वेळीं दोघेही देहूस होते. तेव्हां त्यांना एकमेकांस भेटण्यास कोणतीच अडचण नव्हती; तरीही तुकारामांनी स्वप्नांत सूक्ष्म देहानें अनुग्रह दिलेला आहे. शिष्याला स्फूर्ति देण्याला स्वप्नस्थिति व सूक्ष्म देह हीं साधनें जास्त अनुकूल असतात असें या गोष्टीवरून वाटतें. या अनुग्रहासंबंधानें कचेश्वर लिहितात "ठेवियेला माझ्या माथ्यावरी हात। स्वयें झाला गुप्त स्वप्नामाजी ॥"[२]

## समर्थ रामदास

आपल्या सद्गुरूंचा आपणांवर झालेला अनुग्रह तुकारामांनीं थोडाफार परिस्फुट केलेला आहे. रामदासानीं तो तितकाही परिस्फुट न करतां गुलदस्तांत ठेविला आहे. दासबोधांत ते त्या अनु-

---

१ पहा पांगारकरकृत मराठी वाङमयाचा इतिहास खंड ३ पृ. १६ व १७ किंवा उमरखानकृत. 'संत बहिणाबाई कृत अभंग' नामक पुस्तकांतील आत्मचरित्र क्रमांक २४.

२ पांगारकरकृत मराठी वाङमयाचा इतिहास खंड ३ पृष्ठ ३३.

भववर्णनाच्या अगदीं जवळ आले असून तो अनुभव आयत्या वेळीं त्यांनीं डावलला आहे. ते म्हणतात "अरे गहनाचेंही गहन । तें तूं जाण सद्‌गुरुवचन । सद्‌गुरुवचनें समाधान । नेमस्त (संपूर्ण) आहे ।। सद्‌गुरुवचन तोचि वेदांत । सद्‌गुरुवचन तोचि सिद्धांत । सद्‌गुरुवचन तोचि धादांत (प्रत्यक्षानुभव) । सप्रचीत आतां ।। जें अत्यंत गहन । माझ्या स्वामीचें वचन । जेणें माझें समाधान अत्यंत झालें ।। तें हें माझें जीवीचें गुज । मी सांगेन म्हणतों तुज । जरी अवधान देसी मज । तरी आतां येच क्षणीं ।। शिष्य म्लान वदनें बोले । धरिलीं सदृढ पाउलें । मग बोलो आरंभिलें । गुरुदेवें ।। हे अगदीं काकुळतीचे शब्द असून उत्कट भावनांनीं ओथंबलेले आहेत. रामदासरूपी शिष्योत्तमानें दयानिधि श्रीरामचंद्ररूपी सद्‌गुरूचे मोठ्या जिव्हाळ्यानें पाय धरले आहेत व ते सद्‌गुरु त्या क्षणी आपल्या जीवींचें गुज सांगण्यास सुरवात करीत आहेत अशा मंगल व गंभीर प्रसंगी आपल्या हातीं कांहीं 'राजगुह्य' लागेल ही दासबोधाच्या वाचकांची अपेक्षा असणारच; पण "स्वयें तूंचि आहेस ब्रह्म" हे सर्वांस परिचित असलेले शब्द सद्‌गुरूंनीं शिष्याला सांगितले व त्यांनीं आपलें समाधान झालें असें समर्थ म्हणतात. ह्या प्रसंग दासबोधांतून वाचला म्हणजे या सद्‌गुरुभेटींतला सखोल भाग बुद्धिपुरस्सर गाळलेला आहे हें लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं.

रामदास स्वतः आपल्या शिष्यांवर स्वप्नांत अनुग्रह करीत. तो अधिकार त्यांनीं प्राप्त करून घेतलेला होता. दिनकरस्वामींवर त्यांनीं स्वप्नांत केलेल्या अनुग्रहाचें वर्णन उपलब्ध आहे[१].

एकाद्या तलावांत पुष्कळ पाणी असलें तर कधीं कधीं त्या पाण्याचे पाट काढून तें पाणी निरनिराळ्या शेतांत अथवा फळाफुलांच्या बगीच्यांत सोडलेलें असतें. पाण्याचे पाट अशा रीतीनें बांधलेले

---

१ पहा स्वानुभव दिनकर कलाप १६ किरण ४. या गोष्टीची अधिक माहिती पुढें प्रकरण ६ मध्यें दिली आहे.

असतात कीं विशेष प्रयत्नांवांचून तें तलावाचें पाणी ठरलेल्या मार्गानें पुढें जातें व विशिष्ट वृक्षवेलींच्या मुळांना मिळतें. पृथ्वीवर जो सिद्धसंघ आहे तो जगाच्या उत्क्रान्तीसाठीं असले नाना प्रकारचे उद्योग करीत असतो.

## शक्तीचे अनेक प्रवाह

सिद्धसंघाच्या हातांत अदृश्य शक्तीचा एक मोठा सांठा आहे. या साठ्यांतून ते सिद्ध त्या शक्तीचे अनेक प्रवाह जगभर सोडतात. जगाच्या प्रगतीला मदत व्हावी, चांगल्या गोष्टींना जोर यावा, वाइटाला पायबंद बसावा हा त्यांचा उद्देश असतो. हे प्रवाह अनेक प्रकारांनीं जगांत सोडले जात असतात. त्यांपैकीं एकाचा संबंध शिष्यत्वाच्या पायरीशीं आहे. सिद्धसंघांतील अधिकाऱ्याच्या अंतरंगांत तो प्रवाह प्रथम येतो. त्यानें ज्यांना ज्यांना शिष्यत्व दिलें असेल त्यांच्या देहांत—ते कोठेंही असले तरी—तो उतरतो व त्या शिष्यांच्या द्वारानें तो जगांत विशिष्ट काऱ्यासाठीं पसरविला जातो. सिद्धसंघानें सुरू केलेल्या उद्योगासाठी तो शिष्य जेथें जेथें जाईल तेथें तेथें तो त्याच्या देहांतून बाहेर पसरतो आणि तें कार्य जोरकस होण्यास साहाय्य करतो. शिष्याचा देह व त्याचें शील हीं निर्मल असलीं पाहिजेत हा जो अध्यात्मशास्त्रांतला नियम आहे त्याचें एक कारण या प्रवाहांत घाण मिसळू नये हें असतें. पाटांतील जमिनींत जर मारक द्रव्याचे क्षार असले तर त्यांतून वहाणाऱ्या पाण्यांत ते येतील आणि बागेंतील वृक्षवनस्पति खुरटतील. तद्वत् शिष्याच्या देहांत जर दारू, मांस यांसारखे घाणेरडे पदार्थ असतील, त्याच्या शीलांत जर घाणेरड्या वासना असतील तर त्याच्या अंगामधून वहाणारी ही शक्ति मलदूषित होऊन कार्याला अपाय करील. ह्या कारणास्तव शिष्यानें खोटें बोलूं नये, खोटें करूं नये, मद्य मांस खाऊं नये, परस्त्रीसंग करूं नये असे निर्बंध असतात. वारकरी पंथांत माळ घेणाऱ्यांवर असे निर्बंध घातलेले असतात हें सर्वश्रुत आहे. गुरु जेव्हां शिष्याचा अंगीकार करतो

तेव्हां ही शक्ति आपल्या देहांतून शिष्याकडे सतत वहात रहावी याची अदृश्य भूमिकेवर त्यानें तरतूद केलेली असते.

ही गोष्ट संतकवींनीं ध्वनित केलेली आहे. मुकुंदराजांचे आजेगुरु हरिनाथ होते. त्यांनीं अनुष्ठान करून शंकराला प्रसन्न करून घेतलें. शंकरांनी त्यांना सांगितलें कीं "माझें तेज प्रगटेल। तें तुझ्या वदनीं प्रवेशेल। तें शिष्यदेहीं संक्रमेल। गुरुवाक्य द्वारें ॥[१] म्हणजे माझी शक्ति तुझ्या अंगांत जाईल व तूं ज्यांचा शिष्य म्हणून स्वीकार करशील त्यांच्या अंगांत गुरुवाक्याच्या द्वारानें प्रवेश करील. महाराष्ट्रीय संतांत त्र्यंबकराय नांवाच्या एका पुरुषाची गणना आहे. त्यांनीं बालबोध नांवाचा एक ग्रंथ लिहिलेला आहे. त्यांत स्वतःला अंबा प्रसन्न झाली, तुझें बोलणें लोक ऐकतील व त्यांना तुझ्या बोलण्याचा उपयोग होईल यासाठीं तू ज्ञानप्रसाराचें कार्य कर असें सांगून ती गुप्त झाली असें वर्णन दिलें आहे. त्या वेळी 'कीं ये शरीरी संचारली। गमे मज ॥[२] म्हणजे माझ्या शरीरांत तिच्या शक्तीचा संचार झाला असा अनुभव त्यांनी सांगितलेला आहे. ज्ञानेश्वरांनीं स्वतःला एके ठिकाणी 'चाडें' म्हटलें आहे. शेतांत शेतकरी जेव्हां बीं पेरतो तेव्हां त्याच्या आउताला एक लाकडाची वाटी असते. या लांकडी वाटीला चाडें म्हणतात. या वाटीला भोंक असतें. व तींत बीं भरलेलें असतें. आऊत शेतांत फिरूं लागलें कीं चाड्याच्या भोंकामधून बीं शेतांत हळू हळू गळतें व अशा रीतीनें बीं सर्व शेत-भर पेरलें जातें. ज्ञानदेव म्हणतात, "ज्ञानदेव म्हणे मी चाडें। सद्गुरूंनीं केलें कोडें (नवल)। माथां हात ठेविला तें फुडें। बीजचि वाईलें (घातलें) ॥ म्हणौनि येणें मुखें जें जें निघे। तें संताच्या

१ महाराष्ट्र सारस्वत (भावे) आवृत्ति ४ पृ ३९.

२ पहा बालबोध ( प्रकाशक सत्कार्योत्तेजक सभा ) शेवटचें कथन ओंवी ११.

हृदयीं साचचि लागे ॥"[१] म्हणजे माझ्या डोक्यावर हात ठेवून सद्‌गुरूंनीं नवल केलें आहे. हात ठेवल्यामुळें मी चाडें झालों आहे. त्या चाड्यांत बीं भरलेलें आहे; आणि म्हणून माझ्या या मुखांतून जें जें बाहेर पडतें तें श्रोत्यांच्या हृदयाला भिडून त्यांना खरें वाटतें. डोक्यावर हात ठेवल्यामुळें गुरूंची शक्ति शिष्याच्या अंगांत प्रवेश करते आणि शिष्याकडून होणारें कार्य त्या शक्तीमुळें जास्त परिणामकारक होतें असा ज्ञानोबांचा अभिप्राय आहे.

असले अधिकारी शिष्य पुण्यक्षेत्रांत गेले तर तेथें आपल्या द्वारानें वहात येणारी शक्ति त्या क्षेत्राच्या ठिकाणीं ओततात व त्या क्षेत्राला पवित्रता देतात. यासंबंधानें एकनाथांचे उद्‌गार पुढीलप्रमाणें आहेत. 'संतांचा दास तो देवाचा भक्त । तरती पतित दर्शनें त्याच्या ॥ त्याचिया योगें घडती सर्व तीर्थें । तीर्थ तें पवित्र होतीं तीर्थें॥'[२] समर्थ दासबोधांत म्हणतात 'साधुदर्शनें पावन तीर्थ । पुरती त्यांचे मनोरथ । साधु न येतां जिणें व्यर्थ । तयां पुण्य क्षेत्रांचें[३]॥ आणखी 'तीर्थाटणें सदा इच्छिति साधूंसी। तीर्थें साधूपाशीं शुद्ध होती ।' असेंही त्यांनीं सविवेक वैराग्य शतकांत म्हटलें आहे.[४] रामदासांनीं स्वतः अनेक तीर्थांस भेट दिलेली आहे. त्या वेळेस त्यांनीं ह्या तीर्थांना पावित्र्य देण्याचा असला उद्योग केलेला असणार.

गुरुशिष्यांच्या ऋणानुबंधांपैकीं एक ऋणानुबंध असा आहे कीं त्यानें गुरु व शिष्य मनोमन एक होऊन जातात, व मग ते दोघे कितीही अंतरावर असले तरी हें ऐक्याचें सूत्र तुटत नाहीं. रामदास म्हणतात " कां सरिता गंगेस मिळाली । मिळणी होतां गंगा झाली । मग जरी वेगळी केली । तरी होणार नाहीं सर्वथा[५]॥ " गंगेला दुसरी नदी मिळाल्यावर जशा त्या दोन्ही एक होतात, आणि त्या मग वेगळ्या करतां येत नाहींत तसे गुरुशिष्य एकत्व

---

१ ज्ञानेश्वरी ६, ४९२–४९३; २ एकनाथ गाथा आवटे क्रमाक १५८९. ३ दासबोध ७- १०-११. ४ पहा पांगारकरकृत समर्थग्रंथ भांडार उत्तरार्ध पृ. ३०४ ओवी ४८; ५ दासबोध १, ४, १३.

पावतात. अनेक ठिकाणीं हा विचार समर्थांच्या ग्रंथांत आलेला आहे. जो सद्‌गुरूशीं शरण गेला । अद्वैत निरूपणें बोधला । मग जरी वेगळा केला । तरी होणार नाहीं ॥ असें ते एकवीस समासींत (जुना दासबोध) म्हणतात.[१] तसेंच 'गुरुशिष्यांची ऐक्यता । झाली स्वानुभवे ॥[२] गुज स्वामीच्या हृदयाचें । शिष्यासि वर्म तयाचें । प्राप्त झाले योग्यांचे । 'निज बीज तें' । आणि 'निःसंग स्वरूप मिळणीं । दोघे एकचि झाले' ॥ असें त्यांनीं 'आत्मारामांत' सांगितलें आहे. एकनाथांनीं भागवतांत दत्तांनीं यदूवर अनुग्रह केल्याचें वर्णन केलें आहे. त्यांत ते लिहितात 'ते देखोनि अवस्था । कृपा उपजली श्री दत्ता । हात ठेऊनि माथा । प्रसन्नता उपजली ॥ येथून तुज मज आतां । वियोगु नाहीं सर्वथा । ऐसे आश्वासोनि नृपनाथा । होय निघतां श्री दत्त[३] ॥

**मनानें एक होतात.**

आपण मैदानांत बसलों तर आपणाला स्वतः भोंवतीं रिकामें अंतराळ दिसतें. पण खरोखरी अंतराळ रिकामें नसतें. तें नाना द्रव्यांनीं भरगच्च भरलेलें असतें.आपल्या सभोंवतीं वातावरण असतें. आपण ओरडलों तर वातावरणांत लाटा उत्पन्न होतात व लांबच्या माणसास ध्वनिरूपानें प्रतीत होतात. अंतराळांत ईथर नांवाचें दुसरें एक सर्वव्यापी द्रव्य पसरलेलें आहे असें कित्येक शास्त्रज्ञ म्हणतात. या ईथरमध्यें प्रकाश, विद्युत् वगैरेंच्या लाटा उत्पन्न होतात आणि त्या लाटा आपल्या डोळ्यांत जाऊन आपणाला सभोंवतालच्या सृष्टीचें दर्शन देतात व आपल्या रेडिओच्या आंत येऊन आपणाला रेडिओचे कार्यक्रम ऐकवितात. म्हणजे आपल्या सभोंवतीं जें पोकळ अंतराळ दिसतें तें हवा व ईथर ह्या दोन पदार्थांनीं खरोखरी भरलेलें असतें हें स्पष्ट आहे. ईथरखेरीज आणखीही अनेक प्रकारचीं अति विरळ द्रव्यें या अंतराळांत भरलेलीं

---

१ पांगारकरकृत समर्थ ग्रंथभांडार उत्तरार्ध पृष्ठ ५४ ओवी ५३;
२ पांगारकरकृत समर्थ भांडार उत्तरार्ध पृष्ठ ७३ आत्माराम, समास ५ ओवी १० व २४; ३ एकनाथी भागवत ९, ४७३–४७४

असतात. पण तीं फक्त अंतर्दृष्टि असणाऱ्या लोकांना दिसतात. ध्वनि उत्पन्न केला म्हणजे जशा हवेंत लाटा उत्पन्न होतात तद्वत् माणसाच्या मनांत विचार-विकार आले कीं त्यांच्याही लाटा या अति विरळ द्रव्यांत संचरतात.

गुरु व शिष्य मनानें एक होतात असें जें आम्ही वर लिहिलें आहे त्याचा अर्थ असा कीं या दोहोंपैकी कोणाही एकाच्या मनांत विचार-विकार आले कीं त्याच्या सूक्ष्मदेहांत (मनोमय कोषांत) लाटा उत्पन्न होतात आणि त्या मधल्या अंतरामधून जाऊन दुसऱ्यास जाणवतात. अशा रीतीनें एकाचे मनोव्यापार दुसऱ्यास प्रतीत होतात. बहुतेक संतकवींनीं 'माझ्या हृदयांत गुरु बसलेला आहे, तो सांगेल तसें मी बोलतों व वागतों, मी जें बोलतों तें माझ्या पदरचें नव्हे तितकी माझी अक्कल नाहीं, मला माझा सद्गुरु किंवा ईश्वर बोलवीत आहे ' असें म्हटलें आहे. वरील ऐक्यानें ही जाणीव शिष्याला येत असते.

प्रतिभावान् गवयापासून जर शिष्याला गाणें शिकावयाचें असेल तर शिष्यानें आपला स्वर त्या गवयाच्या स्वरांत मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसा पुनः पुनः प्रयत्न करून जेव्हां त्याचा स्वर त्या गवयाच्या स्वराशी संपूर्णपणें मिळून जाईल तेव्हां आपण आपल्या गुरूच्या जोडीचे गवई झालों असें त्याला म्हणतां येईल. आपल्या नाना गुणांचे स्वर कमी जास्ती करून जेव्हां शिष्य ते गुरूच्या स्वरांशीं संपूर्णपणें मिळवून घेईल, तेव्हांच त्याला गुरूची योग्यता आली असें म्हणतां येईल. ह्या प्रयत्नांत शिष्याला साहाय्य व्हावें यासाठीं सद्गुरु आपला सूक्ष्मदेह व शिष्याचा सूक्ष्मदेह यांमध्यें तारायंत्र जोडून देत असतात. शिष्य आपल्या सूक्ष्म देहाचीं आंदोलनें अशा प्रकारचीं ठेवतो कीं गुरूच्या

आंदोलनांशीं तीं अधिकाधिक संमीलित होतील आणि बदसूर होण्याचें टळेल. अन्य शब्दांनीं हें सांगावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं सद्‌गुरूपासून येणारीं आंदोलनें शिष्याच्या सूक्ष्मदेहांत ( मनोमय कोषांत ) योग्य प्रकारच्या मनोव्यापारांस उत्तेजित करतात आणि अयोग्य मनोव्यापारांस आळा घालतात. शिष्यही आपल्या बाजूनें आपल्या मनांत वाईट विचार येऊं न देतां सद्‌गुरूच्या विचारांशी समरस होण्याची खटपट करतो. त्यासाठीं ध्यानधारणा करतो, आपल्या जीवनास शिस्त लावतो आणि अयोग्य गोष्टीपासून अलिप्त रहातो. तो असें न करील व घाणेरड्या व नीच मनोव्यापारांस आपल्या मनांत थारा देईल, तर त्याची मलिन आंदोलनें गुरूच्या अतर्यामांत जाऊन त्याला उपद्रव देतील आणि त्याच्या उद्योगांत विघ्नें निर्माण करतील. या कारणास्तव शिष्याचा अंगीकार करण्याबाबत सद्‌गुरूंना सावध रहावें लागते.[१]

ज्या शिष्याचा आपल्या सद्‌गुरूशीं हा एकत्वाचा ऋणानुबंध जडलेला असेल त्यानें सावधगिरी ठेवल्यास त्याला आपण एकटे आहों

---

१ जर शिष्याच्या मनात अनुचित वासना येऊ लागल्या तर त्याचा सद्‌गुरूच्या कार्यात व्यत्यय येतो. अशा वेळी ते मध्यें बाध घालून शिष्याला कांही काळ वेगळा काढतात व शिष्यानें जरूर ती सुधारणा स्वत:च्यामध्ये केली की, तो बांध काढून पुन: एकत्व जोडतात. जो मनुष्य वारंवार वाईट वागतो त्याला ते शिष्य करीत नाहीत. पण चांगल्या शिष्याच्या मनांतही कधी कधीं वाईट मनोवृत्ति व्यापार करूं लागतात, अशा वेळी शिष्याला काही काळ स्वत:पासून तोडण्याची युक्ति त्यांना योजावी लागते. तुकारामांनी आपल्या एका अभंगांत "बहुतां दिसांची आज झाली भेटी । झाली होती तुटी कालगती । . . . . . बहुदिसां होता साडिला मारग । क्लेशाचा तो त्याग । आजी झाला ।। असें म्हटलेलें आहे. (तुकाराम गाथा आवटे क्रमाक २४२८). त्यावरून तुकारामाच्या जीवनांत वरील गोष्ट झाली असावी असें दिसतें.

असें वाटत नाहीं. माझा सद्गुरु माझा पाठीराखा आहे, त्याचें हृदय-मन माझ्या हृदयमनाशीं संलग्न असल्यामुळें तो माझ्याजवळ आहे, मी जेथें जातों तेथें तो माझ्या बरोबर येतो अशी जाणीव त्याच्या अंतर्यामांत असते. तो सद्गुरु ईश्वराशीं एकरूप झाला असल्यामुळें सद्गुरु माझ्याजवळ आहे, असें न म्हणतां ईश्वर माझ्याजवळ आहे, ईश्वर मजबरोबर येतो असेंही तो कधीं कधीं म्हणत असतो. कीर्तनाच्या सुखें सुखी होय देव । पंढरीचा राव संगीं असे । भक्त जाय सदा हरिकीर्ति गात । त्यासवें अनंत हिंडतसे ॥[1] हा अनुभव त्या एकत्वाचा द्योतक आहे. हा भास नव्हे. तो सत्यमूलक अनुभव आहे. जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हातीं धरूनियां । चालो वाटें आम्ही तुझाची आधार ॥ चालविसी भार सवें माझा ॥ या अभंगांतही तोच अनुभव तुकारामांनीं ग्रथित केला आहे[2].

जनाबाईनें स्वत:संबंधानें म्हटलें आहे—"एकटी तू गाणें गासी । दुजा शब्द उमटे पाशी । कोण गे तुझ्या बरोबरी । गाणें गाती निरंतरीं ॥[3]. दुसऱ्या एका अभंगांतही त्याच आशयाचे उद्गार तिनें काढले आहेत—'एकलीच गातां । दुजा साद उमटतां । कोण तुझे बरोबरी । साद देतो निरंतरी ॥' जनाबाई गाऊं लागली किंवा अंतर्मुख वृत्तीनें अभंग बोलू लागली म्हणजे आपण एकटेच नसून आपल्याबरोबर दुसरा कोणी साथ करीत आहे असा तिला अनुभव येई. स्वर देवाचा उमटला । दासी जनीनें ओळखला । असें ती म्हणते. पुष्कळदां संतकवि देव, पांडुरंग, सद्गुरु हे शब्द एका अर्थानें वापरतात. शिष्यत्वाच्या पायरीवर असणाऱ्या शिष्यांचें आपल्या सद्गुरूशीं जें हृदयमनाचें ऐक्य झालेलें असतें तें प्रत्येक शिष्याला आपापल्या स्वभावानुसार वेगवेगळ्या रीतीनें

---

१ तुकाराम गाथा (आवटे) क्रमांक ७२६.

२ आवटेकृत तुकाराम गाथा क्रमांक २४४०.

३ आवटेकृत जनाबाई गाथा क्रमांक ८२, ११८ व १३९.

भासतें. तें ऐक्य अतींद्रिय असतें. तें व्यक्त करतांना देव माझा सोबती आहे असें एक शिष्य म्हणेल; तो माझ्याबरोबर गातो असें दुसरा म्हणेल. जगांतली सोबत आणि जगांतलें गाणें हीं दोन्ही त्या ऐक्यांत असून शब्दांनी न सांगतां येण्याजोगा असा आणखी किती तरी भाग त्यांत समाविष्ट असतो.

स्वतःची प्रगति साधण्याकरितां जरूर ते सर्व प्रयत्न करण्याचें काम शिष्याचें असतें. पण शिष्याला त्याच्या प्रगतिमार्गावर सर्व प्रकारचें साहाय्य देण्याचें काम सिद्धसंघांतील त्याच्या जीवन्मुक्त सद्‌गुरूचें असतें. एकदां शिष्याला हातीं धरला कीं, तो शिष्य आपल्यासारखा जीवन्मुक्त होईपर्यंत सद्‌गुरूला त्याची जबाबदारी टाकून देतां येत नाहीं. हें होण्याला बहुधा अनेक जन्मांचा अवधि जरूर असतो. यावरून सद्‌गुरूवर केवढी जबाबदारी असते याची कांहींशी कल्पना आमच्या वाचकांना येईल. त्या सद्‌गुरूनें जर एकाद्या वडील शिष्यावर नवीन शिष्य घेण्याचें प्रारंभीचें काम सोंपविलें असलें तर त्या वडील शिष्यावर कांहीं जबाबदारी पडते. पण तीं जबाबदारी कमी असते. कारण तो वडील शिष्य त्या नवशिष्याची विशिष्ट टप्प्यापर्यंत प्रगति झाल्यावर त्याला आपल्या गुरूच्या स्वाधीन करतो व त्या गुरूला पुढची जबाबदारी घेणें अवश्य होतें. ही जबाबदारी संतकवींनीं परोपरीनें वर्णिलेली आहे. सिद्धसंघांतील जीवन्मुक्त सद्‌गुरु ईश्वराशीं एकरूप झालेला असतो. अर्थात् तो दयानिधि असतो. पण त्याच्या दयेंत विवेकही असतो हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. 'साधक भावें नमस्कार घाली। त्याची चिंता साधूस लागली। सुगम पंथें नेऊन घाली। जेथील तेथें ॥' असें समर्थ एके ठिकाणी सांगतात. दुसऱ्या एका ठिकाणीं 'तो बहुतांचा पाळणकर्ता। त्यास बहुतांची असे चिंता। नाना साधनें समर्था। सद्‌गुरूपाशीं ॥[1]' असें त्यांनीं म्हटलें आहे. एका सद्‌गुरूनें पुष्कळांची जबाबदारी घेतलेली

---

१ दासबोध ४, ६, २४ व ५, २, ५४.

असते व त्याच्यापाशीं साधनेंही अनेक असतात हें ह्या शब्दांवरून दिसून येईल. समर्थासी लाज आपल्या नामाची । शरण आल्याची लागे चिंता ।[1]. या शब्दांत तुकारामांनींही ती जबाबदारी व्यक्त केलेली आहे. शिष्यस्वीकाराचें काम लहान मुलांच्या संगोपन-संवर्धनासारखें असतें असें तुकाराम व रामदास दोघेही सांगतात. शरणागतांची वाहे चिंता । तो एक सद्गुरु दाता । जैसे बाळक वाढवी माता । नाना यत्नें करोनी ।।[2] असें समर्थ म्हणतात. तुकारामांच्या वर्णनांत भावनोत्कटता अधिक आहे. तुका म्हणे वत्स धेनुवेचे चित्तीं । तैसे मज येती सांभाळीत । . . . . लेंकराचें हित वाहे माउलीचें चित्त ।। ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभाविण प्रीति । पोटीं भार वाहे । त्याचें सर्वस्वही साहे । तुका म्हणे माझें । तुम्हां संतांवरी ओझें ।।[3]

या प्रकरणांत महाराष्ट्रीय संतकवि व त्यांचे सद्गुरु यांचा गुरुशिष्यसंबंध वर्णन करून सांगितलेला आहे. सिद्धसंघांत असणाऱ्या जीवन्मुक्त पुरुषालाच शिष्याची संपूर्ण जबाबदारी घेण्याचा अधिकार आहे. अन्य कोणाला नाहीं. अशा जीवन्मुक्त पुरुषाच्या अधिकृत शिष्याला त्याच्या सांगण्यावरून व त्याच्या वतीनें कांही काळ एकादा शिष्य घेतां येईल, पण पुढें या नवशिष्याचा ऋणानुबंध त्या जीवन्मुक्ताशीं जोडणें जरूर होईल. शिष्यत्वाचा ऋणानुबंध इतका परमपवित्र असतो कीं जगांतील कोणत्याही ऋणानुबंधाशीं त्याची तुलना होऊं शकणार नाहीं. पण आजच्या समाजांत ह्या मंगलदायक संबंधाला अत्यंत विकृत व हिडीस असें स्वरूप प्राप्त झालेलें दिसत आहे. सांप्रत काळच्या बहुतेक 'गुरूंना' सिद्धसंघाच्या अस्तित्वाची कल्पनाही नाहीं तेव्हां ती शिष्यांना कशी येणार? पुष्कळ गुरु दुकानें घालून बसले आहेत व भोळसट माणसें ऐहिक फायद्याकरितां त्यांच्या दुकानांत गिऱ्हा-

---

१ तुकाराम गाथा आवटे क्रमाक ७९९; २ दासबोध ७, १०, ४०; ३ तुकाराम गाथा आवटे क्रमांक ५९७ व५६७.

ईक म्हणून खेटे घालीत आहेत. बऱ्याच दुकानांत वेडेपणा आहे. कांहीं दुकानांत फसवणूक आहे. कांहींत अनाचार आहे. खऱ्या गुरु-शिष्य-संबंधाचा तेथें मागमूसही नाहीं. पण या खोटया नाण्यांकडे बघून तुकाराम-रामदास-ज्ञानेश्वरादिक संतकवींनाही खरीं नाणीं सांपडलीं नव्हतीं असें म्हणणें गैरवाजवी होईल.

## प्रकरण ५ वें

# संतांच्या ग्रंथांतील चोरखण

कधीं कधीं आपल्या घरांतील एकादी जिन्नस झांकून ठेविलेली असते. त्यामुळें ती जिन्नस आपणांला ओळखतां येत नाहीं व सांपडत नाहीं; संतकवींच्या ग्रंथांत कांहीं साक्षात्कार काव्यालंकाराच्या आच्छादनाखालीं झांकून ठेवलेले आहेत. त्यामुळें वरवर नजर फेकणाऱ्याला ते साक्षात्कार आहेत हें न समजल्यानें तो त्यांच्याकडे लक्ष देत नाहीं. संतांचा उद्देश असा असतो कीं हे साक्षात्कार सर्वांना समजूं नयेत, ज्यांची अध्यात्म-जिज्ञासा उत्कट आहे त्यांनाच फक्त ते ओळखतां येऊन त्याचा फायदा मिळावा; म्हणून त्यांनीं कित्येक अनुभव आपल्या ग्रंथांत दिले आहेत, पण ते पडद्याआड ठेविले आहेत. एखाद्या कपाटांत जसा एक चोरखण असतो, व तो चोरखण अमुक ठिकाणीं आहे हें जसें वरवर पाहणाऱ्याला समजत नाहीं व त्यामुळें चोरखणांतील दागदागिने त्याच्या हातीं लागत नाहींत, तद्वत् हे अनुभव सामान्य माणसाच्या हातीं लागत नाहींत. कधीं त्यांचें वर्णन संतांनीं केलेलें असतें. पण ते अनुभव आहेत असें सांगितलेलें नसतें. म्हणून त्या नुसत्या कविकल्पना आहेत असें मानून प्राकृत माणूस त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असतो. पण एकच गोष्ट एका संतकवीनें अनेक ठिकाणीं वर्णिलेली असली अथवा अनेक संतांनीं तीच गोष्ट सांगितलेली असली तर तीं सर्व वर्णनें संकलित करून त्यांत साक्षात्कार ग्रथित झालेला असल्यास तो आपणांला ओळखतां येईल.असे जे अनुभव संतांनीं आपल्या ग्रंथांत

लपवून ठेविलेले आहेत त्यांपैकीं कांहींची तोंडओळख या प्रकरणांत करून द्यावयाची आहे. हे संतकवि जेव्हां जिवंत होते तेव्हां ते आपल्या सभोंवतालच्या खऱ्या जिज्ञासू मंडळींना असले साक्षात्कार उघड करून सांगत असणार यांत संशय नाहीं.

ज्ञानेश्वरांनीं आपल्या ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत सहासष्टाव्या श्लोकावर विस्तृत व्याख्यान केलें आहे : "सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज। अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥" असा तो श्लोक आहे. अर्जुना, तूं इतर साऱ्या गोष्टी टाक व मला शरण येण्याची एकच गोष्ट कर; म्हणजे मी तुला तुझ्या सर्व पापांपासून सोडवीन. तेव्हां तुला शोक करण्याची गरज नाहीं, असा त्या श्लोकाचा अभिप्राय आहे. या श्लोकावरील अर्धे व्याख्यान संपल्यावर ज्ञानेश्वर म्हणतात "मग सांवळा सकंकणु। बाहु पसरोनि दक्षिणु । आलिंगिला स्वशरणु । भक्तराज तो ॥ न पावतां जयातें। कांखेसूनि (खाकेंत मारून) बुद्धीतें। बोलणें मागौतें। वोसरलें ॥ ऐसें जें कांहीं एक। बोलाबुद्धीसही अटक । तें द्यावया मिष । खेंवाचें (आलिंगनाचें) केलें ॥ हृदयाहृदय एक झालें। ये हृदयींचें तें हृदयीं घातलें। द्वैत न मोडतां केलें। आपणा ऐसें अर्जुना ॥ दीपें दीप लावला । तैसा परिष्वंगु (आलिंगन) तो झाला । द्वैत न मोडितां केले । आपणपें पार्थु ॥ तेव्हां सुखाचा मग तया। पूरु आला जो धनंजया । तेथ वाडु (व्यापक) तरी बुडोनियां । ठेला देवो ॥" या ओव्यांचा अर्थ असा:– "मग श्रीकृष्णांनी कंकण घातलेला आपल्या सावळ्या रंगाचा उजवा हात पसरून शरण आलेल्या भक्तराज अर्जुनाला आलिंगन दिलें. अशी जी कांहीं एक गोष्ट आहे कीं, जी बोलण्यास व समजण्यास अटक आहे, ज्या गोष्टीला न पोहोंचतां बुद्धीला काखोटीस मारून बोलणें मागे येतें, ती गोष्ट अर्जुनाला देण्यासाठीं श्रीकृष्णांनीं आलिंगनाचें मिष केलें. त्या वेळीं एकाचें हृदय दुसऱ्याच्या हृदयाशीं एकरूप झालें. आपल्या हृदयांतली वस्तु श्रीकृष्णांनीं अर्जुनाच्या हृदयांत घातली

व द्वैत नष्ट न करतां श्रीकृष्णांनीं अर्जुनाला आपल्यासारखें केलें. दिव्यानें दिवा लावावा तसें हें आलिंगन झालें व द्वैत न मोडतां त्यांनीं पार्थाला आपणाप्रमाणें केलें. मग त्या वेळेस सुखाचा पूर अर्जुनावर लोटला व तो पूर व्यापक असूनही त्यांत श्रीकृष्ण बुडून गेले."

## सखोल अनुभव

आमचें म्हणणें असें की, येथें कांही खोल अनुभव लपविलेला आहे. जर असा कांही खोल अनुभव त्यांत नसेल तर हें ज्ञानेश्वरांचें व्याख्यान विचित्र व असमर्थनीय ठरेल. कांहींही कारण नसतांना श्रीकृष्णांनी अर्जुनाला या वेळी आलिंगन दिलें असें कल्पनेचें नाटक येथें ज्ञानेश्वरांनीं कां उभें करावें ?

जवळ जवळ असाच प्रसंग एकनाथांनी वर्णिलेला आहे. श्रीकृष्ण व उद्धव हे बोलत आहेत व त्या वेळी श्रीकृष्णांनी आपले हात पसरून उद्धवाला आलिंगन दिलें असें एकनाथांचें वर्णन आहे. हृदयीं हृदय एक जाहलें। ये हृदयीचें तें हृदयी घातलें। हे ज्ञानेश्वरांचेच शब्द एकनाथांनी आपल्या वर्णनांत योजले आहेत. पण ज्ञानेश्वरांपेक्षां त्यांनी आपला आडपडदा जरा जास्त दूर केला आहे. ते म्हणतात यांत 'ध्वनितार्थ' आहे, आणि "त्याचि ध्वनिताचे पोटीं। होती भक्तिरहस्याची पेटी। ते म्यां उघडूनि दाविली दिठी। वृथा चावटी (बडबड) झणें म्हणाल[२]॥" म्हणजे या ध्वनिताच्या पोटीं एक भक्तिविषयक रहस्याची (गुप्त गोष्टीची) पेटी असून ती मी येथें उघडून तुम्हांस दाखविली आहे. तुम्ही वाचक मात्र याला वृथा बडबड असें म्हणण्याचा संभव आहे असा एकनाथांनीं शेवटीं शेरा मारलेला आहे! तेव्हां येथें कांहीं खोल रहस्य आहे हें उघड आहे.

---

१ ज्ञानेश्वरी १८, १४१८ ते १४२३.

२ एकनाथी भागवत १९, ३०३ ते ३१९.

रामदासांनीं एक प्रसंग कल्पिलेला आहे. त्यांत रामदास व श्रीराम या दोघांची भेट होऊन कांहीं बोलणीं सुरू आहेत. तेथेंही श्रीरामचंद्रांनीं रामदासांना आलिंगन दिलें असें वर्णन आहे. रामदास सांगतात "ऐसें बोलणें ऐकलें । रामें मंद हास्य केलें। धांवोनिया हृदयीं धरलें। आपुलिया निजदासा...॥ रामें आपणां-सारखें केलें। दास दासपणेंसी मुकले। रामासि मिळोन एकचि झाले। एकपणाही वेगळे। स्वामी सेवकपणें आनंदलें। हर्षें करून उचंबळलें। परस्परें गिळोनि ठेले। लोभ आला म्हणोनी[१] ॥ म्हणजे राम व रामदास हे एकत्व पावले, त्यांत एकपणा होता व वेगळे-पणाही होता. स्वामीसेवक भाव होता, पण रामदास रामदास-पणाला मुकले होते व दोघांचा एकमेकांवर लोभ असल्यामुळें त्या दोघांनीं एकमेकांना त्या आलिंगनाच्या प्रसंगीं गिळून टाकलें होतें !

ज्ञानेश्वरांच्या गाथेंतही हा हृदयाशीं धरण्याचा प्रसंग वर्णिलेला आहे. "संत भेटती आजी मज। तेणें झालों चतुर्भुज। दोन्ही भुजा स्थूळीं सहज। दोन्ही सूक्ष्मीं वाढल्या॥ आलिंगनीं सुख वाटे। प्रेम चिदानंदीं गोठे[२] ॥" म्हणजे आज संत व मी यांची भेट झाली. त्यानें मी चतुर्भुज झालों. त्या वेळीं दोन बाहू स्थूल होते व दोन सूक्ष्म होते. त्या आलिंगनांत मला सुख वाटलें. म्हणजे ह्या भेटींत ज्ञानेश्वर व संत हे दोघे दृश्य देहांत नव्हते. दोघांनीं एकमेकांना पोटाशीं धरलें होतें, प्रत्येकाचे दोन दोन हात मिळून चार हात झाले होते, पण दोन हात स्थूल भूमिकेवरचे दृश्य देहाचे होते व दुसरे दोन हात सूक्ष्म भूमिकेवरचे सूक्ष्मदेहाचे होते. अर्थात् सद्गुरूंनीं ज्ञानेश्वरांच्या सूक्ष्म देहाला आपल्या

१ जुना दासबोध १६; समर्थग्रंथ भांडार (पांगारकरकृत) उत्तरार्ध पृ. ३६. या पुस्तकाच्या पृ. ४८४ वर "आलिंगनी माझें निवालें सर्वांग।" असें रामदासांनी म्हटलें आहे.

२ ज्ञानेश्वर गाथा (आवटे) क्रमांक १९९.

निवासस्थानीं बोलावून आणलें होतें. सद्गुरूंचा देह दृश्य होता, स्थूल देह होता आणि ज्ञानेश्वरांचा देह अदृश्य होता, सूक्ष्म होता.

तुकारामांनींही हा अनुभव नमूद केलेला आहे. आलिंगन घडे। मोक्ष सायुज्यता जोडे। ऐसा संतांचा महिमा। जाली बोलायाची सीमा[१]॥ 'जाली बोलायाची सीमा' या शब्दांवरून न सांगण्याजोगा कांहीं भाग येथें आहे हें तुकारामांनीं ध्वनित केलें आहे. "आलिगनें संतांचिया। दिव्य झाली माझी काया[२]॥" असें तुकारामांनीं दुसरीकडे वर्णन केलें आहे. शिष्य आपल्या दृश्यदेहास बिछान्यावर निद्रित ठेवून जेव्हां आपल्या सद्गुरूकडे सूक्ष्म देहानें जातो तेव्हां ते दोघे एकमेकांस पोटाशी धरतात. सद्गुरूचा सूक्ष्म देह जास्त उच्च द्रव्याचा, जास्त सामर्थ्यवान्, जास्त चित्तशुद्धि झालेला, जास्त विकास पावलेला असतो. त्याच्या सूक्ष्मदेहांतलें द्रव्य व शिष्याच्या सूक्ष्म देहांतलें द्रव्य ही एकमेकांत मिसळलीं म्हणजे शिष्याच्या सूक्ष्मदेहावर त्याचा परिणाम होतो, त्यांतील द्रव्य सुधारतें व त्यांत गुरूचे गुण उतरतात. 'दिव्य झाली माझी काया' या तुकारामांच्या शब्दांचा अर्थ आतां आमच्या वाचकांच्या ध्यानांत येईल.[३]

हा देहांतला फरक झाला. मनांत काय फरक होतो? ज्ञानेश्वर सांगतात "पातेजोनि (विश्वासानें) खेंवासि (आलिंगनासाठीं) आणिलें। येणें आपणिया समान मज केलें गे माये। पाहे पां नवल कैसें वितलें (घडलें)। मन उन्मनीं, उन्मन ग्रासिलें॥" या आलिंगनाच्या प्रसंगीं मन एका उच्च अवस्थेंत जातें व ती अवस्था माणसाला ग्रासून टाकते हें या वर्णनावरून दिसतें.

---

१ तुकाराम गाथा (आवटे) क्रमाक ३९४.

२ पहा तुकाराम गाथा (आवटे) क्रमाक ५७६; ३ एकनाथ म्हणतात: द्यावें संता आलिगन। तेणे तुटे भवबंधन॥...म्हणे जनार्दन। एका लाधलीसे खूण॥ म्हणजे एकनाथाना यात कांही खुणेचा लाभ झाला होता (पहा एकनाथ गाथा आवटे क्रमांक १५६६).

असल्या प्रसंगीं आनंदाचा पूर येतो, दोन्ही देह एकमेकांस गिळून टाकतात, वगैरे वर्णनें वर आलेलीं आहेत. जनाबाईनें या पुराचा उल्लेख करून वरील अनुभव कोणत्या वेळीं शिष्याला मिळतो त्याचा खुलासा केला आहे. ती म्हणते "झाली पूर्ण कृपा *आहे। ऐसा पूर जो कां पाहें। ऐसा पूर जो कां पाहें। गुरुपुत्र तो चि होय। पूर्णपदीं जो स्थापिला। जनी म्हणे धन्य झाला॥*[1] विहंगममार्गावर शिष्यत्वाचे अनेक टप्पे आहेत. त्यांपैकीं एका टप्प्याला 'गुरुपुत्र' असें पारिभाषिक नांव आहे.

या टप्प्याशी शिष्य आला असतांना एक विधि करण्यांत येतो. तो विधि प्रत्यक्ष पाहून त्याचें केलेलें वर्णन एका थिऑसफीय ग्रंथांत दिलेलें आहे. त्याचा सारांश असा[2]:– सद्गुरु शिष्याला आपल्या निवासस्थानीं आणण्याची व्यवस्था करतात. शिष्य आपल्या सूक्ष्मदेहानें तेथें जातो. तेथें सद्गुरू त्याला कांहीं गोष्टी सांगतात. त्याच्या अंगी कोणते दोष आहेत, त्यानें कोण-कोणत्या बाबतींत स्वतःमध्यें सुधारणा केली पाहिजे तें त्याला सुचवितात. मग 'गुरुपुत्राच्या पायरीवरची जबाबदारी घेण्याची तुझी तयारी आहे का?' असा प्रश्न त्याला करतात. त्यानें 'होय' म्हटल्यास त्याच्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवितात. प्रत्येक माणसाचा सूक्ष्मदेह त्याच्या दृश्यदेहाभोवतीं एका मोठ्या गोळ्यासारखा पसरलेला असतो. त्यांत नाना रंगाची विरल द्रव्यें खेळत असतात. गुरूचा सूक्ष्म देह फार मोठा असतो. शिष्याचा त्या मानानें अगदी लहान असतो. पुढें सद्-गुरु शिष्याला हृदयाशीं धरतात, त्या वेळीं शिष्याचा सूक्ष्मदेह सद्गुरूंच्या सूक्ष्म देहांत बुडून किंचित्काळ अदृश्य होतो. सद्-गुरूंच्या सूक्ष्मदेहाचा परिणाम शिष्याच्या देहावर त्या वेळी होत

---

१ जनाबाई गाथा (आवटे) क्रमाक १९५

२ पहा The Masters & the Path प्रकरण ५ व सिद्ध पुरुष व त्यांचा संप्रदाय प्रकरण ७.

असतो. मग तो शिष्य त्या गोलांत पुनः दिसू लागतो व नंतर त्याला वेगळें करण्यांत येतें. पण जरी ते वेगळे झाले तरी त्यांच्यामध्यें एक प्रकारची एकतानता आलेली असते. गुरुशिष्य त्यानंतर कोठेंही गेले अथवा त्यांच्यामध्यें कितीही अंतर असलें तरी गुरूच्या सूक्ष्मदेहांतून निघणारे स्पंद शिष्याच्या सूक्ष्मदेहावर अष्टौप्रहर परिणाम करीत असतात आणि त्यानें शिष्याच्या गुणांचा त्वरेनें विकास होत असतो. दोघांचीं मनें एक झालेलीं असतात, त्यामुळें सद्गुरूचे नाना गुण शिष्य हळू हळू प्रकट करूं लागतो व अधिकाधिक प्रमाणांत तो त्यांच्यासारखा कायमचा बनत जातो.

हा विधि संतकवींना माहीत होता. आपल्या सभोंवतालच्या होतकरू शिष्यांना स्फूर्ति देण्यासाठी ते खासगी बैठकींत त्यांना त्या विधीची माहिती देत असतील हें निश्चित आहे. हा विधि त्यांनी आपल्या ग्रंथांत वर लिहिल्याप्रमाणें अधून मधून वर्णिलेला आहे. ज्यांना त्याचा अगोदर सुगावा लागलेला असेल त्यांनाच ती वर्णनें समजावी व त्यानें त्यांचा उत्साह वाढावा असा संतांचा हेतु असला पाहिजे हें उघड आहे.

### देहाबाहेर जाणें

**आतां दुसरें एक उदाहरण घेऊं. संतकवि कधीं कधी (उपनिषदांचें अनुकरण करून[१]) माणसाला पक्ष्याची उपमा देत असतात. उदाहरणार्थ ज्ञानेश्वरांनीं "जेणें विवळतिये सवळे**

---

१ दोरीनें बाधलेला पक्षी जरी निरनिराळ्या जागी उडून गेला तरी तो जसा बाधलेल्या ठिकाणी परत येतो तद्वत् माणसाचें मन निरनिराळ्या जागी गेलें तरी माणसाच्या प्राणापाशी परत येतें अशी उपमा छांदोग्यात दिलेली आहे ( छांदोग्य ६,८,२ ) घरट्यातून पक्षी जसा बाहेर जातो तसा जीव देहातून बाहेर पडतो अशी उपमा बृहदारण्यकांत दिली आहे (बृहदारण्यक ४,३,१२) मनुष्य व ईश्वर हे दोन पक्ष्याप्रमाणे असून एका झाडाला धरून रहातात असे मुडकात म्हटले आहे. (मुडक ३, १)

(उजाडत्या पहाटेस) । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे। सांडिती देहाहंतेचीं अविसाळें (घरटीं) । जीवपक्षी[१] ॥ म्हणजे उजाडत्या प्रभातकाळी आत्मज्ञानाचे डोळे मिळाल्यामुळें जीवरूपी पक्षी " देहाच्या अहंपणाचीं घरटीं सोडून त्यांतून बाहेर पडतात, असें म्हटलें आहे. ज्ञानेश्वरांनीं ही नुसती उपमा दिलेली आहे. पण माणसाचा जीवात्मा त्याच्या दृश्यदेहांतून बाहेर निघून सूक्ष्मदेहानें हिंडू शकतो हा अनुभव या उपमेंत ध्वनित आहे. ही क्रिया सुसंस्कृत माणूस झोंपेच्या वेळीं करू शकतो. योगीही ती करतो. पण योगी ती बुद्धिपुरस्सर करतो व योगाभ्यासांत त्याची पुरेशी प्रगति झाली असली तर देहांतून बाहेर निघणें, सूक्ष्मदेहानें सर्वत्र फिरून नाना उद्योग करणें व अनुभव घेणें, आणि शेवटीं देहांत परत येणें या सर्व गोष्टींची संगतवार आठवण त्याला असते. सुसंस्कृत माणसाला ती आठवण नसते, व सूक्ष्मदेहानें हिंडून संकल्पित उद्योग करण्याचें सामर्थ्यही त्याला बेताचेंच असतें. योगी आणि सुसंस्कृत माणूस यांमध्यें हा फरक आहे. संतांपैकीं कांहींना ही गोष्ट करतां येत होती असें दिसतें. तिची माहिती कांहीं निवडक लोकांना मिळावी यासाठीं ही उपमा ज्ञानेश्वरांनी दिलेली आहे. ज्ञानेश्वरींत दुसऱ्या एका ठिकाणीं " तेव्हां तया महासुखाचेनि भरें । धांवोनि देहाचिये गांवा बाहेरे। मियां धाले तेणें उद्गारें। लागती गर्जों ॥ [२] म्हणजे त्या वेळीं भक्तिमान मंडळी मोठ्या आनंदाच्या भरांत देहरूपी गांवाच्या बाहेर धांवू लागून ईश्वराच्या प्राप्तीमुळें आम्हांला संतोष झाला आहे अशी गर्जना करतात. या वर्णनांत देहरूपी गांवाच्या बाहेर माणूस जाऊं शकतो असा ध्वनि आहे. आणखी एक उल्लेख विचारांत घेऊं या. लग्न होऊन सासरीं गेलेल्या एका मुलीसंबंधाचें रूपक ज्ञानेश्वरांनीं केलें आहे. तिला माहेरीं ( ईश्वराकडे ) जाण्याची इच्छा होती व संसाररूपी

---

१ ज्ञानेश्वरी १६, ३.

२ ज्ञानेश्वरी १०,१२५.

सासरचे लोक तिला जाच करीत होते. त्या रूपकांत ज्ञानेश्वर म्हणतात, "सासुऱ्याचे[1] घरीं करीत होतें काम। अवचित विंदान (चमत्कार) मांडियेलें। घरा सोळा संधि बहात्तर कोठे। नवही दारवंठें झाडीत होतें। चोळी साउलें (लुगडें) हिरोनि घेतलें। उघडें पाठविलें माहेराशीं। समर्थाची लेकी परी मी संतांची पोसणी। विमानीं बैसोनि जातें देखा। बापचक्रधरा रुक्मादेविवरा। उबगला संसारा येऊं नेदी॥" याचा अर्थ असा : मी सासऱ्याच्या घरीं (म्हणजे देहांत) मोलकरणीचें काम करीत असें. त्या वेळी एक चमत्कार घडून आला. मी देहरूपी घरांतील नऊ दरवाजे, सोळा सांदी व बहात्तर कोठे झाडीत असें. अशी माझी कालक्रमणा चालू असतांना सासऱ्यानें माझी चोळी व लुगडें हिसकून घेतलें व मला उघडें करून माहेरीं (ईश्वराकडे) पाठवून दिलें. पण मी समर्थाची मुलगी संतांच्या छत्राखाली आहें; व म्हणूनच विमानांत बसून जात आहें तें पहा. ज्या संसाराचा मला त्रास वाटतो त्या संसारांत चक्रधर विठ्ठल (माझा बाप) मला पडू देत नाही.[1] एकाद्या माणसाच्या अंगावरचा कपडा काढून घेतला तर तो मनुष्य उघडा होतो. तद्वत् नऊ द्वारें सोळा सांदी व बहात्तर कोठे असलेला देहरूपी माझा अंगरखा काढून टाकण्यांत आला आहे व संतांच्या कृपेनें मी विमानांत बसून दूर जात आहें हें सांगण्याचा अभिप्राय आहे. देहाबाहेर जाण्याची क्रिया या वर्णनांत थोडी अधिक स्पष्ट आहे.

ही कविकल्पना नसून त्यांत सत्य आहे हें इतर देशच्या संतांच्या पुराव्यावरूनही दिसून येईल. आपण स्वतः अनेकदां देहाबाहेर गेलेलों आहों असा प्लोटायनस नांवाच्या एका पाश्चात्य संतानें आपला अनुभव नमूद केलेला आहे. Many times it has happened; lifted out of the body into myself becoming external to all other things and self-centered; beholding a marvellous beauty. ( देहांतून बाहेर निघून आत्मस्वरूपांत

---

१ ज्ञानेश्वरी गाथा (आवटे) क्रमांक ६६१.

शिरावें, स्वत्वाच्या ठिकाणीं अधिष्ठान ठेवून इतर सर्व वस्तूपासून वेगळें दिसावें व पराकोटीचें सौंदर्य माझ्या नजरेस पडावें ही गोष्ट माझ्या जीवनांत अनेकवार झालेली आहे.)[१]

चमत्कार संशोधनाच्या क्षेत्रांतही अलीकडे असले अनुभव दाखल झालेले आहेत. तू अमुक ठिकाणीं निजून रहा, निजण्याच्या वेळीं मनांत निश्चय कर की मी मनानें अमुक अमुक ठिकाणीं प्रवास करीन व तेथील अमुक अमुक मंडळीस माझ्या आगमनाचा अनुभव आणून देईन, असें एका माणसास सांगावयाचें; व त्या दुसऱ्या मंडळीस ह्या प्रयोगाचा सुगावा लागू न देतां त्यांना त्याचा कांहीं पडताळा आला कीं काय ह्याची चवकशी करावयाची; अशा प्रकारचे उद्योग कांहीं संशोधकांनीं केलेले आहेत; व ते यशस्वी झालेले आहेत. झोपेंत माणसाचे दोन विभाग पडतात, पैकीं एक भाग बिछान्यावर निद्रिस्त असतो व दुसरा भाग अंतरावर जातो असा या प्रयोगांचा अर्थ आहे.[२]

---

१ पहा बरट्राड रसेलकृत History of Western Philosophy पृष्ठ ३१४.

२ या प्रयोगांचें विस्तृत वर्णन करण्यास ह्या छोट्या पुस्तकात स्थळ नाही. जिज्ञासूंनीं मायर्सकृत Human Personality खंड १ परिच्छेद ६६८ व त्यावरील परिशिष्टें पहावी. सायकिकल रीसर्च सोसायटीचे गर्ने नावाचे एक पुढारी होते. त्याचा व एस. एच. बी. या गृहस्थाचा परिचय होता. एस. एच. बी. यांनी एके ठिकाणी झोपावें, झोपण्याच्या वेळी मी मनाने विशिष्ट ठिकाणी जाईन व तेथें अमुक अमुक मंडळीस दृश्यमान होईन असा निश्चय करावा व ही योजना फक्त गर्ने यास अगोदर कार्डाने कळवावी, मग गर्ने यांनीं त्या माणसांची सहजासहजी भेट घ्यावी व ती मंडळी आपण होऊन त्या रात्री एस. एच. बी. याची प्रतिमा पाहिल्याचा अनुभव सागतात की काय याची चवकशी करावी, अशा रीतीचे प्रयोग करण्यात आले व ते यशस्वी झाले. फ्लामारियोकृत Death and its Mystery at the Moment of Death या पुस्तकांत पृ. ६७ वर प्रो. ब्लॅक याना आपली प्रतिमा वरील प्रकारानें अर्ध्या मैल अंतरावर प्रकट करता आल्याचा प्रयोग दिलेला आहे.

आणखी एक अनुभव दाखल करून चोरखणांत ठेवलेल्या साक्षात्कारांचें हें प्रकरण पुरें करूं. महाराष्ट्रीय संतांचें काव्य ठिक-ठिकाणीं रूपकांनीं भरलेलें आहे. हुतुतू, फुगडी, टिपरी, चेंडूफळी वगैरे खेळ, तसेंच गौळण, तापसी, भिक्षेकरी, गारुडी वगैरे मंडळी यांच्यावर त्यांनीं रूपकें रचलेलीं आहेत. या रूपकांत नीतिविषयक व वेदान्तविचारविषयक गोष्टी ध्वनित केलेल्या असतात, हें सर्वांस माहीत आहे. पण त्यांत कित्येकदां साक्षात्कारही ध्वनित केलेले असतात हें तितकेसें लोकांनीं जाणलेलें नाहीं. त्याचें एक उदाहरण दाखल करूं या. रस्त्यांतून आंधळे पांगळे भिकारी भीक मागत हिंडत असतात. मी आंधळा पांगळा आहें, मला भिक्षा घाला अथवा पैसा द्या असें ते म्हणत असतात. या भीक मागणाऱ्या आंधळ्या-पांगळ्यांवर संतांनीं रूपकें रचलेलीं आहेत. तुकारामांचा आंधळा-पांगळा म्हणतो "पांगुळ झालों देवा । नाही हात ना पाय ।। (क्रमांक ३६७८) पाय डोळे म्हणतां माझे । तिहीं कैसा मोकलिलों (सोडिलेला आहे) ।। परदेशी, नाहीं कोणी, । अंध पांगुळ झालों ।। हिंडतां भागलों गा । लक्ष चौर्‍यांशी गांव ।।" (क्रमांक ३६७९) म्हणजे मला हात पाय नाहींत, मी आंधळा आहें, चौऱ्याशी लक्ष योनी फिरून दमलों भागलों आहे. "देखत होतो आधीं । मागें पुढें सकळ ।। मग हे दृष्टि गेली । वरी आलें पडळ ।। अंजन लेववूनि । करी मार्ग सोपा ।। जाईन सिद्धपंथें । अवघ्या चुकतील खेपा ।। " ( क्रमांक ३६८०) म्हणजे पूर्वीं मी आंधळा नव्हतों, व मला दिसत होतें, पुढें डोळ्यावर अंधारी आली. देवा आतां मला अंजन दे व डोळस कर, माझा मार्ग सोपा कर म्हणजे पुनः पुनः जन्ममरणाच्या माझ्या खेपा वांचतील व सिद्ध लोक ज्या मुमुक्षु मार्गानें पुढें गेले त्या मार्गानें मी जाईन. ज्ञानेश्वरांचा आंधळा पांगळा म्हणतो. "ज्ञान दृष्टि हारपली । दोन्ही नेत्र आंधळे ।।" (क्रमांक७४५) हे शब्द वाचले म्हणजे मी आंधळा पांगळा आहे याचा अर्थ, मी अज्ञ व असमर्थ आहें, मी अज्ञानांधकारांत चांचपडत अनेक जन्मींच्या येरझारा

पूर्वी केल्या आहेत, मला आतां ज्ञान हवें आहे तें मिळाल्यास मी योग्य त्या मार्गानें माझी प्रगति करीन असा असल्याचें स्पष्ट होतें.

### आंधळा–पांगळा

या आंधळ्या-पांगळ्याचें पुढें काय झालें ? "त्रिकुट शिखरीं गा। दान मिळे आइतें ।।...न मागें भीक आतां । हाचि झाला भरंवसा ।। वोळली ( भरून आली ) सत्रावी गा । तिनें पुरविली इच्छा ।। ऊर्ध्व मुखें आळविला । सोहंशब्दाचा नादू ।।" (क्रमांक ३६८१) असें तुकाराम सांगतात. म्हणजे त्रिकुट शिखरांत एक दान मिळतें तें मला मिळालें. तेव्हां मी भीक मागण्याचें सोडून दिलें, माझी सत्रावी भरून आली, माझी इच्छा पूर्ण झाली, व मी सोहम् शब्दाचा नाद केला. या योगशास्त्रांतल्या गोष्टी आहेत. अर्थात या आंधळ्या पांगळ्याला योगशास्त्रांतल्या कांही गोष्टी शिकविण्यांत आल्या. त्यानें तो धडधाकट झाला व मोक्षमार्गाला लागला असें म्हणणें आहे.

एकनाथांचा आंधळा-पांगळा म्हणतो । 'येऊनि गुरुनाथें । माथां ठेविला करू ।। अज्ञान तिमिर गेलें । शुद्धमार्ग साचारू ।। गर्जत चालियेलों । फिटला अज्ञान अंधारू'।। (क्रमांक ३७१३). गुरूची गांठ झाली, त्यानें डोक्यावर हस्त ठेविला, माझें अंधपण गेलें व योग्य मार्गानें गर्जना करीत मी पुढें चाललों आहें.

ज्ञानेश्वरांचा आंधळा-पांगळा म्हणतो "कृष्णांजन एकवेळां । डोळां घालितां अढळ ।। तिमिरदुःख गेलें । फिटलें भ्रांति पडळ ।। श्रीगुरु निवृत्तिरायें । मार्ग दाखविला सोज्ज्वळ ।।" (क्रमांक ७४५) तसेंच " तिही लोकीं विश्वरूप ।।...दिव्य दृष्टि दिधली ।। देह हें हरपलें । विदेह वृत्ति स्फुरली ।।...वेद मार्गे मुनि गेले । त्याचि मार्गें चालिलों ।। न कळेचि विषय अंधा । म्हणोनि उघड बोलिलों ।। " (क्रमांक ७४६) म्हणजे माझे गुरु निवृत्तिनाथ यांनीं माझें अज्ञान घालविलें, मला मार्ग दाखविला, विश्वरूप दिव्यदृष्टि दिली,

देह गेला, विदेह वृत्ति माझ्यांत स्फुरेशी केली, पूर्वीचे मुनि ज्या मार्गानें गेले त्या मार्गानें मी पुढें चालू लागलों; आंधळ्या जगाला ही गोष्ट समजत नाहीं म्हणून येथें ती मी उघडपणें सांगत आहें. ज्ञानेश्वर पुनः म्हणतातः "पांगुळा जीवन मार्ग। सत्रावी हे वोळली।।" (क्रमांक ७४७)[१] म्हणजे पांगळयाच्या ह्या जीवनमार्गावर सत्रावीचा वर्षाव झाला. सत्रावी म्हणजे योगशास्त्रांतील उच्च भूमिकांवरचें ज्ञान मेंदूत ज्या द्वारानें (चक्रानें) उतरतें तें स्थान.

या सर्व वर्णनावरून दिसून येतें की, ह्या संतकवींना अगोदर हा मुमुक्षु-मार्ग सांपडलेला नव्हता. पुढें सद्गुरूची गांठ झाल्यावर त्यांचें आंधळेंपांगळेंपण जाऊन ते अव्यंग झाले. त्या सद्गुरूंनीं कांही योगक्रिया शिकवून व त्यांचे अनुभव आणून देऊन त्यांना शहाणे केलें व ते मुमुक्षु-मार्गाला लागले. आंधळ्या जगाला हें समजत नाही असें कारण सांगून सतांनीं स्वतःमधल्या या स्थित्यंतराचा हा उघड उल्लेख केलेला आहे. पण कोणत्या योगक्रिया त्यांना शिकविण्यांत आल्या, कोणते अनुभव त्यांना मिळाले याचा तपशील मात्र त्यांनीं दिलेला नाहीं. नाथपंथांत चौरंगीनाथ नांवाचे एक पुरुष होऊन गेलेले आहेत. त्याच्या विषयीं ज्ञानेश्वर म्हणतात "तो मत्स्येंद्र सप्तश्रृंगी । भग्नावयव (हातपाय तुटलेला) चौरंगी ( चौरंगीनाथ ) ।। भेटला की जो सर्वांगी । संपूर्ण झाला "।। (ज्ञानेश्वरी १८, १७५३) म्हणजे सप्तश्रृंग नांवाच्या जागी हातपाय तुटलेल्या चौरंगीनाथाला मत्स्येंद्रनाथ गुरु भेटले व त्या गुरुभेटीनें ते धडधाकट झाले. याचा अर्थ ते ज्ञानी होऊन मुमुक्षु मार्गाला लागले असा आहे.

संतकवींचे ग्रंथ बारकाईनें वाचले पाहिजेत. तसे ते आज फारसे कोणी वाचीत नाहीं. त्या दृष्टीनें ते वाचले तर आणखी किती तरी साक्षात्कार उजेडांत येण्याचा संभव आहे.

---

१ वर आलेले सर्व क्रमांक त्या त्या संतांच्या गाथेतील (आवटे) आहेत.

## प्रकरण ६ वें

# संतांचे गुरु व शिष्य

आध्यात्मिक प्रगति शीघ्र गतीनें करण्याचा एक मार्ग आहे, त्याला विहंगममार्ग असें म्हणतात. महाराष्ट्रांतील संत आपल्या गुरूंच्या देखरेखीखालीं त्या मार्गावरून पुढें जात होते व त्यांनीं अंगीकारिलेले शिष्य जरी त्या संतांच्या मानानें अधिकारानें कमी असले तरी ते शिष्यही त्याच विहंगममार्गानें वाटचाल करण्याच्या प्रयत्नांत होते हें आपण येथवर पाहिलें. इतर सामान्य माणसांप्रमाणें विहंगममार्गावरचीं माणसें हीं जगांत टक्केटोणपे खाऊन व सुखदु:खें भोगून शहाणीं होत असतात. सत्संगति, ध्यानाचा अभ्यास, धर्मग्रंथांचें वाचन व मनन यांपासूनही त्यांच्या शहाणपणांत भर पडून त्यांची प्रगति होत असते. पण सामान्य माणसाला न मिळणारें आणखी एक साधन त्यांना उपलब्ध असतें व त्या साधनामुळें त्यांची विहंगममार्गावरील प्रगति जलद होऊं शकते. त्यांना अदृश्य भूमिकेवर शिक्षण देण्यांत येत असतें. माणूस झोंपीं गेला कीं त्याचा सूक्ष्म देह दृश्यदेहांतून बाहेर पडून सर्वभर हिंडण्यास सुटा होतो. आजच्या सुशिक्षित व सुसंस्कृत माणसालाही आपल्या सूक्ष्मदेहाचा उपयोग करून त्याच्या साहाय्यानें ज्ञान मिळविण्याची पात्रता अद्याप फारशी आलेली नाहीं. झोंपेच्या वेळीं त्याच्या देहापासून सुटा झालेला त्याचा सूक्ष्मदेह[1] सुस्त

---

१ मनुष्याचा जडदेह बिछान्यावर निद्रिस्त झाल्यावर त्याचा जीव कोणत्या देहानें कोणत्या भूमिकेवर जाऊन तेथें व्यवहार करूं शकेल व

(टीप पुढील पानावर चालू)

व क्रियाशून्य स्थितींत आपला काळ घालवितो. पण विहंगममार्गाला लागलेल्या माणसाचा सूक्ष्मदेह जागृत, चलाख व कर्तृत्ववान् झालेला असतो, तो पाहिजे तेथें हिंडतो फिरतो, निरनिराळे सद्-द्योग करतो आणि ज्ञानी पुरुषांस भेटून व त्या सूक्ष्मदेहाच्या इंद्रियांचा (शक्तींचा) संपूर्ण उपयोग करून ज्ञान मिळवूं शकतो. जागे होतेवेळीं तो सूक्ष्मदेह पुनः दृश्य देहांत प्रविष्ट होतो. सूक्ष्मदेहानें केलेले व्यवहार व मिळविलेलें ज्ञान त्याला जागेपणीं

---

(टीप मागील पानावरून चालू)

तेथील ज्ञान हस्तगत करूं शकेल ते त्याच्या योग्यतेवर अवलबून असतें. थोडी प्रगति झालेला मनुष्य 'वासना' देहाने भूवर् 'लोकांत' जाऊन 'स्वप्न'-स्थितीचा अनुभव घेतो. जास्त प्रगति झालेला माणूस जास्त उच्च देहानें जास्त वरच्या लोकांत जाऊन आपल्या मगदुराप्रमाणें जास्त उच्च स्थितीचा अनुभव घेण्यास समर्थ असतो. ही गोष्ट उपनिषदादि ग्रंथात नमूद आहे. उदाहरणार्थ बृहदारण्यकात (४, ३, १२) "प्राणेन रक्षन् अवरं कुलायम् बहिष्कुलायादमृतः चरित्वा। स ईयते अमृतो यत्र कामं हिरण्मयः पुरुषः एकहंसः। असें म्हटलें आहे. म्हणजे माणसाचा अमर असलेला हिरण्मय जीव आपल्या देहरूपी कनिष्ठ श्रेणीच्या घरट्याचें रक्षण प्राणानें करीत राहून त्या घरट्यांतून बाहेर पडतो व आपल्या इच्छनुसार हिडतो. छादोग्यात दिलें आहे की, (६, ८, १) उद्दालको हारुणिः श्वेतकेतु पुत्रमुवाच स्वप्नान्त मे सोम्य विजानीहीति यत्रैतत्पुरुष. स्वपिति नाम सता सोम्य तदा संपन्नो भवति स्वमपीतो भवति तस्मादेनं स्वपितीत्याचक्षते स्व हि अपीतो भवति। (अर्थ : उद्दालक आरुणि आपल्या श्वेतकेतु नामक पुत्राला म्हणालाः बाळा झोपेचा अंत काय असतो तें समजून घे. जेव्हा मनुष्य झोपल्यासारखा दिसतो तेव्हां तो सत्यानें संपन्न होतो, तो स्वच्या (आत्म्याच्या) जवळ जातो म्हणून त्याला 'स्वपिति' म्हणजे तो स्वच्या जवळ गेला असें म्हणतात. शंकराचार्यांनी आपल्या ब्रह्मसूत्र भाष्यांत 'सुषुप्तिकाले च परेण ब्रह्मणा जीव एकतां गच्छति। म्हणजे गाढ झोपेच्यावेळी जीव उच्च ब्रह्माशीं ऐक्य पावतो असें म्हटलें आहे (पहा अध्याय १ पाद ४ सूत्र १८ वरील भाष्य)

बहुधा आठवत नाहीं. जर त्यानें आपल्या प्राणमय कोषांतली चक्रें विशेष प्रकारच्या ध्यानानें फुलविलीं असलीं अथवा त्या चक्रांतून कुंडलिनीचा प्रवाह खेळविला असला तरच त्याला जागृतींत ही सारी आठवण नीटपणें आणतां येते. पण ती गोष्ट केली नसल्यास त्याला त्यांची प्राय: बिलकुल आठवण रहात नाहीं, किंवा एकादे वेळीं अर्धीमुर्धी व अस्पष्ट अशी आठवण त्याच्या जागृतींत डोकावते. विहंगम मार्गावरील बऱ्याच माणसांनी चक्रें फुलविण्याची ही योग-क्रिया केलेली नसल्यामुळें त्यांना जागृतीत ही आठवण बहुधा आणतां येत नाहीं. पण जागेपणीं आठवण येवो किंवा न येवो, विहंगम मार्गावरील होतकरू माणसांना या ज्ञानी पुरुषांकडून मोठ्या प्रमाणावर ज्ञान मिळत असतें.[1] या ज्ञानी पुरुषांचें तें एक नेमलेलें कामच आहे. अशा तऱ्हेचें ज्ञान महाराष्ट्रीय संतांना सूक्ष्म भूमिकेवर मिळत होतें हें त्यांच्या ग्रंथांवरून जिज्ञासूस समजून येण्यासारखें आहे.

जागेपणीं आठवण आली अथवा न आली तरी या साऱ्या अनुभवाच्या गोष्टी असल्यामुळें संत त्यांचा उल्लेख आपल्या ग्रंथांत उघडपणें करणार नाहींत हें सांगावयास नको. या शिक्षणांतील पुष्कळसा भाग स्फूर्तीचा, निष्ठेचा व शहाणपणाचा असतो व

१ या शिक्षणासंबधानें डॉ. ॲनी बेझंट यांच्या The Ancient Wisdom (पृ. ३०२ आवृत्ति १९२२ )नामक पुस्तकामध्ये पुढील विधान केलेलें आहे: " The disciple will have been receiving from his Master much teaching, teaching usually imparted during deep sleep of the body; the soul clad in the well-organised astral body will have become used to it as a vehicle of consciousness and will have been drawn to his Master to receive instruction and spiritual illumination."

जागृतींत तपशील न आठवला तरी हा भाग माणसाच्या जीवनाला इष्ट असें वळण लावू शकतो. पण कधी कधीं जागृतींत आठवण देणें जरूर असतें. जागृत जीवनांत एकादी महत्त्वाची गोष्ट करावयाची असली तर तिचा तपशील आठविल्याशिवाय माणसाला ती करतां येत नाहीं. यासाठी माणसाला आठवण येईशी करणें किंवा अन्य रीतीनें त्याला ती गोष्ट सुचविणें हें कधीं कधीं अवश्य होतें. ज्ञानी पुरुष त्याचीही तरतूद करीत असतात. अशा आठवणी व सूचना संतांच्या वाङमयांत नमूद आहेत. कॉलेजमधील विद्यार्थ्यानें आपल्या टिपणवहींत प्राध्यापकाच्या शिकवणीपैकीं एकदोन मुद्दे टिपलेले आढळले तर त्या टिपणांवरून आपण अनुमान काढतों कीं प्राध्यापकानें विद्यार्थ्यांसमोर बराच वेळ व्याख्यान दिलेलें असणार. तद्वत् असल्या सूचना व आठवणींवरून त्यांना पुष्कळ शिकवण मिळत होती असें आपण अनुमान काढणें रास्त होईल.

झोपेंत झालेल्या ज्ञानाची जागेपणीं आपणांला आठवण झाली म्हणजे आपण त्या आठवणीला स्वप्नाच्या सदरांत घालतों. हें ‘स्वप्न’ अनुभवावर आधारलेलें असल्यामुळें रोज जीं माणसाला वेडीवाकडीं स्वप्नें पडतात त्यांचा त्याशी संबंध नाही हें स्पष्ट आहे.[1] वेदान्तांत जागृतीच्या जरा वरची ‘स्वप्न’ नांवाची पायरी

१ अलीकडे स्वप्नाचें शास्त्रीय दृष्टया सशोधन करण्यात आलेलें आहे. पुष्कळ स्वप्नें मनात वारंवार येणाऱ्या विकारविचारातून अथवा मनात दाबून ठेवलेल्या मनोव्यापारांतून उगम पावतात. फ्राईड, ॲडलर, युग वगैरे मनोविश्लेषण शास्त्रवेत्त्याना अशा प्रकारची अनेक स्वप्ने आढळलेली आहेत. पण कांहीं स्वप्नें सत्यमूलक असतात असाही शास्त्रवेत्त्यांस अनुभव आलेला आहे. Psychical Research अथवा चमत्कार-सशोधन या क्षेत्रात संशोधन करणारांस अशी सत्यमूलक स्वप्नें आढळलेलीं आहेत. उदाहरणार्थ रायडर हॅगार्ड या इंग्रज कादबरीकाराला आपला आवडता कुत्रा पाण्यांत बुडून मेला

(टीप पुढील पानावर पहा.)

सांगितलेली आहे. तींत असलीं अनुभवात्मक स्वप्नेंच समाविष्ट असतात. खरोखरी जाणिवेच्या अनेक उच्च पायऱ्या अस्तित्वांत आहेत व त्यांची चढती श्रेणी आहे. महाराष्ट्रीय संतांपैकीं कांहींचा अधिकार मोठा होता व कांहींचा कमी होता. आपापल्या मगदुराप्रमाणें ते निरनिराळ्या जाणिवेच्या पायऱ्यांवर चढून जात असणार आणि त्या त्या पायरीवरचें ज्ञान त्यांना मिळत असणार. पण हा विषय सोपा व्हावा म्हणून कोणता संत, (देह झोपीं गेला असतांना) कोणत्या पायरीवर जाऊं शके, या गोष्टीकडे काना-डोळा करून आम्ही ह्या पुस्तकांत त्यांच्या जाणीवेचा उल्लेख 'उच्च जाणीव' किंवा 'स्वप्न' अशा सर्वसामान्य शब्दांनीं मुद्दाम करीत आहों.

## तुकाराम, नामदेव व पांडुरंग

जनतेस शिकवून शहाणें करण्याचें ध्येय तुकारामांनीं स्वतःसमोर ठेविलें होतें. तें ध्येय त्यांनीं ज्या एका साक्षात्कारामुळें निश्चित केलें तो त्यांनीं पुढीलप्रमाणें दिला आहे.[१] "नामदेवें केलें स्वप्नामाजीं

---

(टीप मागील पानावरून चालू)

व त्याचे शव पाण्यावर तरगत आहे असें स्वप्न पडलें व खरोखरी तसें घडून आलें व स्वप्नांत दिसलेल्या अनेक गोष्टींचा तपशीलही जुळला. एका माण-साला त्याचा बाप स्वप्नात दिसला व त्यानें आपलें मृत्युपत्र कोठें ठेविलें आहे तें स्वप्नात मुलाला सांगितलें आणि त्याप्रमाणे ते त्याला सापडले असें एक उदाहरण सर ऑलिव्हर लॉज यांनीं दिलेलें आहे. सत्यमूलक स्वप्नांची अनेक उदाहरणें मायर्सकृत Human Personality खंड १ मधील Sleep नामक प्रकरणात दिलेली आहेत. संतांना स्वप्नांत मिळालेले अनुभव सत्यमूलक स्वप्नाच्या सदरात घातले पाहिजेत हें उघड आहे.

१ तुकाराम गाथा आवटे क्रमांक ३७१३. क्रमांक ३७१४ मध्यें 'नामदेवापायीं तुकया स्वप्नी भेटी।' या शब्दानीं तुकाराममहाराजांनी हाच अनुभव पुनः नमूद केलेला आहे.

जागें। सवें पांडुरंगें येऊनीयां ॥१ सांगितलें काम करावें कवित्व। वाऊगें निमित्य बोलों नको ॥२ माप टाकी सळे। धरिली विठ्ठलें। थापटोनि केलें सावधान ॥३ प्रमाणांची संख्या सांगे शतकोटी। उरले ते शेवटीं लावीं तुका ॥४" म्हणजे पांडुरंगांना बरोबर घेऊन नामदेव मला स्वप्नांत भेटले. त्यांनी मला सांगितलें उगीच वावग्या गोष्टी बोलण्यांत वेळ न घालवितां कवित्वाचें काम अंगावर घे, त्याचें मोजमाप विठ्ठल ठेवितील. अेकंदर शत कोटी अभंग पुरे करणें आहेत. जितके कमी आहेत ते तुम्ही (तुकारामांनीं) पुरे केले पाहिजेत. असें दिसतें कीं ही सूचना मिळण्याच्या अगोदर तुकाराममहाराजांनीं आपल्या जीवनाचें ध्येय निश्चित केलेलें नव्हतें. घरची गरिबी, इष्टमित्रांच्या अपेक्षा, लोकमत वगैरे अनेक अडचणी त्यांच्या मार्गात होत्या. ते म्हणतात "वचनें मानिली नाही सुहृदांची" तसेंच "मानियेलें नाहीं बहुमतां" आणि 'सत्य असत्यासी मन केलें ग्वाही।[१]' अशा प्रकारचा निश्चय करून आपल्या आयुष्यास वळण लावण्याच्या कामी तुकारामांना साहाय्य व्हावें म्हणून कांहीं आदेश त्यांस देण्यांत आला व त्यापैकीं वरील भाग त्यांस जागृतींत आणतां आला हें ह्या अभंगावरून दिसून येतें.

या दृष्टान्तांत नामदेव व पांडुरंग हे तुकारामांना उच्च भूमिकेवर भेटले असें नमूद आहे. नामदेव त्या वेळी हयात नव्हते. माणूस मेला तरी त्याचा जीवात्मा मरत नाही. थोर पुरुषांचा जीवात्मा मरणोत्तरही सत्कार्य करीत असतो. नामदेव तसें सत्कार्य करीत होते असें या अभंगावरून दिसून येतें. पांडुरंगही तुकारामांना भेटले. पांडुरंग म्हणजे विठ्ठल. विठ्ठल म्हणजे पंढरपूरची शिलामूर्ति. पण हा उथळ मनानें केलेला अर्थ आहे. या मूर्तींतला जो देव तो खरा विठ्ठल होय. हा देव अठ्ठावीस युगेंपर्यंत एका विटेवर (म्हणजे जागेवर, अधिकारावर) उभा आहे असें वर्णन आहे. अर्थात् अनेक युगेंपर्यंत चालू असणाऱ्या एका अधिकाराचें अथवा त्या

१ पहा तुकाराम गाथा आवटे क्रमांक ३७५३

अधिकाराच्या गादीवर असलेल्या अधिकाऱ्याचें तें नांव आहे हें उघड आहे. तो अधिकारी तुकारामांचा मार्गदर्शक होता. त्या अधिकाऱ्याची सगुणमूर्ति म्हणजे पंढरपूरची विठ्ठलाची शिलामूर्ति होय. सिद्धसंघांत अनेक युगेंपर्यंत विशिष्ट अधिकार चालविणारे अधिकारी विद्यमान असतात. त्यांपैकीं महाराष्ट्रीय संतांचा आवडता विठ्ठल हा एक अधिकारी आहे असें या दृष्टान्तावरून दिसून येतें.[१]

## एकनाथ

एकनाथांनाही अशा सूचना मिळालेल्या आहेत. ज्ञानेश्वरांच्या काळीं छापखाने नव्हते. त्या वेळीं नक्कलकार ग्रंथांच्या नकला करीत. ग्रंथांच्या नकला करतांना नक्कलकारांच्या अज्ञानामुळें अथवा निष्काळजीपणामुळें नकलांत चुका होत. ज्ञानेश्वरीच्या अशा पुन: पुन: नकला होऊन ज्ञानेश्वरी जनतेंत प्रसृत झाली; पण हळूहळू ज्ञानेश्वरींत पुष्कळ अशुद्धें, चुका व अपपाठ शिरले व नक्कलकारांनीं आपल्या पदरच्या ओव्या घुसडून दिल्यामुळें एकनाथांच्या काळी अमृताच्या ताटांत करवंटचा ठेवाव्या तसें विकृत स्वरूप ज्ञानेश्वरीला प्राप्त झालें. त्या वेळीं एकनाथांना स्वप्नद्वारां सूचना मिळाली. ती एकनाथांनीं पुढीलप्रमाणें वर्णिलेली

---

१ अठ्ठावीस युगे ही चाललेली गादी कोणाची आहे त्याचें विस्तृत विवेचन या छोटया टिपेंत होऊ शकणार नाही. बुद्ध हे व्यक्तीचें नांव नसून ती एक गादी आहे. पहिल्या दीपंकर बुद्धापासून मोजल्यास गौतम बुद्धापूर्वीं चोवीस बुद्ध होऊन गेले. गौतमबुद्ध हा पचविसावा होय. दीपंकर बुद्धाच्या अगोदर आणखी तीन बुद्ध होऊन गेले व प्रत्येक बुद्ध एक युगभर अधिकार चालवितो असें बुद्धधर्म सांगतो. पहा ना. के. भागवत कृत निदानकथा पृ. ६०-६१ श्लोक २५१-२५४. म्हणजे गौतम बुद्ध हा (पहिल्या दीपंकर बुद्धाच्या अगोदरचे तीन बुद्ध जमेस धरल्यास) अठ्ठाविसावा होतो. तेव्हां अठ्ठावीस

(टीप पुढील पानावर पहा.)

(टीप मागील पानावरून चालू)
वर्षे विटेवर उभा असलेला विठोबा म्हणजे बुद्धाच्या पायरीचा अधिकार अथवा अधिकारी पुरुष होय असें वाटते. एकनाथानी एके ठिकाणी 'या लागीं बौद्धरूपे पंढरी नादसी' असें म्हटलें आहे (एकनाथ गाथा–आवटे–क्रमांक ३९३२). तसेंच मत्स्यकूर्मादि दशावतार ओळीने देताना श्रीकृष्णानंतरचा अवतार बुद्ध न म्हणता एकनाथानी विठोबा म्हटले आहे. म्हणजे बुद्धाच्या जागी विठोबा घातला आहे. पांडुरंग व तुकाराम यांचें वर्णन करून त्यांचें ऐक्य दर्शविण्यासाठी बहिणाबाईनी पांडुरंगास (विठ्ठलास) अनुलक्षून 'पांडुरंग तुका, पांडुरंग तुका। वेगळीक देखा। केवी होय। कलियुगीं बौध्यरूप धरी हरी। तुकोबा शरीरी प्रवेशला।' असे उद्गार काढलेले आहेत. (पहा उमरखानेकृत संत बहिणाबाईकृत अभंग पृ. १३ अभंग २५) तेव्हा विठोबा हा बुद्ध असावा ह्या म्हणण्यास बळकटी येते

हिंदुधर्माची परिभाषा व गणना पाहिल्यास हल्लीचे व्यास (कृष्ण द्वैपायन) हे अठ्ठाविसावे व्यास आहेत (चित्रावकृत भारतवर्षीय प्राचीन चरित्रकोषांत व्यास हे नाव पहा) दर द्वापरयुगात एकेक व्यास असतो, व आतापर्यंत २८ द्वापरयुगे झाली आहेत असे तो कोश मानतो म्हणजे २८ युगे चाललेल्या गादीवरचा मध्याचा अधिकारी जो व्यास तो विठोबा आहे.

थिऑसफीय संशोधनाप्रमाणें पाहिल्यास एकदर पूर्वी झालेले बुद्ध चोवीस असून गौतम बुद्ध हा पंचविसावा आहे. बापरखुमादेविवरु पंचविसावा। चोविसामूर्ति वेगळा॥ असें ज्ञानेश्वरानी (ज्ञानेश्वर गाथा–आवटे क्रमांक ९०) व "पंचविसावा श्रीविठ्ठलु। चोविसा वेगळा तयाचा खेळु गे माय"॥ असें एकनाथांनी (एकनाथ गाथा–आवटे–क्रमांक ५०५) म्हटलें आहे. ही ज्ञानेश्वर-एकनाथाची अनुभवात्मक माहिती असावी. अर्थात् थिऑसफी व संत या दोघांचा अनुभव एकच आहे व त्यावरून विठोबा व बुद्ध एकच असावे ह्या विधानाला आणखी अधिक बळकटी येते.

खरोखरी निर्याणाच्या अगोदर गौतम बुद्ध ज्या अधिकारावर होते ती बुद्धाची गादी नसून एक पायरी खालची म्हणजे बोधिसत्त्वाची गादी होती.

(टीप पुढील पानावर चालू)

(टीप मागील पानावरून चालू)
बोधिसत्त्वाच्या गादीवरचा अधिकारी पुरुष पुष्कळ वर्षें त्या अधिकारावर असतो, आपल्या अमदानीत तो जगांत अनेक धर्म स्थापतो, व आपली कारकीर्द संपवून तो एक पायरी पुढें जाऊन बुद्ध होतो. अशा तऱ्हेनें रिकाम्या झालेल्या बोधिसत्त्वाच्या गादीवर दुसरा ज्ञानी पुरुष नेमण्यांत येतो. गौतम बुद्धाच्या जन्मांत त्या पुरुषाने आपली पूर्वीची बोधिसत्त्वाची कारकीर्द संपविली व तो बुद्धाच्या गादीवर गेला. बोधिसत्त्वाच्या आपल्या कारकीर्दीत त्यानें व्यास म्हणून जगासमोर येऊन हिंदुधर्म स्थापलेला आहे असें थिऑसफीय संशोधनावरून दिसून येते. खरोखरी व्यास हे व्यक्तीचें नांव नसून तीही एक अधिकाराची गादी आहे. तेव्हां बोधिसत्त्व व व्यास हा एकच अधिकार आहे. हिंदुधर्माचे ग्रंथ त्या अधिकाराला व्यास म्हणतात व बुद्ध धर्माचे ग्रथ त्याला बोधिसत्त्व म्हणतात असा फक्त नांवाचा फरक आहे.

गौतम बुद्धांनी बोधिसत्त्वाची गादी रिकामी केल्यावर त्या गादीवर हल्ली जे अधिकारी पुरुष आलेले आहेत त्यानीं नंतर वृंदावनांत जन्म घेऊन ते श्रीकृष्ण म्हणून जगासमोर आले असें थिऑसफीय संशोधन सांगतें. सर्व संतांनी विठोबा हा कृष्ण आहे असे पुष्कळ ठिकाणी म्हटलें आहे. या सर्व म्हणण्याचा निष्कर्ष असा की विठोबा ही बुद्धाची (जास्त बारकाव्याने म्हणावयाचें असल्यास बोधिसत्त्वाची) म्हणजेच व्यासाची गादी आहे अथवा त्या गादीवरील तत्कालीन अधिकारी पुरुष आहे, व त्याच गादीवरच्या सध्याच्या अधिकाऱ्यानें श्रीकृष्णांचा जन्म घेतलेला होता. विठोबाचें पंढरपुराचें देऊळ हे पूर्वीचें बुद्धाचे देऊळ असावें. ज्ञानेश्वर-नामदेवानी ते देऊळ उजेडात आणले. त्याला महत्त्व दिले व इतर संतांनी ती प्रथा पुढें चालविली. बोधिसत्त्वाची व व्यासाची गादी यात नांवाखेरीज कांही फरक नाही. हे ज्ञानेश्वरादिकांना अतर्ज्ञानाने माहीत असल्यामुळें बुद्ध हा परकीय आहे ही सांप्रत हिंदूच्या मनांत येणारी भावना त्यांच्या हृदयास शिवली नाहीं, त्यांनी पंढरपूरची चळवळ महाराष्ट्रांत सुरू केली व विठोबाची शिलामूर्ति जरी मूळ बुद्धाची असली तरी त्याचें वर्णन त्यांनीं असें केलें की तो श्रीकृष्ण आहे हें जनतेस समजावें. धार्मिक भेद अंतर्ज्ञानानें कसे वितळतात याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे.

आहे.[१] "श्री ज्ञानदेवें येऊनि स्वप्नांत। सांगितली मात मजलागी ॥१ दिव्य तेजःपुंज मदनाचा पुतळा। परब्रह्म केवळ बोलतसे ॥२ अजानवृक्षाची मुळी कंठास लागली। येउनि आनंदीं स्थळीं काढ वेगीं ॥३ ऐसें स्वप्न होतां आलों अलंकापुरीं। तंव नदीमाझारी देखिलें द्वार ॥४ एका जनार्दनीं पूर्व पुण्य फळलें। श्रीगुरु भेटलें ज्ञानेश्वर ॥५" म्हणजे मला स्वप्नांत ज्ञानेश्वर भेटले. ते मदनासारखे तेजस्वी दिसत होते. माझ्या घशाला अजान (अज्ञान) वृक्षाची मुळी लागली आहे ती तू लवकर काढून टाक असें त्यांनीं मला सांगितलें. हें स्वप्न पडल्यावर मी अलंकापुरीस (आळंदीस) आलों व नदीमध्यें समाधीचें द्वार असलेलें माझ्या दृष्टीस पडलें. पुष्कळ स्वप्नें सांकेतिक असतात. हें सांकेतिक स्वप्न आहे असें आम्हांस वाटतें. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञानेश्वरांनीं बोललेला होता. लिहिलेला नव्हता. मन श्रेष्ठभूमिकेवर नेऊन ज्ञानेश्वर बोलत व सच्चिदानदबोवा त्यांचे शब्द टिपीत. अज्ञान वृक्ष वाढत जाऊन त्याची मुळी माझ्या कंठास लागली आहे, व त्यामुळें माझे शब्द नीट उमटेनासे झाले आहेत हें सांकेतिक बोलणें आहे. ज्ञानेश्वरीच्या शब्दांना अत्यत विकृत स्वरूप आलें आहे असा त्याचा अर्थ आहे. अज्ञानाची माझ्या घशाला लागलेली ही मुळी कापून टाक म्हणजे अज्ञानानें ज्ञानेश्वरीच्या शब्दांत आलेल्या चुका दुरुस्त कर असें सांगण्याचा अभिप्राय आहे.[२] ज्ञानेश्वरी प्रकट

१ एकनाथ गाथा–आवटे क्रमाक ३५२४.

२ टीप–आमचा म्हणण्याचा असा आशय नाही की, याच सुमारास एकनाथांनी ज्ञानेश्वराच्या समाधिस्थानाला भेट दिली नसेल व तेथे वाढलेलीं झाडें व रान कापून टाकून त्या स्थानाचा जीर्णोद्धार केला नसेल. वरील अभंगांत लिहिल्याप्रमाणे आळंदीस जाऊन त्यानी या गोष्टी केल्या असाव्यात हें उघड आहे. ज्ञानेश्वरांचें देहावसान इतर माणसाप्रमाणे झालेलें नाही, त्यांनी एक विशिष्ट दिवस अगोदर ठरविला व त्या

(टीप पुढील पानावर चालू.)

झाल्यानंतर सुमारें तीनशें वर्षांनीं एकनाथांना हा दृष्टांत झाला व लगेच ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रति मिळवून व त्यांतील चुका सुधारून हल्ली प्रचलित असलेली ज्ञानेश्वरीची प्रत त्यांनीं महाराष्ट्राला सादर केली. अशा रीतीनें एक मोठ्या जबाबदारीचें काम एकनाथांवर सोपविण्यांत आलें व तें त्यांनीं उत्कृष्टपणानें पार पाडलें. ही सूचना देतेवेळीं ज्ञानेश्वर दृश्य सृष्टींत हयात नव्हते, पण वरच्या भूमिकेवर कार्य करीत होते हें एकनाथांच्या वरील शब्दांवरून दिसून येत आहे.

एकनाथांच्या चरित्रांत नमूद असलेली अशा प्रकारची आणखी एक सूचना येथें दाखल करू या. एकनाथांच्या काळी जनार्दन स्वामी नांवाचे एक साधु होते. एकनाथ बारा वर्षांचे असतांना त्यांना एक आकाशवाणी ऐकू आली.[१] देवगिरीस जनार्दन स्वामी

---

(टीप मागील पानावरून चालू)

दिवशी एका मुद्दाम तयार केलेल्या गुहेत ते शिरले तेथे ते पाटावर बसले, जमलेल्या लोकानी ते गुहेचे द्वार बद केले व ज्ञानेश्वरानी आपला जीवात्मा देहांतून योगसामर्थ्यानें काढून घेऊन देह सोडला. पुढें तेथें झाडें वाढलेली असणार, गुहेत झाडाच्या मुळ्याही पसरलेल्या असणार व ती गुहा मोडकळीस आलेली असणार. एकनाथांनी त्याचा जीर्णोद्धार केला असला तरी त्या वेळी म्हणजे ज्ञानेश्वरांच्या देहत्यागानंतर तीनशें वर्षांनी ज्ञानेश्वरांचा देह पूर्ववत् तेथें होता व झाडाचें मूळ वाढून त्याच्या घशाला लागलें होतें व ते नाथानी कापलें या गोष्टी शक्य नाहीत. या गोष्टी सांकेतिक आहेत इतकेच आमचें म्हणणें आहे.

१ एकनाथानी आकाशवाणी ऐकल्याचा उल्लेख रानडेकृत Indian Mysticism in Maharashtra या इंग्रजी पुस्तकांत पृ. २१५ वर आहे. एकनाथांनी स्वत. त्या आकाशवाणीचा उल्लेख आपल्या गाथेंत कोठें केलेला आहे तें स्थळ आम्हांस सांपडलेलें नाही. अलीकडच्या काळांतही कित्येकास आकाशवाणीचे अनुभव आल्याचें नमूद आहे. कराची एंजिनी-

(टीप पुढील पानावर चालू)

नांवाचे एक सत्पुरुष आहेत त्यांच्याकडे तू जा व त्यांना तू गुरु कर असें एकनाथांना त्या वाणीनें सांगितलें. ती वाणी प्रमाण मानून घरच्या वडील मंडळींची परवानगी न घेतां एकनाथ जनार्दन स्वामींकडे गेले, त्यांचेकडे राहिले, त्यांच्यापासून पुढें अध्यात्मशास्त्र शिकले, त्यांचा अनुग्रह त्यांनीं घेतला आणि स्वतःला जन्मभर एकाजनार्दन असें म्हणू लागले. यावरून वरील आकाशवाणीनें एकनाथांच्या आयुष्यास एक महत्त्वाची दिशा लावून दिली हें उघड आहे. ही सूचना स्वप्नांत मिळालेली नसून आकाशवाणीच्या द्वारानें व्यक्त झालेली आहे.

---

(टीप मागील पानावरून चालू)

र्यारग कॉलेजचे प्रिन्सिपाल गगाधर नीलकठ गोखले यानी 'माझ्या आयुष्याचा चित्रपट' या नावाचे आत्मचरित्र लिहून प्रसिद्ध केलें आहे. त्यात पृ. ११७–११८ वर गोखले लिहितात की, देशभक्तीने राजकारणात उडी टाकण्यासाठी आपण आपली मोठ्या पगाराची सरकारी नोकरी सोडावी की सोडू नये या प्रश्नाने १९१७ साली माझे डोके भणभणून गेलेले होते. त्या वेळी एकदा पहाटे जागा झाल्यावर मला एका अत्यत गंभीर व गोड आवाजात पुढील शब्द अस्खलित ऐकू आले. My boy, be patient; your time has not come. मी डोळे चोळले, सभोवती पाहिलें, पण शेजारी कोणीं नव्हतें. मात्र त्या आवाजानें माझ्या मनास शाति आली व या शब्दानी माझ्या आयुष्यात मोठी क्रांति घडवून आणली. डॉ. ॲनी बेझंट यानी आपल्या आत्मचरित्रांत आपण दोन वेळा आकाशवाणी ऐकल्याचा अनुभव सांगितला आहे. (आवृत्ति १९१७ पृ. ९४ व ३४० व डॉ. बेझंट याचें Initiation नामक पुस्तक पृ. ३० ) बिशप लेडबीटर यानाही आकाशवाणीचा अनुभव आलेला होता. (पहा The Invisible Helpers आवृत्ति १९२८ पृ. २३) मायर्स ह्यांच्या Human Personality मध्येंही असले अनुभव नमूद आहेत. (पहा परिशिष्ट क्रमाक ४२८ अ व ब)

एकादा मनुष्य शालान्त परीक्षा पास होऊन कॉलेजांत जातो व तेथील प्राध्यापकांपासून ज्ञान मिळवीत असतो; व त्याच काळीं शाळेंत नोकरी धरून शाळेंतल्या विद्यार्थ्यांसही तो ज्ञानदान करीत असतो. तद्वत् महाराष्ट्रीय संत आपल्यापेक्षां श्रेष्ठ असलेल्या माणसांकडून (अथवा गुरूंकडून) उच्च भूमिकेवर स्फूर्ति व ज्ञान हीं प्राप्त करून घेत व त्याच वेळीं उच्च भूमिकेवर आपल्या शिष्यांना त्यांच्या जोगती स्फूर्ति व ज्ञान हीं देत असत. कधीं कधीं उच्च भूमिकेवरून कांहीं तजवीज करून शिष्यांना व इतरांना ते मार्गदर्शन करीत किंवा त्यांच्या अडचणी दूरही करीत. या विषयींचे उल्लेख सतांच्या वाङमयांत मधून मधून आढळतात.

तुकारामांच्या गाथ्यांत 'धरणेकऱ्यास उपदेश'[१] या नांवाचे कित्येक अभंग आहेत. त्यांवरून असें दिसतें कीं कोणी एक ब्राह्मण मुक्ति मिळण्यासाठी देवाशीं धरणें धरून बसला होता. मुक्ति म्हणजे काय, ती कोणत्या साधनानें मिळते याविषयी त्या ब्राह्मणाच्या मनांत चुकीच्या कल्पना होत्या. ज्ञानेश्वर त्या वेळीं अर्थातच हयात नव्हते. पण उच्च भूमिकेवर ज्ञानेश्वरांनी त्या ब्राह्मणाला ज्ञान देण्याचा प्रयत्न केला, जेव्हां तें ज्ञान त्या ब्राह्मणाला रुचेना, तेव्हां त्यांनी त्या ब्राह्मणाला तुकाराम महाराजांना जाऊन भेट असें सांगितलें असें दिसतें. तें कसेंही असलें तरी तुकारामांकडे तो ब्राह्मण गेला. 'माझा अधिकार ज्ञानेश्वरांपेक्षां फार कमी आहे, पण ज्या अर्थी ज्ञानेश्वरांनीं मजकडे तुला पाठविलें आहे त्या अर्थी मी तुला सांगतों कीं तू ग्रंथ वाचण्यांत वेळ घालवूं नको, (नको कांहीं पडों ग्रंथांचिये भरीं ।) मोक्षाचें गाठोडें देवापाशीं असतें व तें देव लोकांना आणून देतो हें खरें नाहीं (नाहीं

१ धरणेकऱ्याचे अभंग तुकाराम गाथेंत (आवटे) क्रमांक ३८२५ ते ३८४८ पर्यन्त आहेत ते पहा. तुकारामाच्या उपदेशाचाही त्या धरणेंकरी ब्राह्मणानें अव्हेर केला असें गाथेवरून दिसतें. पहा जोग गाथा ३३६१–३३८६.

देवापाशीं मोक्षाचें गांठोडें। आणुनि निराळे द्यावें हातीं।) तू प्रेमरूपी अमृताची धार देवाला वहा (प्रेम अमृताची धार। वाहे देवाही समोर)' वगैरे उपदेश त्याला तुकारामांनीं केला. ज्ञानेश्वरांची सूचना या गांठीभेटीला कारणीभूत झाली होती ही गोष्ट त्या दोघांना पटली होती. यावरून असें होतें की ज्ञानेश्वर उच्च भूमिकेवर शिक्षणाचें कार्य करीत असतांना जेव्हां त्यांना समजुतीनें कमी असलेला एक मनुष्य भेटला, तेव्हा त्याला त्यांनीं तुकारामांकडे जा असें सांगितलें व ह्याला उपदेश करून पहा असें तुकारामांनाही सांगितलें.

## रामेश्वरभट्ट

तुकारामाच्या काळी रामेश्वरभट्ट नांवाचे एक प्रामाणिक ब्राह्मण होऊन गेले. ते कर्मठ व जुन्याचे अभिमानी असून भक्तिभावाला जास्त महत्त्व देणें, कर्मकांडाला कमी लेखणे, जाति–विषयक भेद गौण मानणें, स्त्रियांस उच्च दर्जा देणें, समाजांतल्या जुन्या वाईट चालीरीतींवर आघात करून त्या सुधारणें, जुने देव सोडून विठोबाची भक्ति करणें वगैरे सतांनी योजलेल्या सुधारणांना त्यांचा विरोध होता. अर्थात् तुकारामांविषयी त्यांच्या मनांत द्वेषभावना उद्‌भवली आणि तुकारामांच्या अभंगांच्या वह्या इंद्रायणीत बुडवाव्या असे त्यांनीं सांगितलें. तुकाराम महाराज व रामेश्वरभट्ट यांमध्यें अशा प्रकारचा विरोध चालू असतांना एकदां त्यांना अनपेक्षित रीतीनें शारीरिक व्यथा होऊं लागली. रामेश्वरभट्ट म्हणतात---माझी मज आली रोकडी प्रचीत। होऊनीयां फजित दुःख पावें॥ १॥ कांहीं द्वेष त्याचा करितां अंतरी। व्यथा या शरीरी बहुत झाली॥ २॥ ज्ञानेश्वरें मज केला उपकार। स्वप्नीं सविस्तर सांगितलें[१]॥ ३॥ म्हणजे मी तुकारामांचा द्वेष केला, त्याची रोकडी प्रचीति मला येऊन माझ्या देहामध्यें व्यथा उत्पन्न झाली व हा कार्यकारणभाव मला ज्ञानेश्वरांनीं सविस्तर

१ पहा सकलसतगाथेंतील (आवटे) रामेश्वरभट्ट यांचे अभंग क्रमांक १

समजावून सांगितला. माणसाच्या मनांत जोराची द्वेषाची भावना आली म्हणजे काय होतें? त्याचा सूक्ष्म देह विशिष्ट प्रकारानें थरथरून जातो, विस्तवांतून जशा ठिणग्या बाहेर उडाव्या तशा त्याच्या सूक्ष्मदेहांतून कांही जिवंत आकृति बाहेर पडतात व ज्याचा द्वेष केला असेल त्याच्या सूक्ष्मदेहांत शिरून त्या त्याच्या मनांत द्वेषाची भावना चेतवितात, आणि अशा रीतीनें त्याच्या शीलांत दोष उत्पन्न होतो. पण त्या माणसाच्या स्वभावांत जर द्वेषाची बीजें मुळीच नसतील तर भितीवर मारलेला रबरी चेंडू जसा परत येतो तद्वत् या द्वेषगर्भ आकृतींना तेथें थारा न मिळाल्यामुळें त्या आकृति त्याच मार्गानें द्वेष करणाऱ्या माणसापाशीं परत येऊन त्याच्यावर त्या उपद्रवाचा वर्षाव करतात.[१] रामेश्वरभट्टांनीं तुकारामांचा जो द्वेष केला होता त्याची अशीच प्रक्रिया होऊन रामेश्वरभट्टांच्या देहांत व्यथा उत्पन्न झाली. हें कां व कसें झालें ते रामेश्वरभट्टांच्या ध्यानांत येण्यासारखें नसल्यामुळें ज्ञानेश्वरांनीं त्यांना उच्च भूमिकेवर हा कार्यकारणभाव समजावून दिला आणि 'तुकारामाला शरण जा' (शरण जाई त्याला निश्चयेंसी) असा उपदेश केला. रामेश्वरभट्ट

---

१ माणसाच्या मनात भावना व विचार आले की अदृश्य भूमिकेवर काय काय गोष्टी होतात त्याचें थिऑसॉफिकल सोसायटीत सशोधन झालेलें आहे व ती माहिती बेझट–लेडबीटरकृत Thought Forms नावाच्या पुस्तकांत प्रसिद्ध झालेली आहे. विचारापासून निर्माण होणाऱ्या आकृतीची त्यांत सचित्र माहिती दिलेली सांपडेल. साधुवृत्तीच्या माणसाचा द्वेष केल्यास काय परिणाम होतो त्याचें वर्णन पृ. ३९ वर पुढीलप्रमाणे दिलेलें आहे:–

From this arise also the very serious effects of hating or suspecting a good and highly advanced man. The thought forms sent against him cannot injure him and they rebound against their projectors shattering them mentally morally or physically.

ह्याडाचे सुस्वभावी होते. अर्थात् ज्ञानेश्वरांचा उपदेश त्यांना पटला, ते तुकारामांच्या कीर्तनास जाऊं लागले व त्यांच्या समागमानें त्यांची देहव्यथा (झाले हे आराम देह माझे) नष्ट झाली असें त्यांनीं लिहिलें आहे. पुढें रामेश्वरभट्ट तुकारामांचे अनुयायी झाले हें सर्वांस माहीत आहे. होतकरू माणसांना अशा रीतीनें शिकवून शहाणे करण्याचें कार्य ज्ञानेश्वरांसारखे संत मरणोत्तरही करीत हें या उदाहरणावरून दिसून येतें.

**बहिणाबाईचें आत्मचरित्र**

तुकारामांची शिष्या संत बहिणाबाई हिच्या गाथ्यांत तिनें लिहिलेलें स्वतःचें आत्मचरित्र समाविष्ट आहे. तें काळजीनें वाचल्यास तुकाराम बहिणाबाईला उच्च भूमिकेवर वारवार भेटून ज्ञानदान करीत असत असें दिसून येईल. तुकारामांची व बहिणाबाईची पहिली भेट देहूस झाली. त्याच्या अगोदर तुकारामांनीं तिला स्वप्नांत भेटून तिच्यावर अनुग्रह केला होता. ती हकीकत या पुस्तकात पूर्वीं (पृ.५८) येऊन गेली आहे. पण या प्रसगाच्या अगोदरही उच्च भूमिकेवर त्या दोघांच्या कित्येक गांठीभेटी झाल्या होत्या असें त्या आत्मचरित्रावरून दिसतें. उच्च भूमिकेवरच्या भेटीचे सर्वच प्रसंग माणसाला जागृतींत आठवत नाहीत. बहिणाबाईला अनेक प्रसंग आठवल्याची माहिती आत्मचरित्रांत आहे. त्यांत न आठवलेल्या प्रसंगाची आपण भर घातली तर तुकाराम तिला उच्च भूमिकेवर वारंवार मार्गदर्शन करीत होते व तिच्या मार्गांतील अडचणी दूर करण्याच्या तजविजीत होते असें म्हणावें लागेल. स्त्री असल्यामुळें बहिणाबाईच्या समोर जास्त अडचणी उभ्या होत्या. ती अत्यंत अल्पवयी असतांना तिचें लग्न झालें होतें. तिचा नवरा चार चौघांसारखा सामान्य दर्जाचा माणूस होता. तिची उत्कट देवभक्ति त्याला आवडत नव्हती. मी वेदपठन करणारा ब्राह्मण आहे, माझ्या बायकोनें मला गुरु न करतां शूद्र जातीच्या

तुकारामाचें शिष्यत्व स्वीकारावें हें त्याला पसंत नव्हतें. स्वप्नांत झालेला अनुग्रह हें थोतांड आहे असें त्याला वाटे. बहिणाबाई लिहिते, "भ्रतार म्हणतसे आम्ही कीं ब्राह्मण। वेदाचें पठण सदा करूं ।। कैंचा शूद्र तुका स्वप्नींचें दर्शनी। बिघडली पत्नी काय करूं ।।[1] मला कोणी विचारीत नाहीं व लोक माझ्या बायकोचें स्तोम माजवितात, याबद्दल त्याला वैषम्य वाटत होतें. म्हणे ही बाईल मरे तरी बरी । ईस का पामरें भेटताती ।।[2] अशी त्याची वृत्ति होऊन तो बहिणाबाईस मारहाण करूं लागला. हें प्रकरण पुढे जास्त चिघळत गेलें. बहिणाबाईस तीन महिने गेले असतांना बायकोला टाकून व संन्यास घेऊन तीर्थयात्रेस जाण्याचा त्यानें बेत केला. त्यामुळे पांडुरंग व तुकाराम यांचा ऋणानुबध तोडणें किंवा नवऱ्याचा संबंध सोडणें यांपैकीं कोणती तरी एक गोष्ट करण्याचा बिकट प्रसग तिच्या जीवनांत निर्माण होऊन इकडे आड व तिकडे विहीर असे तिला झालें. असल्या अडचणींमुळें बहिणाबाईचा जीव कासावीस होऊन गेला होता. उच्च भूमिकेवरून या अडचणी तुकारामबुवांनी पाहिल्या व मोठ्या कुशलतेनें त्यांनी बहिणाबाईंना त्यांतून मार्ग काढून दिला असें बहिणाबाईच्या आत्मचरित्रावरून दिसून येतें. एकदां अशा दु:खद स्थितींत असतांना बहिणाबाईस घेरी येऊन त्या चार दिवस निश्चेष्ट पडल्या होत्या व जेव्हां शुद्धीवर आल्या तेव्हां "उघडोनिया नेत्र पाहें जंव पुढें । तव दृष्टि पडे पांडुरंग ।। ब्राह्मण स्वप्नांत देखिला तो जाण । त्याची आठवण मनीं राहे ।।"असा अनुभव त्यांना आला. या ब्राह्मणानें त्यांना 'सावधानपणें व विवेकानें वागा' असें सांगितलें. ब्राह्मणाच्या या शब्दांनीं त्यांच्या मनास समाधान मिळालें. बहिणाबाईपाशीं एक गोवत्स होतें व त्या वत्सावर त्यांचा सारा जीव होता; पण तें पुढें मेलें आणि बहिणाबाईंना त्याचें

---

१ उमरखानेकृत संत बहिणाबाईकृत अभंग पृ. १६ अभंग ३१.

२ कित्ता पृ. १५ अभंग ३०.

अतिशय दुःख झालें. वत्स मेल्यानंतर सातव्या दिवशीं तुकाराममहाराज बहिणाबाईस स्वप्नांत भेटून त्यांनीं बहिणाबाईचें सांत्वन केलें. जयरामस्वामी नांवाचे एक कीर्तनकार त्या वेळीं कीर्तन करीत असत व बहिणाबाई त्यांच्या कीर्तनास मोठ्या आवडीनें जात. तुकारामांनीं नंतर जयरामस्वामींना दर्शन दिलें व त्याच वेळीं बहिणाबाईनाही दिले. मी जयरामस्वामींना दर्शन देण्यास आलों होतों, असा बहिणाबाईंना खुलासा सांगितला आणि "तुम्हीं आतां येथे नका राहूं कदा" असा आदेश दिला. ज्या दिवशी नवरा बायकोला टाकून देशांतरास जाणार होता, त्याच्या आदल्या दिवशी त्याच्या अंगाचा एकदम दाह होऊं लागला व तो अनेक दिवस टिकला. पुष्कळ उपाय केले पण व्यर्थ. मी तुकारामाचा द्वेष केल्यामुळें मला ही व्यथा होत नसेल ना ? असा विकल्प नवऱ्याच्या मनांत पुढें येऊं लागला, आणि हें जर खरें असेल तर मला तुकारामांनी चमत्कार दाखवून माझी खात्री पटवावी असें तो म्हणू लागला. त्या वेळीं एक वृद्ध ब्राह्मण तिच्या नवऱ्यास भेटावयास आला, व 'तुझी बायको विरक्त वृत्तीची खरी हरिभक्त स्त्री आहे, तुला जगावयाचें असेल तर तू तिला जें क्रूरपणानें वागवीत आहेस तें बंद केलें पाहिजेस' असा उपदेश त्यानें नवऱ्याला केला. आजारांत बेजार झाल्यामुळें नवऱ्यानें तो ऐकला. लगेच ब्राह्मण अदृश्य झाला आणि नवऱ्याच्या प्रकृतीस आराम पडूं लागला अशी हकीकत बहिणाबाईनीं दिली आहे. त्या दोघांचें बोलणें मी स्वतः ऐकलें (आइकतें मीही दोघांचें बोलणें) असें बहिणाबाईंनीं स्वच्छ म्हटलें आहे. या उपदेशानें भ्रताराची बुद्धि पालटली आणि पतिपत्नींची दिलजमाई होऊन दोघेही तुकारामास भेटण्यासाठीं देहूस गेलीं, असें बहिणाबाईंचें आत्मचरित्र सांगतें.

समर्थ रामदासही आपल्या शिष्यांशीं असे संबंध ठेवून त्यांस मार्गदर्शन करीत असत. दिनकरस्वामी नांवाचे त्यांचे एक शिष्य होते; त्यांनीं एक वर्षभर पुरश्चरण केलें व समाप्तीच्या वेळीं राम-

दासांनीं त्यांना स्वप्नांत दर्शन दिलें. स्वप्नांतून ते लगेच जागे झाले, जागेपणीं समर्थ दिसेनात म्हणून कष्टी होऊन गोंधळले; त्यांना त्यांच्या भेटीची उत्कंठा वाटली व कांहीं काळ त्यांचें मन अपक्व तुर्या नांवाच्या एका ज्ञानावस्थेंत गेलें. पुढें त्यांची समर्थभेटीची आस वाढीस लागून समर्थांची भेट होईपर्यंत मी अमुक अमुक सुखें वर्ज्य करीन असें व्रत त्यांनीं सुरू केलें आणि मग एका वर्षानंतर समर्थ त्यांस दृश्य स्थितींत प्रत्यक्ष जाऊन भेटले असें दिनकरांनीं लिहिलें आहे. या भेटींत पूर्वीच्या स्वप्नांतील अनुभवासंबंधानें दोघांचीं प्रश्नोत्तरें होऊन समर्थांकडून कांहीं प्रश्नांचा खुलासा दिनकरांना मिळाला असें ते लिहितात.[१]

या प्रकरणांत दिलेली माहिती सांगोवांगीची नाहीं. एका माणसाला अनुभव यावा, त्यानें तो दुसऱ्याला सांगावा, दुसऱ्यानें तिसऱ्याला सांगावा व शेवटीं त्यांत अतिशयोक्तीचा भाग शिरून त्या माहितीला भोळसट गप्पांचें स्वरूप यावें असें वरील उदाहरणांत झालेलें नाहीं. ज्या संतांना ते अनुभव आले ते त्यांच्याच शब्दांत या प्रकरणांत आम्ही वाचकांसमोर ठेविले आहेत. तेव्हां ते अनुभव विश्वसनीय मानले पाहिजेत हें उघड आहे.

संतांना त्यांच्या गुरूंपासून उच्च भूमिकांवरून कशा प्रकारचें मार्गदर्शन मिळे व हे संतही आपल्या शिष्यांना कोणत्या रीतीनें मार्गदर्शन करीत त्याची थोडी तरी कल्पना या प्रकरणांत दिलेल्या उदाहरणांवरून आमच्या वाचकांस येईल अशी आमची आशा आहे.

---

१ पहा स्वानुभव दिनकर कलाप १६ किरण ४.

## प्रकरण ७ वें

# अध्यात्ममार्गावरील विधि व सोहळे

अध्यात्ममार्गावरून प्रगति करीत असतांना कांहीं विधि व संस्कार करावे लागतात, पण ते प्रसिद्ध करण्यांत येत नाहींत. संतांच्या साक्षात्कारांमध्यें त्यांचा समावेश करणें अवश्य आहे. संतांच्या वाङमयांत त्या विधींचे ओझरते उल्लेख आढळून येत असतात. या प्रकरणांत त्यांची थोडीशी कल्पना आम्ही आमच्या वाचकांना करून देणार आहों.

ज्ञानेश्वरांचा पुढील अभंग पहा:[1] "अंध पंगु दृढ झालों। माया पडळ भ्रान्ती। करचरण विव्हळ गेले, तंव भेटले निवृत्ति। ज्ञान मज उपदेशिलें, नेलें अज्ञान क्षितीं। वृक्ष एक तेथें होता, त्या तळीं बसविलें रीती।" या वर्णनावरून दिसतें कीं, निवृत्तीनीं एक समारंभ घडवून आणलेला होता व त्या समारंभांत नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें ज्ञानेश्वरांना एका झाडाखालीं बसविण्यांत आलें होतें. या समारंभांत काय काय गोष्टी करण्यांत आल्या तें ज्ञानेश्वरांनीं सविस्तर सांगितलेलें नाहीं. पण 'सुटल्या जीवग्रंथीं'।'सर्व हें ब्रह्म झालें'।'दिव्य-देह अमृत कळा दशदिशा परिधान' 'निवृत्ति गुरु माझा, अंधपण फेडिलें' या त्यांच्या शब्दांवरून जाणिवेच्या एका उच्च भूमिकेचा साक्षात्कार त्यांना या समारंभाच्या वेळीं झाला असें दिसून येतें. जनार्दनस्वामींनीं लिहिलें आहे: "गिरिधर-नाथें मज। दाविली

---

१ पहा आवटे यांची ज्ञानेश्वर गाथा क्रमांक ७५०

हातोटी। वटवृक्षा तळवटीं। समाधी दिली[१] ॥" हाही तशाच प्रकारचा समारंभ असावा असें वाटतें. समारंभ नसला आणि नुसती समाधि शिकविण्याची गोष्ट असली तर ही गोष्ट वटवृक्षाच्या खालीं झाली असें मुद्दाम सांगण्याचें कारण नाहीं.

## निळी चांदणी

पुढील वर्णन पहा. त्यांत एका समारंभाचा जास्त तपशील आहे. 'गुरुनें नवल केलें ग। माझें मी पण नेलें ग॥ गुरुरूप माझ्या नयनी भरलें। ब्रह्मचि होउनि गेलें ग॥ नयन सांठवूनि नयनांत। उभें मज केलें अंगणांत। हळूच सांगे कानीं दुरुनी । बोट दाखवी गगनांत॥ निळी चांदणी लखलखली। प्रभा लोचनीं झकझकली। पहातां दृष्टि न पुरे माझी। पुढें ज्योती चकचकली॥ सुंदर सुनीळ नार ग। स्वरूप तिचें अरुवार (सुंदर) ग। मस्तकी एक फूल फुललें। तेंहि सदा गरुवार ग॥ फुलोनि फुलली पूर्ण कला। चिन्मय उगवे चंद्रकला। मुद्रा तंद्री लागुन गेली। अलक्षरूप झाला सगळा। नरहरिनाथा श्रीगुरुराया। महिपति लागे तव पाया॥ कर्ताहर्ता तूंचि स्वामी। अर्पण केली तुज काया' ॥[२] महिपतिनाथांना त्यांच्या गुरूंनीं अंगणांत उभे करून कांहीं क्रिया केल्या, त्या समारंभांत एक निळा तारा चमकला, तो सुंदर दिसत होता, महिपतिनाथांच्या मस्तकावरील सहस्रार चक्र फुलून मोठें झालें, त्यांना तंद्री लागली आणि ते जाणिवेच्या एका उच्च अवस्थेमध्यें गेले असें हें वर्णन सांगतें.

तुकाराम महाराजांनीं 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां। तो झाला सोहळा अनुपम्य। आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें। सर्वात्मकपणें भोग झाला॥' असें लिहिलें आहे.[३] याला त्यांनीं अनुपम्य सोहळा असें म्हटलें आहे. त्यावरून हा तुकारामांचा वैयक्तिक साक्षा-

---

१ पहा महाराष्ट्र सारस्वत आवृत्ति चवथी (शके १८७३) पृ. २५२ टीप.

२ पहा महाराष्ट्र सारस्वत आवृत्ति चवथी (शके १८७३) पृ. ५९१

३ तुकाराम महाराजांची गाथा (आवटे) क्रमांक २४७०

त्कार नसून एकाद्या विधींत अनुभवलेला साक्षात्कार असावा असें वाटतें. जेव्हां अनेक संतांचे साक्षात्कार जवळ जवळ ठेवून त्यांत कोणता तपशील एकसारखा आहे हें आपण बारकाईनें तपासूं तेव्हां त्यांच्या साक्षात्कारांचें आपणाला जास्त चांगलें वर्गीकरण करतां येईल. तसें करण्यास या छोटचा पुस्तकांत स्थळ नाहीं. पण कांहीं गोष्टींवरून हे साक्षात्कार वैयक्तिक रीतीनें एकांतांत अनुभवलेले नसावे, एकाद्या विधीच्या वेळीं ते प्राप्त झालेले असावे असें म्हणण्यास जागा आहे. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरांच्या उपरिनिर्दिष्ट साक्षात्कारांत 'दिव्यदेह अमृतकळा दशदिशा परिधान' असें वर्णन आहे. म्हणजे वृक्षाखालीं त्यांना बसवून जो समारंभ करण्यांत आला त्या वेळीं त्यांचा देह दिव्य झाला होता. रामदासांनीं एके ठिकाणीं जो अनुभव दिलेला आहे त्यांत 'आपलीं शरीरें पाहों गेले । तों तीं पालटून गेलीं ।'[1] असें म्हटले आहे या साम्यावरून रामदासांचा अनुभवही तसल्या विधीच्या वेळचा आहे असें अनुमान निघू शकेल.

थिऑसफीय वाङमयांत कित्येक अध्यात्मविधींचीं वर्णनें आलेलीं असून त्यांत माहितीही अधिक आहे.[2] संतांच्या वाङमयावर या माहितीनें पुष्कळ प्रकाश पडण्याजोगा आहे उदाहरणार्थ महिपतिनाथांच्या वर्णनांत एक निळा तारा चमकल्याचा उल्लेख आहे. थिऑसफीय वर्णनांतही तो उल्लेख आहे. दोन्हीही अनुभव सत्य असल्याचें गमक असल्या साम्यस्थळांत आहे हें आमचे वाचक ओळखतीलच. अध्यात्ममार्गावरील विधिसंस्कार सिद्धसंघाच्या अधिपतींच्या अनुमतीनें केले जातात. ते अधिपति एक तारा निर्माण करून आपली अनुमति व्यक्त करीत असतात. एकादा लौकिक अधिकारी सही करून अथवा आपल्या हुद्द्याचा छाप मारून जशी आपली अनुमति प्रकट करतो तद्वत् योगसामर्थ्यानें अंतराळांत तारा प्रकट करून आपला होकार व्यक्त करण्याचो त्या अधिपतींची प्रथा आहे असें

---

१ जुना दासबोध समास १६ ओवी १९. २ लेडबीटरकृत The Masters & the Path (आवृत्ति दुसरी पृ.२५५ व ३०७) हा ग्रंथ पहा.

समजतें.[1] अध्यात्ममार्गावर अनेक विधिसंस्कार आहेत; ते निरनिराळ्या आध्यात्मिक पायऱ्यांचे दर्शक असतात. जो मनुष्य उत्क्रान्तिमार्गांत विशिष्ट पायरीपाशी आला असेल त्याला ठराविक विधीच्या द्वारानें पुढें नेण्यांत येतें; त्या विधीमध्यें त्याची जाणीव अधिक खोल व व्यापक होते; त्या प्रसंगीं त्या माणसाला विशिष्ट आध्यात्मिक अधिकार देण्यांत आल्यामुळें तो ईश्वरी योजनेला अधिक साहाय्य करतो; वगैरे सविस्तर माहिती जिज्ञासूला थिऑसफीय वाङ्मयांत दिलेली आढळेल. संतवाङ्मयाचा व थिऑसफीचा जास्त बारकाईनें अभ्यास केल्यास संतांच्या साक्षात्काराचा आपणांला नीट अन्वयार्थ लावतां येईल हें वरील विवेचनावरून दिसून येईल. कारण खरे अनुभव सर्वत्र एकच असावयाचे हें निश्चित आहे.

### भेटली मुक्ताबाई गोरोबाला

अध्यात्म प्रगतीसाठीं गुरुशिष्यांच्या ज्या गांठी भेटी होत असतात त्यांपैकीं एका भेटीचें वर्णन ज्ञानेश्वरांनी केलें आहे. त्यांतील ‘ भेटली मुक्ताबाई गोरोबाला ’ या शब्दांवरून मुक्ताबाई व गोरोबा कुंभार या गुरुशिष्यांच्या भेटीचें तें वर्णन आहे याबद्दल कोणालाही शंका वाटण्याचें कारण नाहीं. ज्ञानेश्वर या भेटीचें वर्णन सांगतात तें असें : मोतीयांचा चुरा फेंकला अंबरीं । विजुचीया परी कीळ (तेज) झालें ॥ १ ॥ जरी पीतांबरें नेसविलीं नभा । चैतन्याचा गाभा नील बिंदु ॥ २ ॥ तळी परी पसरे शून्याकार झालें । सर्पाचीहीं पिलें नांचू लागे ॥ ३ ॥ कडकडोनि वीज निमाली ठायींचे ठायी । भेटली मुक्ताबाई गोरोबाला ॥ ४ ॥ ज्ञानदेव म्हणे कैसी झाली भेट । ओळखिलें अविट आपुलेंपण ॥ ५ ॥ या भेटींत गोराबांना स्वतःच्या खऱ्या स्वरूपाची ओळख पटली.

---

१ पहा लेडबीटर कृत The Masters & the Path आवृत्ति २ पृ. २५५ व ३०७

अदृश्य सृष्टींतील एका मनोहर दृश्याचें या भेटींत वर्णन आहे हें आपण लक्षांत ठेवलें नाहीं तर तें वर्णन आपणांला मूर्खपणाचें वाटल्याखेरीज रहाणार नाहीं. आकाशांत मोत्यांचा चुरा उधळला होता, विजेसारखें तेज पसरलें होतें, आकाशाला जरीचे पितांबर नेसविल्यासारखें दिसत होतें, निळ्या रंगाचा चैतन्यबिंदु तळपत होता, सापाचीं पिलें नाचत असल्याचा भास होत होता, तेज चक्राकार पसरून त्यानें वाटोळा आकार धारण केला होता, व कडकडणाऱ्या विजेनें जागच्या जागीं स्थिर स्वरूप धारण केलें होतें असें या गांठीभेटींचें वर्णन आहे. नुसत्या भाषेच्या दृष्टीनें त्याचा अर्थ केल्यास ज्ञानेश्वरांच्या पदरीं वेडेपणा बांधावा लागेल. अध्यात्ममार्गावर बरीच प्रगति झालेला जो गुरु असतो त्याच्या दृश देहाभोवतीं सूक्ष्मदेहाचे भलें मोठें वर्तुळाकार आवरण असतें. त्यांत नानारंगांच्या सुंदर लकेरी एकसारख्या झळकत असतात. शिष्याच्या सूक्ष्मदेहाचें जें वर्तुळाकार आवरण असतें तें गुरुच्या मानानें लहान व तेजस्वितेंत कमी असलें तरी तेंही चकाकत असतें. हीं दोन माणसें एकमेकांजवळ आलीं कीं ज्याला सूक्ष्म दृष्टि असेल त्याला प्रकाशाचे हे दोन गोळे परस्परांत मिसळल्याची अवर्णनीय शोभा दिसते. अध्यात्म विषयाची माहिती असल्याशिवाय अध्यात्मग्रंथाचा अर्थ नीटपणें लावतां येण्याचा कसा संभव नाहीं तें या उदाहरणावरून उघड होईल.

असल्या प्रसंगांत गुरूच्या सूक्ष्मदेहांतील द्रव्याचे स्पंद शिष्याच्या सूक्ष्मदेहावर परिणाम करून त्याची संस्कारक्षमता वाढवितात आणि शिष्याच्या मनाला जाणीवेच्या वरच्या पायऱ्या चढण्याच्या कामीं साहाय्य करतात.[1]

माणूस जेव्हां नेहेमींच्या मनःस्थितींत असतो तेव्हां तो द्वैताच्या

---

१ अध्यात्ममार्गावरून ज्याची बरीच प्रगति झालेली असेल अशा माणसाच्या कारण देहाचा गोळा कसा दिसतो त्याची चित्रें The Man Visible and Invisible या लेडबीटरकृत पुस्तकांत दिलेली आहेत.

साम्राज्यांत असतो. तो माणूस स्वत:ला 'मी' म्हणतो. तो जेव्हां एकाद्या वस्तूकडे (उदाहरणार्थ) झाडाकडे पहातो तेव्हां तो 'द्रष्टा' अथवा पहाणारा असतो. त्याची पहाण्याची वस्तु जें झाड तें 'दृश्य' होय. हें झाड, हें 'दृश्य' मी नव्हे, हें त्याचें मन त्याला सांगतें. माणसांच्या सर्व व्यवहारांत द्रष्टा व दृश्य असे दोन वेगळे जिन्नस सदैव असल्यामुळें तो द्वैताच्या साम्राज्यांत असतो असें म्हटलें पाहिजे. पण माणसाच्या मनाची अशी एक उच्च अवस्था आहे कीं त्या अवस्थेंत द्वैत मावळतें. त्या अवस्थेंत जेव्हां तो झाडाकडे पहातो तेव्हां झाड हें वेगळी जिन्नस आहे असा त्याला अनुभव येत नाहीं. तर तो 'मी'चाच एक भाग आहे असा त्याला प्रत्यय येतो. झाडावर कोणी घाव घातला तर नेहेमींच्या स्थितींत असतांना हा घाव त्याला दुरून दिसेल. पण या अवस्थेंत गेल्यावर झाडावरचा घाव हा आपल्या स्वत:वर पडलेला घाव आहे असा त्याला अनुभव येतो. ही त्याची कवि-कल्पना नसते, तर तसा त्याला साक्षात् अनुभव येतो. त्याच्या हृदयमनांत घावाचा मार त्याला लागतो व प्रत्यक्ष जाणवतो. दोन माणसें दूर अंतरांवर असली आणि एकाला टांचणी टोचल्याबरोबर जर ती दुसऱ्याला बोंचली, एकानें खाल्लेल्या जिलबीनें जर दुसऱ्याचें तोंड गोड झालें, एकानें घेतलेला अनुभव जर आपोआप तात्काळ दुसऱ्याला प्राप्त झाला, तर आपण दोघे वेगळे नाहीं, आपण एक आहों हें त्याला समजून येईल. जीवनांत अशी एक उच्च अवस्था आहे कीं त्या अवस्थेंत हें ऐक्य माणसाच्या अनुभवास येण्याला सुरवात होते आणि त्याच्याहून उच्चतर अवस्थांत हें ऐक्य अधिकाधिक घनदाट, समरस व प्रभावी होत जातें. ही ऐक्य-स्थितीच काय ती खरी आहे असें हिंदुधर्माचें सांगणें आहे. द्वैत हें मूलत: खरें नाहीं, तो आभास आहे, माणासाला कांहीं धडे शिकविण्यासाठीं सृष्टि त्याच्या उत्क्रांतिपथावर त्या आभासाचा साधन म्हणून उपयोग करते, अशी हिंदुधर्माची शिकवण असल्यामुळें या

ऐक्याची सत्यता माणसाला अध्यात्ममार्गावर पटवून देणें अगदीं जरूर असतें. ती अनुभवास येईल तेव्हांच जीवनांतील सर्व प्रश्नांकडे बघण्याचा माणसाचा दृष्टिकोण बदलून त्याची सारीं मूल्यें निराळीं होतील. माणसाला असलेल्या अनेक अदृश्य देहांपैकी एक देह असा आहे की जो त्या ऐक्याला दृष्टिआड करून व त्या ऐक्यावर पांघरूण घालून त्याला द्वैताच्या साम्राज्यांत आणून सोडतो. माणसाला ह्या ऐक्याचा अनुभव देण्यासाठीं हा देह विस्कटून टाकणें जरूर असतें. तो विस्कटून नाश पावला कीं त्याला ह्या ऐक्याचा अनुभव येतो. या देहास बऱ्याच संतांनीं 'लिंग देह' या नांवानें संबोधलेलें आहे. मुकुंदराज त्याला कारणशरीर म्हणतात. थिऑसफीय वाङमयांतही कारणशरीर हेंच नांव असून थिऑसफीय इंग्रजी सज्ञा Causal Body अशी आहे.

**कारणदेहाचा नाश**

या साक्षात्काराचे उल्लेख सतांच्या वाङमयांत काही स्थळीं आढळतात. लिंग देहभग जव झाला नाही। तोवरि बा पाहीं मुक्ति कैंची।[1] असें ज्ञानेश्वरांनी एके ठिकाणीं म्हटलें आहे. गुरु सोडवी तात्काळ। गांठ लिग देहाची। असेंही ते म्हणतात.[2] स्वैरवर्तनी स्त्रीची उपमा घेऊन 'कर्मेवीण सौरी झाले। आले संतापाशी। ज्ञानडौर (डमरु) घेउनि करी। लिंग देह नाशी ॥[3] असेही उद्गार त्यांनी काढले आहेत. म्हणजे वाईट कर्म न करतां मी स्वैरिणी झालें, मग संतापाशी आलें, व त्या वेळी सतांनीं ज्ञानरूपी डमरु घेऊन माझ्या लिंगदेहाचा नाश केला. ज्ञानेश्वरांनीं गुरूला अनुलक्षून पुढील उपमा दिलेली आहे : लिग-देह कमळाचा। पोटि वेंचु (मरण) तया चिद्भ्रमराचा। बंदिमोक्षु जयाचा उदैला होय।[4]

---

१ ज्ञानेश्वर गाथा आवटे क्रमाक ९६१.

२ ज्ञानेश्वर गाथा (आवटे) क्रमांक ४७४

३ ज्ञानेश्वर गाथा आवटे क्रमांक ७००.

४ ज्ञानेश्वरी १६, ४

म्हणजे लिंग देहरूपी (मिटलेल्या) कमळाच्या पोटांत चित्भ्रमर अडकून मरत असतांना गुरूच्या उदयानें तो बंदिखान्यांतून मुक्त होतो. मुकुंदराजांनीं आपल्या परमामृतांत 'नेणिवेच्या निरासें । कारण-शरीर नासे । म्हणजे कारणशरीर नाश पावतें असें सांगितलें आहे.[१] समर्थांनीं उच्च दर्जाच्या पुरुषाचें 'लिंगदेहासि विभांडलें' असें वर्णन केलें आहे.[२] विभांडणें म्हणजे फोडणें, छेदणें; म्हणजे असल्या पुरुषाचा लिंगदेह फोडून टाकलेला असतो. या क्रियेचा अनुभव संतांना होता असें 'लिंगदेह विरविरलें। जनी म्हणे या विठ्ठलें। या शब्दां-वरून[३] दिसतें. या अनुभवानंतर जनाबाईची काय स्थिति झाली तिचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. जनाबाई म्हणते: "ऐसी विश्राति लाधली । आनंद कळा संचरली । तेथें सर्वांग सुखी झालें । लिंगदेह विसरलें । त्या एकी एक होता । दासी जनी नाही आतां ।" जनाबाईचें वैय-क्तिक मीपण नष्ट झालें व मी-तूपणाच्या द्वंद्वांतून ती ऐक्यांत प्रविष्ट झाली असा तिच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.[४]

---

१ परमामृत ११, १५; २ दासबोध ५,९,४३. ३ जनाबाई गाथा आवटे क्रमाक २८ व १८६. ४ कारणशरीर विस्कटून गेल्यावर कारणशरीराचें कार्य कसें होऊं शकते या प्रश्नाची चर्चा करण्यास येथे स्थळ नाही. जिज्ञासूनी ती थिऑसफीय वाङमयात पहावी. या अनुभवा-संबधानें थिऑसफिकल सोसायटीचे माजी अध्यक्ष सी. जिनराजदास आपल्या First Principles of Theosophy (आवृत्ति पाचवी पृ. ३३९) नामक ग्रथांत म्हणतात " With his first Buddhic experience, the Initiate knows, not merely believes on faith, the unity of all that lives;......thenceforth, his standard of all things is changed कारणदेह विस्कटते वेळी माणसाला काय वाटते व काय होते याचें अनुभवात्मक वर्णन थिऑसॉफिकल सोसायटीचे दुसरे माजी अध्यक्ष डॉ. ॲरंडेल यांनी जुलै १९३६ थिऑसॉफिस्ट मासिकाच्या अंकातील Oh Death, Where is thy Sting या लेखामध्ये पृ. २९९ वर दिलेलें आहे.

नामदेवांचा लिंगदेह त्यांचे गुरु विसोबा खेचर यांनीं विस्कटून नष्ट केला होता. त्याचें वर्णन नामदेवांनीं स्वत: केलें आहे तें असें[1] "खेचरें खेचरी । बुद्धि अगोचरी । नामा झडकरी देवो केला ।। गुरु-शिष्य झाले । एक तत्त्व देखिलें । देहीं देह निमाले नीज तत्त्वी ।। अहं सोहंभाव । हारपल्या श्रुति । नामयाची तृप्ति । खेचरी झाली ।। तव पाहें भोवतें । तव लिंग नाहीं तेथें । आतां चरण हे केउते । कोठें ठेऊ ।। आप-आपणचि । हे सृष्टि शिवाची । मग म्हणे वायांची । बोलिलों यासी ।। " अध्यात्मविषयाच्या अज्ञानामुळें या वर्णनाचा सध्यां भलता अर्थ करण्यांत येतो. त्याचा खरा अर्थ पुढीलप्रमाणें आहे : विसोबा खेचरांनी खेचर स्थितीत (अंतराळांत प्रवास करण्याच्या सूक्ष्म लोकांतील स्थितीत ) बुद्धीला अगोचर असणाऱ्या क्रियेनें नामदेवाला चटकन् देवत्व आणून दिलें. आम्ही दोन्ही गुरुशिष्य झालों, आम्ही सर्व सृष्टीत एकच तत्त्व आहे हें पाहिलें, आणि माझा देह विसोबा खेचरांच्या देहांत बुडाला आणि दोघांचे देहही त्या निजतत्त्वांत बुडाले; अहंच्या भावनेनें म्हणजे मी वेगळा आहें ह्या भावनेनें मी तो ईश्वर आहे या भावनेचें स्वरूप घेतलें, वेदांतलें शब्दज्ञान मावळून विसोबा खेचराच्या अंतरंगांत नामदेवाला समाधान मिळाले. मग त्या स्थितींतून मी जेव्हां सभोंवतीं पाहिले तेव्हां माझा लिंगदेह पूर्वीप्रमाणें तेथें नाहीं असें दिसून आलें. आतां अशा स्थितींत माझे चरण मी कोठें ठेवूं, आणि परत नेहमीच्या अवस्थेत कसा जाऊं असा प्रश्न मी विचारला. आपण व ही शिवाची सृष्टि एक आहे हें नंतर समजून आल्यावर हा प्रश्न मी उगीच विचारला असें मला वाटलें. हा अनुभव हल्लींच्या काळीही कांहींना आलेला आहे. त्यापैकीं एकानें या प्रसंगांतील अनुभूति पुढील शब्दांत ग्रथित केली आहे. "But this causal body instead of remaining, vanishes. When the pupil from his Buddhic vehicle looks down

१ पहा महाराष्ट्र सारस्वत आवृत्ति ४ पृ. १७० व मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ पृ. ५९१

on the higher mental plane, no causal body is there any longer to represent him हें वर्णन[१] व मी जेव्हां सभोंवतीं पाहिलें तेव्हां माझा लिंगदेह पूर्वीप्रमाणें तेथें नाही असें दिसून आलें हें नामदेवाचें वर्णन हीं इतकीं परस्परसदृश आहेत कीं तीं एकाच अनुभवावर आधारलेलीं असली पाहिजेत हें उघड आहे.

नामदेवांसंबंधानें एक आख्यायिका प्रचलित आहे ती अशी : मुक्ताबाईच्या सांगण्यावरून ते जेव्हां गुरु करण्याकरितां विसोबा खेचरांकडे गेले तेव्हां विसोबा शंकराच्या देवळांत शिवलिंगावर पाय ठेवून पहुडले होते. या पापाचरणाबद्दल विस्मय वाटून नामदेवांनीं विसोबांना प्रश्न केला. तेव्हां विसोबा त्याला म्हणाले, "नामदेवा, माझे पाय उचलून जेथें पिंडी नाहीं अशा जागीं ठेव." त्याप्रमाणें नामदेव करूं लागले असतां जेथें जेथें त्यांनी विसोबाचे पाय ठेवावे तेथें तेथें पायांखालीं पिंडी निर्माण होई; असा चमत्कार घडूं लागला, आणि या चमत्कारापासून ईश्वर सर्वत्र आहे असा नामदेवांना धडा मिळाला. ही आख्यायिका खरी असेल किंवा नसेल. कदाचित् वरील वर्णनाचा खरा अर्थ न समजल्यामुळें ती अज्ञानतः निर्माण झालेली असेल. कदाचित् हें वर्णन करतांना त्याचे दोन अर्थ व्हावे असा नामदेवांचा हेतु असेल. एक अर्थ सामान्य जनांना ईश्वराचें सर्वव्यापित्व शिकविण्याकरतां असेल व त्याला धरून वरील आख्यायिका प्रचलित झाली असेल व दुसरा अर्थ अधिकारी माणसांना लिंगदेह विस्कटून टाकण्याची गोष्ट सांगण्याकरितां असेल. पण तें कसेंही असलें तरी वरील वर्णनांतील 'लिंग' शब्दाचा खोल अर्थ शिवलिंग नसून लिंगदेह असा आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. तसा अर्थ न घेतला तर देही देह निमाले, म्हणजे नष्ट झाले हें म्हणणें निरर्थक होतें. तसेंच 'खेंचरें खेचरी' नामा झडकरीं देवो केला, म्हणजे विसोबा खेचरांनीं खेचर स्थितींत नामदेवाला देवत्व प्राप्त करून दिलें हें म्हणणेंही निरर्थक होतें.

---

१ जिनराजदासकृत *First Principles of Theosophy* आवृत्ति ५ पृ. ३३८.

सारस्वतकार श्री. भावे यांनीं वरील दंतकथेंतील हकीकतीपेक्षां नामदेवांच्या अभंगांत थोडी निराळी हकीकत दिली आहे असें जे म्हटलें आहे[१] त्यावरून त्यांनाही प्रचलित अर्थाचा संशय वाटत होता असें दिसतें. विहंगममार्गावरचे साक्षात्कार संत सविस्तरपणें प्रकट करीत नाहीत व अध्यात्मशास्त्राविषयीं अनभिज्ञ असणारे भाषापंडित व भोळी जनता हीं त्या संतवाङ्मयाचा अर्थ लावू पहातात यामुळें असल्या अडचणी निर्माण होत असतात.

**ऋषिसंघाच्या योजना**

सृष्टीच्या पाठीशीं प्रचंड अशी एक ईश्वरी विकास-योजना आहे. या योजनेचा कांहीं भाग ईश्वराशी एकरूप झालेल्या व आज पृथ्वीवर विद्यमान असलेल्या जीवन्मुक्त पुरुषांच्या (ऋषिसंघाच्या) हातीं असतो. मानवी उत्क्रान्ति साधणे हें या योजनेचें एक अंग असतें. मानवांची उत्क्रांति होत जावी म्हणून जगांत निरनिराळे धर्म स्थापणे, विद्यमान धर्मांत नवचैतन्य ओतणें व त्यांत जरूर त्या सुधारणा करणें, राष्ट्रांचे उदयास्त करणें, निरनिराळ्या देशांत नाना संस्कृतींचें बीजारोपण करणें वगैरे अनेक लहानमोठ्या गोष्टी या योजनेच्या पोटांत असतात. हे जीवन्मुक्त पुरुष आपल्या योजनेपैकी कांहीं भाग कधीं कधीं आपल्या शिष्यांना समजावून देऊन त्यांच्या करवीं तडीस नेत असतात. महाराष्ट्रांत अशी एक योजना ऋषिसंघानें आंखली असून तिचें काम महाराष्ट्र संतांच्या हवालीं केलेलें होतें असें दिसतें. संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥१॥ ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ॥२॥ नामा तयाचा किंकर । तेणें रचिलें तें आवार ॥ ३ ॥ जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ॥४॥ तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥५॥ या शब्दांनीं बहिणाबाईनीं ती संक्षेपत: निर्देशिलेली आहे. संत कृपा झाली । इमारत फळा आली ॥ या

१ पहा महाराष्ट्र सारस्वत आवृत्ति चवथी पृ. १७०

बहिणाबाईंच्या शब्दांकडे आपण पुरेसें लक्ष दिल्यास ही एक अगोदर आंखलेली ऋषिसंघाची योजना होती हें ध्वनित करण्याचा बहिणाबाईचा हेतु आहे हें आमच्या वाचकांस समजून येईल. आपण रंगभूमीवर एकादें नाटक पाहिलें तर त्या नाटकाच्या पाठीशीं नाटककाराचें सविधानक असतें. त्या नाटकाचे अनेक अंक असतात व प्रत्येक अंकांत अनेक प्रवेश असतात. नट कार्यकुशल असले म्हणजे नाटककाराचें मनोगत उत्कृष्ट रीतीनें प्रकट होईल अशा प्रकारचा रंगभूमीवर अभिनय करतात. ऋषिसंघानें आपल्या योजनेपैकीं एक भाग ज्ञानदेव व त्यांचीं तीन भावडें आणि नामदेव यांचे हवालीं केला होता असें इतिहासावरून वाटतें. नामदेव व ज्ञानदेव हे अगोदर एका गोटांत नव्हते. ज्ञानदेव नाथपथी होते. त्या वेळीं पंढरपूरचें विठोबाचें देऊळ अस्तित्वांत होतें, पण प्रसिद्ध नव्हतें. नामदेव त्या विठोबाचे भक्त होते. पुढें त्या दोघांच्या गांठीभेटी होऊन त्यांनी एका धर्मसुधारणेच्या चळवळीचा पाया घातला. धर्मातील कर्मकांडाचें महत्त्व कमी करावें, जातीजातीतील भेदभाव दूर व्हावे, ईश्वरभक्ति व माणसांमाणसांमधील प्रेम-भावना यांवर जोर देण्यांत यावा, कर्मकांडाच्या नियमांतील कठोर-पणा मोडून, निष्ठुर चालीरीतींना पायबंद घालून व माणसाच्या वर्तनांतील दांभिकपणा काढून टाकून धर्मसुधारणा करावी, स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीला आणावें व समाजांतील खालच्या थरांना वर ओढावें वगैरे अनेक हेतु या नवीन चळवळीच्या बुडाशीं होते. जुन्या पंढरपूरच्या देवालयास या नवीन चळवळीच्या मूर्धस्थानीं ज्ञानेश्वर-नामदेवांनी बसविलें व या चळवळीचे प्रवाह सर्व महा-राष्ट्रभर त्यांनी कित्येक शतकें वाहविले. दोन दोन वर्षांच्या अंत-रानें ज्ञानेश्वर व त्यांचीं लोकोत्तर भावंडें जन्मास यावी, वयानें बरोबरीचा भक्तशिरोमणि नामदेवही जवळच त्यांना भेटावा, व या नव्या चळवळीची प्राणप्रतिष्ठा होऊन ती नीट चालेल इतकी सिद्धता झाल्यावर चारी भावंडांनीं एकामागून एक इहलोक सोडून ती चळवळ नामदेवांच्या हातांत द्यावी व ती नामदेवांनीं पुढें

चालवावी, ज्ञानेश्वरानंतर नामदेवांनीं स्वतःच्या जीवनयात्रेंत चौपन्न वर्षे घालवून तिचें संवर्धन करावें, व मध्यें खंड न पडतां निरनिराळे संत महाराष्ट्रांत एकसारखे जन्मास येऊन व तींत ओढले जाऊन ती चळवळ कित्येक शतकें त्यांच्या द्वारानें परिपुष्ट केली जावी या गोष्टींवरून संतांच्या कार्याच्या पाठीमागें एक संविधानक असावें असें मानण्यास जागा आहे. नामदेवांनीं एकट्या महाराष्ट्रांतच ही भक्तीची चळवळ केली असें नाहीं. ते पुढें पंजाबांत गेले, तेथें वीस वर्षे राहून त्यांनीं तेथील भूमि भक्तीच्या ओलाव्यानें भुसभुशीत केली व त्या भूमींत नानकां-सारख्यांना पुढें धर्मकार्याचा वेल लावून तो मांडवावर चढवितां आला. राजाच्या अंमलाखालीं एकादा नवीन प्रान्त आला असला, तर तेथील राज्यव्यवस्था सुधारण्यासाठी जसा त्या राजानें एकादा हुशार व अनुभवी अंमलदार त्या प्रांतावर पाठवावा तशी ही नामदेवांची रवानगी झालेली दिसते. बंगालमधील बाबाजी चैतन्यांनी महा-राष्ट्रांतील तुकाराम महाराजांना दृष्टान्त देऊन त्यांचा शिष्य म्हणून अंगीकार केलेला होता हें आमच्या वाचकांस विदित आहेच. एका मोठ्या योजनेचे हे धागेदोरे दिसतात.

ज्ञानेश्वरांबद्दल सर्वांसमोर एक कूट प्रश्न उभा राहिलेला आहे. ज्ञानेश्वरांच्या अभंगांत सारखा विठोबाच्या नांवाचा गजर आहे; पण सबंध ज्ञानेश्वरीत विठ्ठलाचा एकदांही उल्लेख नाही. ज्ञाने-श्वरीत गणपति, शिव, विष्णु वगैरेंचे पुष्कळ उल्लेख आहेत व त्यांना ज्ञानेश्वरांनीं अनेक ठिकाणीं स्तुतिपूर्वक नमनही केलेलें आहे. मग गाथेंत हरघडी सांपडणाऱ्या विठोबाचा ज्ञानेश्वरीत बिलकुल मागमूस कां नसावा? हें गौडबंगाल विद्वानांना न उलगडल्यामुळें ज्ञानेश्वर दोन असले पाहिजेत असा कांहींनी अजमास केला आहे. महाराष्ट्रीय संत ऋषिसघांतील जीवन्मुक्त पुरुषांचे शिष्य असून त्यांच्या योजनेनुसार ह्या सतांवर निरनिराळ्या कामाच्या जबाबदाऱ्या टाकण्यांत येत होत्या, ही गोष्ट मान्य केल्यास वरील कूट प्रश्नाचें उत्तर सहज सांपडण्याजोगें आहे. ज्ञानेश्वर

मूलतः नाथसंप्रदायांतले होते. आरंभीं त्यांनीं ज्ञानेश्वरी ( व अमृतानुभव) लिहिलीं. त्या काळीं विठ्ठल हें दैवत हिंदुधर्मांत प्रसिद्ध नसल्यामुळें त्याचा ज्ञानेश्वरींत उल्लेख येण्याचें कारण नव्हतें. ज्ञानेश्वरी पुरी होईपर्यंत पंढरपूरच्या नवीन चळवळीची जबाबदारी पुढें आपणांवर येणार आहे याची ज्ञानेश्वरांना कल्पना नसावी. ऋषिसंघांतील अधिकारी पुरुषांनीं ही नवीन चळवळ काढण्याचें व पंढरपूरच्या विठोबाला तिच्या केंद्रस्थानीं ठेवण्याचें काम ज्ञानेश्वरांना नंतर नेमून दिलें असावें. तेव्हां या चळवळी-करितां सर्वसामान्य जनतेला समजेल व आवडेल अशी अभंगरचना ज्ञानोबांनीं नंतर केली. अर्थात् ती चळवळ लोकप्रिय व्हावी म्हणून ज्ञानेश्वरांनीं आपल्या अभंगांत विठोबाला सर्वत्र अग्रपूजेचा मान दिला. सर्व देव मुळांत एकच आहेत हें ज्ञानेश्वर जाणत होते. तेव्हां जरी त्यांनीं ज्ञानेश्वरींत गणपति, शिव वगैरे देवांना स्तुतिसुमनें वाहिली असलीं तरी या नवीन चळवळीत विठोबाला महत्त्व देण्याबाबत त्यांना कोठलीच आडकाठी वाटली नाही. या कारणामुळें ज्ञानेश्वरींत नसलेला विठोबा अभंगांत पदोपदी आलेला आहे, असें या कूट प्रश्नाला आमचें उत्तर आहे.[१]

## समर्थांचें आनंदवनभुवन

समर्थांच्या आनंदवनभुवन नामक एका प्रकरणांत एका राज-कीय योजनेचा उल्लेख आहे. तेव्हां त्या प्रकरणाची येथें माहिती देणें अवश्य आहे. असें दिसतें कीं, ही योजना समर्थांना दाखविण्यांत आली होती व तिच्यासंबंधाचें कांहीं काम समर्थांवर सोपविण्यांत

---

१ ज्ञानेश्वरांनी आपल्या गाथेंत 'ज्ञानदेवें भाष्य केलें । गीता ज्ञान विस्तारिलें । भक्ती भाग्यवंतीं घेतलें । भाष्यें करुनी गीतेच्या ।।' असा उल्लेख केलेला आहे. त्यावरून ज्ञानेश्वरीकार ज्ञानेश्वर व अभंगकार ज्ञानेश्वर हे एकच होत, तसेंच ज्ञानेश्वरीनंतर ज्ञानेश्वरांनीं अभंग रचले, या गोष्टी दिसून येतात (पहा ज्ञानेश्वर गाथा. आवटे क्रमाक ४७८). २ दत्तसप्रदायातले एकनाथही वरील एकत्वबुद्धीनेंच पंढरपूरच्या विठोबाच्या चळवळीचे पुढें धुरीण झाले.

आलेलें होतें. ऋषिसंघांतले अधिकारी पुरुष आपल्या शिष्याला मनाच्या एका उच्च स्थितींत (स्वप्नाच्या भूमिकेवर) कधीं कधीं नेऊन त्याला तेथें आपल्या योजना समजावून देतात व त्या यशस्वी करण्याचें काम त्याच्यावर सोंपवितात. रामदासांनी एके ठिकाणीं 'स्वप्नीं देखिलें । तें साचचि झालें'।[१] असें म्हटलें आहे. त्यावरून त्यांना स्वप्नांत कांहीं दृश्ये दिसत असत व पुढें ती खरी ठरत असें दिसतें. आनंदवनभुवन प्रकरण कोणा-करितां लिहिलें होतें त्याची माहिती उपलब्ध नाही. पण त्यांत प्रत्यक्ष चालली, राया । (४२)[२] या चरणांत जो 'राया' शब्द आहे त्यावरून तें प्रकरण समर्थांनीं शिवाजीमहाराजांस मार्ग दाखविण्या-साठीं लिहिलें होतें असें वाटतें. तो काळ धामधुमीचा होता. राम-दासांचें व शिवाजीमहाराजांचें जीवित त्या काळीं सुरक्षित नव्हतें. रामदासांनीं शिवाजीमहाराजांना एकादी गोष्ट गुप्त रीतीनें कळ-विली तरी ती गोष्ट भलत्याच्या हाती पडून शत्रूला कळण्याचा संभव होता, आणि म्हणूनच हें आनंदवनभुवन प्रकरण समर्थांनी अशा रीतीनें मुद्दाम लिहिलें आहे की, त्याचा खोल व खरा अर्थ भलत्याला समजू नये. या प्रकरणांत साक्षात्कार आहे, तें नुसतें भावगीत नाहीं हें 'स्वप्नी जें देखिलें रात्री । तें तें तैसेचि होतसे ।' (७) व 'आपस्तुतीच मांडली । ऐसें हे बोलणें नाहीं ।' या शब्दां-वरून दिसून येतें. 'स्मरलें लिहिलें आहे' (५७) म्हणजे सम-र्थांनी जागे झाल्यावर स्मरण करून हा साक्षात्कार लिहिला. 'हे साक्ष देखली दृष्टि' (८) व 'संदेह तुटला मोठा' (४५), तसेंच 'मनासी प्रचीत आली । शब्दीं विश्वास वाटला ।' (५३), या वर्णनावरून समर्थांस कांहीं दाखविण्यांत आलें, कांहीं सांगण्यांत आलें व त्यांना तें पटले व खरे वाटलें असें म्हणावें लागतें. 'वेद तो मंद जाणावा । सिद्ध आनंदवनभूवनीं । (५५) असें समर्थ

१ पहा पागारकरकृत समर्थग्रंथभांडार उत्तरार्ध पृ. ५९२, पदसंग्रह पद ९३; २ हे व पुढील आंकडे या प्रकरणातील ओंव्यांचे आहेत. पुढें पृ. १२१ पहा.

म्हणतात. म्हणजे आनंदवनभुवनांत असणाऱ्या सिद्धांपासून जें ज्ञान त्यांना या साक्षात्काराच्या वेळीं मिळालें त्याची सत्यता त्यांना इतकी पटली कीं, त्या सत्यतेपुढें साक्षात् वेदही फिक्के पडतील. ही समर्थांनीं पाहिलेली योजना नुस्ती शब्दांनीं ऐकण्यांत अर्थ नाहीं. तदनुसार कार्य करून ती अमलांत आणली पाहिजे असें समर्थांस वाटत होतें व तो विचार त्यांनीं 'बोलणें वाउगें होतें । चालणें पाहिजे बरें। (५६) या शब्दांनीं प्रकट केलेला आहे.

या आनंदवनभुवन प्रकरणांतील कांहीं स्थळें द्व्यर्थी आहेत. वरवर विचार करणाऱ्या माणसाला एक अर्थ समजला म्हणजे सर्व अभिप्राय आपल्या ध्यानांत आला असें त्यास वाटतें व तो दुसऱ्या अर्थाची पंचाईत करीनासा होतो. तसें होऊन त्यानें दुसरा अर्थ शोधू नये म्हणून हीं स्थळें मुद्दाम द्व्यर्थी ठेविलेलीं आहेत. आनंदवनभुवन या शब्दाचा अर्थ काय ? या शब्दाचा अर्थ 'महाराष्ट्र' असा कांही लोक लावतात. आनंदभुवन म्हणजे 'काशी' असें कांहीचें म्हणणें आहे. उत्तान अर्थ कोणताही असला तरी मनाची एक उच्च अवस्था असा त्या शब्दाचा दुसराही अर्थ समर्थांस अभिप्रेत आहे. माणसानें एकटें आनंदवनभुवनास गेलें पाहिजे (एकाकी एकदां जावें । आनंदवनभूवना । ५). मला देवानें साधन देऊन आनंदवनभुवनास पाठविलें होतें (उपाये धाडिलें देवें। आनंदवनभूवना । ६). रामावर चित्त वेधल्यावर आनंदभुवनास जातां येतें (वेधिलें चित्त जाणावें । राम वेधीं निरंतरी । २) वगैरे वर्णनावरून आनंदवनभुवनांत जाणें म्हणजे जेथं साक्षात्कार होतात अशा उच्च स्थितींत जाणें होय, हें वाचकास समजून येईल.[१]

---

१ आनंदवनभुवन हा शब्द आनंदभुवन या शब्दाला अगदीं जवळ आहे. रामदासांनीं आपल्या एका पदांत 'प्राणापान ऊर्ध्वचि वहातां । आनदभुवनीं

(टीप पुढील पानावर चालू)

या प्रकरणांतील समर्थांच्या लिहिण्याचा सारांश असा आहे कीं, 'मी आनंदवनभुवनास गेलों होतों त्या वेळीं स्वप्नांत रात्री मी जें पाहिलें तें तसेंच प्रत्यक्ष घडत आहे, आनंदवनभुवनास गेल्यावर मला तेथें परस्परांशी युद्ध करणाऱ्या दोन फौजा आढळल्या. त्यांचें बराच काळ तुंबळ युद्ध झालें, त्या वेळीं 'देवानें आपल्या भक्तांचा कैपक्ष घेऊन औरंगजेबाचा पाडाव केला. रामवरदायिनी माता आजही भक्तांचें रक्षण करीत आहे असें दृश्य मी पाहिलें.' त्या आणीबाणीच्या काळांत मनाचा घोटाळा न होतां रामदासांना योग्य तें धोरण स्वीकारतां येऊन शिवाजी महाराजांना नीट मार्गदर्शन करतां यावें यासाठीं ही योजना समर्थांना अगोदर दाखविण्यांत आली होती असें या आनंदवनभुवन प्रकरणावरून दिसून येतें. समर्थ दिवंगत झाल्यावर औरंगजेब एकोणतीस वर्षांनीं मृत्यु पावला व त्यामुळें दक्षिणेंत त्याच्या पक्षाचा पाडाव झाला असें इतिहास सांगतो. येवढ्या कालावधीनंतर घडणारी गोष्ट समर्थांस मुद्दाम अगोदर दाखविण्यांत आली होती हें आनंदवनभुवन प्रकरणावरून दिसून येतें.[1]

वरील धागेदोरे लक्षांत घेतल्यास ऋषिसंघाच्या कांहीं योजना असतात व त्या यशस्वी करण्याचें काम जगांतील कित्येक माणसांवर सोंपविलेलें असतें हें आमचें म्हणणें आमच्या वाचकांस अंशत: तरी मान्य होईल अशी आमची आशा आहे.

---

(टीप मागील पानावरून)

मन हें रिघे'। असे म्हटले आहे. तेव्हां आनंदवनभुवन म्हणजे मनाची एक उच्च अवस्था होय ह्या म्हणण्यास दुजोरा येतो. आनंद वनभुवन हा शब्दही त्याच अर्थाचा असावा असें म्हणण्यास जागा आहे. वरील पद कोटणीसकृत कैवल्य-वैभव नामक पुस्तकांत पृष्ठ ८३ वर रामदासांचें म्हणून दिलेलें आहे

१ आनंदवनभुवन प्रकरणाचा नीट अर्थ लावणें कठिण आहे त्याबाबत मतभेद होऊ शकेल. पण ज्यांना आमचा अर्थ मान्य नसेल त्यांनी आमच्यापेक्षां अधिक सुसंगत अर्थ लावून दाखविला पाहिजे. एरव्ही त्यांच्या

(टीप पुढील पानावर चालू)

(टीप मागील पानावरून)

आक्षेपांना किमत देतां येणार नाही. स्वप्नी जें देखिले रात्री । तें तें तैसेंचि होतसे (७) ॥ स्मरलें लिहिलें आहे । (५७), हे साक्ष देखिली दृष्टि । (८), मनासी प्रचीत आली । शब्दी विश्वास वाटला (५३), आपस्तुतीच मांडली । ऐसें हें बोलणे नाहीं (५५), संदेह तुटला मोठा (४५) वगैरे शब्द नुसते अर्थवादपर आहेत असे म्हणून चालणार नाही हे आक्षेपकानीं लक्षांत ठेवावे. रामदासांना ध्यानी मनी स्वप्नीं जो ध्यास लागला होता तो त्यांनी आनंदवनभुवन प्रकरणांत वर्णिला आहे असे श्री. शकर श्रीकृष्ण देव म्हणतात (पहा समर्थहृदय खंड २, पृ. १२२-१२३). तसे मानल्यास हे एक गोड कल्पनाकाव्य आहे, त्यांत साक्षात्कार नाही, सत्यही नाही असे ठरेल व स्वप्नी जें देखिलें रात्री । तें तें तैसेंचि होतसे ॥ हे असत्य शब्द मुद्दाम समर्थानी घातले आहेत असे म्हणणें भाग होईल. तसेच जागोजाग या प्रकरणांत जो खरेपणाचा आशय दर्शित केला आहे तोही खोटा म्हणावा लागेल. आनंदवनभुवन म्हणजे काशी अथवा महाराष्ट्र असा अर्थ घेतल्यास कांही गोष्टी उलगडतील, नाही असें नाही. येथील शब्दरचना द्व्यर्थी आहे. तेव्हां एक अर्थ तसा होऊं शकेल. पण मग या प्रकरणांत गुप्तता ठेवण्याचे कारण रहाणार नाही. गुप्त ते गुप्त जाणावें । आनंदवनभूवनी ॥ या शब्दांना (१७) अर्थ रहात नाही. तसेंच हे प्रकरण सहज न समजेल असें मुद्दाम कां लिहिले त्याचाही उलगडा होत नाही. अर्थात् त्यात काही खोल अर्थ असला पाहिजे असे म्हटल्याखेरीज गत्यंतर नाही. लढाईचें जें वर्णन आहे त्यात अवरगजेबाच्या पराजयाचा उल्लेख आहे. भक्तांसि रक्षिलें मागें । आता ही (रामवरदायिनी माता) रक्षिते पहा ॥ असाही उल्लेख आहे अर्थात रामदासाच्या काळची व जरा नंतरची ही लढाई आहे. श्री. देवाना प्रश्न पडला आहे की, जर रामदासकालीन लढाई वर्णिली असेल तर रामरावणाच्या जुन्या लढाईसारखें हें वर्णन रामदासांनीं का करावे ? जेव्हा माणसाचें मन उच्च भूमिकांवर जातें तेव्हा सामान्यत: त्याला निरनिराळी दृश्ये दाखवून (शब्दांनी नव्हे) ज्ञान देण्यात येतें. ही दृश्यें नीट वर्णन करण्यास वैखरी वाणी पुरी पडत नाही. म्हणून उपमादिकांच्या साहाय्यानें तीं वर्णनें त्याला सागावी लागतात, आणि प्रत्येक माणूस आपणास आवडेल व लोकांस समजेल अशा उपमा देत असतो. समर्थांचें वर्णन राम-रावणयुद्धासारखें जें दिसत आहे त्याचें कारण हें असें आहे.

---

# परिशिष्ट

(शेवटच्या प्रकरणांत रामदास स्वामींच्या आनंदवनभुवन नामक एका स्फुट काव्याची चर्चा केलेली आहे. वाचकांस ती चर्चा नीट समजावी म्हणून तें प्रकरण समग्र खालीं देत आहों.)

## आनंदवनभुवन

जन्मदु:खें जरादु:खें। नित्य दु:खें पुन्हपुन्हां।
संसार त्यागणें जाणें। आनंदवनभूवना १
वेधलें चित्त जाणावें। रामवेधीं निरंतरीं।
रागें हो वीतरागें हो। आनंदवनभूवना २
संसार वोढितां दु:खें। ज्याचें त्यासींच ठाऊकें।
परंतु एकदां जावें। आनंदवनभूवना ३
न सोसे दु:ख तें होतें। दु:ख शोक परोपरी।
एकाकी एकदां जावें। आनंदवनभूवना ४
कष्टलों, कष्टलों देवा। पुरे संसार जाहला।
देहेत्यागासि येणें हो। आनंदवनभूवना ५
जन्म ते सोसिले मोठे। अपाय बहुतां परी।
उपायें धाडिलें देवें। आनंदवनभूवना ६
स्वप्नीं जें देखिलें रात्रीं। तें तें तैसेंचि होतसे।
हिंडतां फिरतां गेलों। आनंदवनभूवना ७
हे साक्ष देखिली दृष्टी। किती कल्लोळ ऊठिले।
विघ्नघ्ना प्रार्थिलें गेलों। आनंदवनभूवना ८
स्वधर्मा आड जें विघ्नें। तें तें सर्वत्र ऊठिलीं।
लाटिलीं कूटिलीं देवें। दापिलीं कापिलीं बहू ९
विघ्नाच्या ऊठिल्या फौजा। भीम त्यावरि लोटला।
घर्डिलीं चिर्डिलीं रागें। रडविलीं, बडविलीं बळें १०

हांकिलीं, टाकिलीं, तेणें। आनंदवनभूवनीं।
हांक बोंब बहु जाली। पुढें खत्तल्ल मांडिलें ११
खौळले लोक देवांचे। मुख्य देवचि ऊठिला।
कळेना कायरे होतें,। आनंदवनभूवनीं १२
स्वर्गींची लोटली जेथें। रामगंगा महानदी।
तीर्थासी तूळणा नाहीं। आनंदवनभूवनी १३
ग्रंथीं जे वर्णिली मागें। गुप्त गंगा महानदी।
जळांत रोकडे प्राणी। आनंदवनभूवनीं १४
सकळ देवांची साक्षी। गुप्त ऊदंड भूवनें।
सौख्यचि पावणें जाणें। आनंदवनभूवना १५
त्रैलोक्य चालिलें तेथें। देव, गंधर्व मानवी।
ऋषी, मुनी महायोगी। आनंदवनभूवनीं १६
"अक्रा, अक्रा" बहू अक्रा। काय "अक्रा" कळेचिना।
गुप्त तें गुप्त जाणावें। आनंदवन भूवनीं १७
त्रैलोक्य चालिल्या फौजा। सौख्य बंधविमोचनें।
मोहीम मांडिली मोठी। आनंदवनभूवनी १८
सुरेश ऊठिला आंगें। सुरसेना परोपरी।
विकटे, कर्कशे, यानें। शस्त्रपाणी महाबळी १९
देव देव बहू देव। नाना देव परोपरी।
दाटणी जाहली मोठी। आनंदवनभूवनीं २०
दिग्पती चालिले सर्वै। नाना सेना परोपरी।
वेष्टीत चालिले सकळै। आनंदवनभूवनीं २१
मंगळें वाजती वाद्यें। महागण समागमें
आरंभीं चालिला पूढें। आनंदवनभूवनीं २२
राशभें राखिलीं मागें। तेणें रागेंचि चालिला।
सर्वत्र पाठिसी फौजा। आनंदवनभूवनीं २३
आनेक वाजती वाद्यें। ध्वनी कल्लोळ ऊठिला।
छेबीने डोलती ढाला। आनंदवनभूवनीं २४

विजयी दीस जो आहे । ते दीसीं सर्व ऊठती ।
अनर्थ मांडला मोठा । आनंदवनभूवनीं २५
देवची तुष्टला होता । त्याचे भक्तीस भूलला ।
मागुता क्षोभला दुःखें । आनंदवनभूवनीं २६
कल्पान्त मांडला मोठा । म्लेंछ दैत्य बुडावया ।
कैपक्ष घेतला देवीं । आनंदवनभूवनीं २७
बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभूवनीं २८
पूर्वीं जे मारिले होते । तेची आतां बळावले ।
कोपला देव देवांचा । आनंद वन भूवनीं २९
त्रैलोक्य गांजिलें मागें । ठाऊकें विवेकी जना ।
कैपक्ष घेतला रामें । आनंदवनभूवनीं ३०
भीमची धाडिला देवें । वैभवें धांव घेतली ।
लांगूळ चालिलें पूढें । आनंदवनभूवनीं ३१
येथून वाढला धर्मु । रमाधर्म समागमे ।
संतोष मांडला मोठा । आनंदवनभूवनी ३२
बुडाला औरंग्या पापी । म्लेंछ संव्हार जाहला ।
मोडलीं मांडलीं छत्रें । आनंदवनभूवनी ३३
बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी
ताडिले पाडिले देवें । आनंदवनभूवनीं ३४
गळाले, पळाले मेले । जाले देशाधडी पुढें ।
निर्मळ जाहाली पृथ्वी । आनंदवनभूवनीं ३५
उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया ।
जप, तप अनुष्ठानें । आनंदनवभूवनी ३६
नाना तपें, पुरश्चर्णे । नाना धर्म परोपरी ।
गाजली भक्ति हे मोठी । आनंदवनभूवनीं ३७
लिहीला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला
चढता वाढता प्रेमा । आनंदवनभूवनी ३८

बंड पाषांड ऊडाले । शुद्ध आध्यात्म वाढलें ।
राम कर्ता राम भोक्ता । आनंदवनभूवनी ३९
देवालयें, दीपमाला । रंगमाळा बहूविधा ।
पूजिला देव देवांचा । आनंदवनभूवनी ४०
रामवरदायिनी माता । गर्द घेऊनी ऊठिली ।
मर्दिले पूर्वींचे पापी । आनंदवनभूवनी ४१
प्रत्यक्ष चालिली, राया । मूळ माया समागमें ।
नष्ट चांडाळ तें खाया । आनंदवनभूवनीं ४२
भक्तांसी रक्षिलें मागें । आतां ही रक्षिते पहा ।
भक्तांसी दीधले सर्वै । आनंदवनभूवनी ४३
आरोग्य जाहली काया । वैभवें सांडिली सीमा ।
सारसर्वस्व देवांचें । आनंदवनभूवनी ४४
देव सर्वस्व भक्तांचा । देव, भक्त दुजें नसे ।
संदेह तुटला मोठा । आनंदवनभूवनी ४५
देव, भक्त येक जाले । मिळाले जीव सर्वही ।
संतोष पावले तेणें । आनंदवनभूवनी ४६
सामर्थ्ये यश कीर्तीची । प्रतापे सांडिली सीमा ।
ब्रीदेची दीधलीं सर्वै । आनंदवनभूवनीं ४७
राम कर्ता, राम भोक्ता । रामराज्य भूमंडळी ।
सर्वस्व मीच देवाचा । माझा देव कसा म्हणे ४८
हेंचि शोधूनि पाहावें । राहावें निश्चळीं सदा ।
सार्थक श्रवणें होतें । आनंदवनभूवनीं ४९
वेद धर्मचर्चा । पुराणें महात्मे किती ।
कवित्वें नूतनें जीर्णें । आनंदवनभूवनी ५०
गीत संगीत सामर्थ्ये । काय कल्लोळ ऊठिला ।
मिळाले सर्व अर्थार्थी । आनंदवनभूवनी ५१
वेद [illegible] जाणावा । सिद्ध आनंदभूवनीं ।

आतूळ महिमा तेथें। आनंदवनभूवनीं ५२
मनासी प्रचीत आली । शब्दीं विश्वास वाटला ।
कामना पुरती सर्वे। आनंदवनभूवनीं ५३
येथुनी वांचती सर्वे । ते, ते, सर्वत्र देखती ।
सामर्थ्य काय बोलावें। आनंदवनभूवनीं ५४
उदंड ठेविली नामें । आपस्तुतीच मांडिली ।
ऐसे हें बोलणें नाहीं । आनंदवनभूवनीं ५५
बोलणें वाऊगें होतें । चालणें पाहिजे बरें ।
पुढें घडेल तें खरें। आनंदवनभूवनीं ५६
स्मरलें लिहिलें आहे । बोलता चालता हरी ।
काय होईल पाहावें। आनंदवनभूवनीं ५७
महिमा तो वर्णवेना । विशेष बहुतां परी ।
"विद्यापीठ" तें आहे। आनंदवनभूवनीं ५८
सर्वसद्या कळा विद्या । न भूतो न भविष्यति ।
वैराग्य जाहालें सर्वे । आनंदवनभूवनीं ५९

जय जय रघुवीर समर्थ

ॐ

THERE IS NO RELIGION HIGHER THAN TRUTH

# थिऑसफी व थिऑसॉफिकल सोसायटी

## (जिज्ञासूंकरितां माहिती)

थिऑसॉफिकल सोसायटी ही सर्व जगभर पसरलेली एक मोठी संस्था आहे. देशोदेशीं जे राजकारण-अर्थकारणांतले पक्षोपपक्ष असतात त्यांशीं या सोसायटीचा संबंध नाहीं. थिऑसफीचा प्रसार करणें हें या सोसायटीचें अंगीकृत कार्य आहे. आजचें व उद्यांचें जग अधिक सुसंस्कृत, अधिक शहाणें व अधिक सुखी करावें हें थिऑसफीचें ध्येय आहे. तें ध्येय गांठण्याकरितां थिऑसॉफिकल सोसायटीनें पुढील तीन उद्देश जगापुढें ठेवलेले आहेत:—

(१) जात, धर्म, लिंग, वर्ण अित्यादि भेद बाजूस ठेवून मानवजातीच्या बंधुत्वाचा केंद्र बनविणें;

(२) धर्म, तत्त्वज्ञान व भौतिकशास्त्रें यांच्या तुलनात्मक अध्ययनास उत्तेजन देणें;

(३) अज्ञात सृष्टिनियम व मनुष्याच्या अंतरंगांत असलेल्या गूढ शक्ति यांचें संशोधन करणें.

आज जग झपाट्यानें बदलत जाहे आणि हे बदल भविष्यकाळीं वाढत जाणार आहेत. व्यक्तीची व जगाची परिस्थिति बदलल्यामुळें माणसासमोर, आज अनेक नवीन प्रश्न दत्त म्हणून उभे राहिलेले आहेत. या नवीन कालखंडामध्यें जर व्यक्तीला व समाजाला सुसंस्कृत शहाणे व सुखी करावयाचें असेल तर जगाला एक वेगळी दृष्टि आणून दिली पाहिजे. उंच मनोऱ्यावर चढल्यानंतर माणूस जसा खालचे सर्व भूमिभाग एका नवीन दृष्टीनें

पाहूं शकतो त्याप्रमाणें जगांतील सर्व प्रश्नांकडे पहाण्याची, सर्व भानगडी सोडविण्याची, स्वतःची व जगाची सर्व प्रकारची उन्नति करण्याची जी एक **नवीन दृष्टि** आहे तिला थिऑसफी म्हणतात. जुन्या काळी धर्म, नीति व तत्त्वज्ञान हीं तीन क्षेत्रें माणसाला सुसंस्कृत करीत असत. थिऑसफीच्या ह्या नवीन दृष्टीमध्यें या तिन्ही क्षेत्रांचाही समावेश होत असतो.

थिऑसफी हा शब्द मूळचा ग्रीक भाषेंतला आहे. त्याचा अर्थ आत्मविद्या किंवा ब्रह्मविद्या असा आहे. थिऑसफीची चळवळ सर्व जगभर चालत असल्यामुळें सर्व जगास समजेल असे पाश्चात्य नांव तिला देण्यात आलेलें आहे. थिऑसफीची दृष्टि जगांतील सर्व प्रश्नाकडे नवीन रीतीने बघत असते. जगातील सर्व धर्म अनुभवावर आधारलेले असल्यामुळे ते सारे सत्यमूलक आहेत अशी थिऑसफीची शिकवण आहे. ती धर्माधर्मातील भाडणें नाहीशी करून त्यांत बंधुत्व निर्माण करू शकेल. सायन्स हें जसे दृश्यसृष्टीचें अनुभवावर आधारलेले शास्त्र आहे तसे **धर्म हेंही अदृश्यसृष्टीचें अनुभवावर आधारलेलें शास्त्र** आहे, ही थिऑसफीची शिकवण धर्म व सायन्स या दोन्ही क्षेत्रामध्यें बंधुत्व निर्माण करूं शकेल. सर्व माणसास लागू असणारे दृश्य व अदृश्य सृष्टीचे नियम एकच आहेत, सर्व माणसाची सुखदु:खेंही एकसारखीच असतात, तेव्हा माणसामाणसांत फरक न करता सर्व माणसें सुखी, शहाणी व सुसंस्कृत करणें हें आपले कर्तव्य आहे ही थिऑसफीची शिकवण भिन्न देशांतील व वंशांतील माणसात बंधुत्व निर्माण करूं शकेल. जगातील सर्व क्षेत्रात बंधुत्वाची भावना वाढविणें हें थिऑसफीचें मुख्य ध्येय आहे. माणसांमाणसामधील बंधुत्वाची भावना जोरदार करून जगातील अन्याय, दारिद्र्य व दुःख हीं नष्ट करतां येतील असे थिऑसफीचें सांगणें आहे.

शास्त्रज्ञ जसें दृश्यसृष्टीचें संशोधन करतात तद्वत् थिऑसफीने अदृश्यसृष्टीचें संशोधन केलेलें आहे व त्या आधारावर **धर्माची एक नवीन मांडणी** जनतेसमोर ठेविली आहे. ही मांडणी प्रत्येकाच्या मनांत स्वतःच्या धर्माबद्दल आदर निर्माण करून त्यांतील रहस्य स्पष्ट करते व त्याबरोबरच जगांतील इतर धर्मांबद्दल सहानुभूति निर्माण करते. ती मांडणी अनेक प्रश्नांस समर्पक उत्तरेंही देते. मृत्यु म्हणजे काय ? मृत्यूनंतर जीव शाबूद रहातो का ? माणसाला एक जन्म असतो की अनेक असतात ? माणसाची उत्क्रांति कशी

होते ? ईश्वर आहे का ? मानवी इतिहासाच्या पाठीशी कोणी सूत्रधार आहेत का ? जगाची नवीन घडी कशी बसवितां येईल ? असल्या प्रश्नास थिऑसफीत नवीन रीतीची व समन्पक उत्तरे देण्यांत येत असतात.

बंधुत्वाची आवड असणाऱ्या कोणत्याही जिज्ञासूला थिऑसॉफिकल सोसायटीचा सभासद होता येतें, **थि. सोसायटींत संपूर्ण मतस्वातंत्र्य आहे.** थिऑसफीच्या अमुक एका सिद्धातावर सभासदानें श्रद्धा ठेवली पाहिजे असा कोणताही निन्बध नाही. अभ्यास करून सभासदानी आपली मते बनवावी, असे सोसायटीचें सभासदाना सांगणे आहे. यावरून दिसून येईल की, **थिऑसॉफिकल सोसायटी किंवा थिऑसफी ह्यांना पंथ असें म्हणतां येणार नाहीं**. ही सोसायटी नुसती तात्त्विक चर्चा करण्यासाठी काढलेली नाही. स्वत ला आणि जगाला सुधारण्यासाठी, सर्वाना समजूतदार व कर्तव्यदक्ष करण्यासाठी, जगातील दु ख कमी व्हावे एतदर्थ नाना उद्योग करण्यासाठी ती स्थापिलेली आहे.

थिऑसॉफिकल सोसायटीची **घटना लोकशाहीस धरून आहे**. तिचे सध्याचे लोकनियुक्त अध्यक्ष श्री. एन्. श्रीराम हे आहेत. तिचे आतर्राष्ट्रीय मुख्य पीठ मद्रासनजीक अड्यार येथें आहे. हिंदुस्थानातील मराठीच्या प्रातांत तिच्या पुढील प्र माणे पधरा शाखा आहेत --**मध्यप्रांत** (१)जबलपूर-लॉज्; (२)नागपूर-लॉज् (धनतोली), (३) यवतमाळ-लॉज्, (४)वणी-लॉज्, (५)श्रीकृष्ण-लॉज्-अमरावती, (६)अकोला-लॉज्, **मुंबई राज्यः**-(७)श्रीरामचद्र-लॉज्-नाशिक, (८) ठाणे-लॉज्, (९) पुणें-लॉज्-गणेशवाडी-डेक्कन-जिमखाना पुणें ४, (१०) ईस्ट-लॉज् ९५ अ गांधीरोड तिसरा मजला-पुणें १ (कॅन्टोन्मेंट), (११) व्हिक्टरी-लॉज्-४४१ सोमवार पेठ-पुणें २; (१२) सांगली--लॉज् (गणपतीचें देऊळ); (१३) श्रीकृष्ण-लॉज-कोल्हापूर, (१४) बेळगांव-लॉज-समादेवी गल्ली; (१५) रत्नागिरी-केंद्र-या शाखांस संघटित करणाऱ्या सस्थेस **मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन** म्हणतात. तिचे सध्यांचे अध्यक्ष श्री. राजाराम सखाराम भागवत एम्. ए. पोलिस लाईन्सजवळ, ठाणें हे आहेत. चिटणीस श्री. गंगाधर रघुनाथ भडभडे बी. ए., एल्एल्. बी., १८ गणेशवाडी, पुणें ४, व श्री. गोपाळ हरी कुंटे बी. एस्सी. सेवानिवृत्त प्राध्यापक, ७८१ रविवार, नाशिक हे आहेत. त्यांचेपैकी कोणाहीकडून जास्त माहिती जिज्ञासूंस मिळू शकेल.

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशननें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें

| | रु. आ. पै. |
|---|---|
| (१) **थिऑसफीवरील सुबोध व्याख्यानें** भाषांतरकार कै.वा. दे. भा. लेले, बी. ए. | ०—१२—० |
| (२) **सिद्धपुरुष व त्यांचा संप्रदाय** लेखक वा. ल. चिपळूणकर व रा. स. भागवत | १—१२—० |
| (३) **हिंदु सामुदायिक पूजा** (भारत-समाज-रचित) सान्थ व सटीप ले. रा.स. भागवत एम् ए (ठाणें) | ०—४—० |
| (४) **महम्मद पैगंबर व त्यांचा इस्लामधर्म** ले. वा. ल. चिपळूणकर | ०—६—० |
| (५) **मृत्यूनंतर काय ?** (दोन जिज्ञासूंचा संवाद) ले. रा. स. भागवत एम्. ए. | ०—४—० |
| (६) **ईश्वर आहे काय ?** (दोन जिज्ञासूंमधील सवाद)— ले. रा. स. भागवत | ०—४—० |
| (७) **थिऑसफी म्हणजे काय ?** ले. रा. स. भागवत, एम्. ए. | ०—६—० |
| (८) **साधनचतुष्टय**—"कृष्णजी"—कृत "At the Feet of the Master"चें मराठी भाषांतर | ०—८—० |
| (९) **जीवनाचा हेतु**—लेखक वा. ल. चिपळूणकर | ०—४—० |
| (१०) **थिऑसफींत नवीन काय आहे ?** (दोन जिज्ञासूंचा संवाद) ले. वा. ल. चिपळूणकर व रा. स. भागवत | ०—४—० |
| (११) **श्रद्धा कीं चिकित्सा** ले. वा. ल. चिपळूणकर आणि रा. स. भागवत | ०—४—० |

वर दिलेली मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनने प्रसिद्ध केलेली मराठी पुस्तकें व खालील पुस्तकें पुढील पत्त्यावर चौकशी केल्यास मिळू शकतील—श्री. दत्तात्रेय गोविंद काळे बी. ए. गोविंदभुवन, आपटे रोड, पुणें ४.

| | |
|---|---|
| (१) **बेझंट—चरित्र**—आवृत्ति २ री (१९४७) ले. रा. स. भागवत | २—०—० |
| (२) **राजयोगाचीं मूलतत्त्वें व अभ्यास** ले. रा. स. भागवत, एम्. ए. | १—८—० |
| (३) **जीवन आणि कला**—श्री. जिनराजदास (माजी अध्यक्ष थि. सोसायटी) यांच्या लेखाचा अनुवाद ले. कै.वा. दे. भा. लेले | ३—०—० |
| (४) **मृत्यु व मृत्यूनंतर**—ले. रा. स. भागवत, एम्. ए., | १—८—० |
| (५) **स्वप्नसृष्टि**—ले. ज. ना. ढगे, एम्. ए. (ठाणें) | १—८—० |